


परमपूज्य दत्त-
महाराज
गौरवसमिती अध्यक्ष
पं. धुंडिराज शास्त्री
दाते यांचेकडून
मानपत्र समर्पण.

****

# प. पू. ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वर सहस्त्रचंद्रदर्शन विधी सोहळा प्रतिवृत्त

वैशाख कृ. २ ते वैशाख कृ. ८ शके १९१२
(११ मे ९० ते १८ मे ९०.)

****



प. पू. श्री दत्त-महाराजांच्या रौप्यतुलापूर्ततेचा अपूर्व क्षण
















१) प. पू. दत्तमहाराजांच्या परिवारातील सुवासिनी कुंकुमार्चन करतांना. २) श्री. किसनमहाराज साखरे यांचे रंगलेले प्रवचन. व्यासपीठावर प्रा. शिवाजीराव भोसले, पं. गणेशशास्त्री द्रावीड आणि समिती अध्यक्ष पं. दाते शास्त्री. ३) चार - वेद, काही उपनिषदे व निवडक धार्मिक ग्रंथांची पारायणे - सुरु आहेत. ४) वासुदेव निवास ब्रह्मश्री दत्त महाराज विशेषांकाचा प्रकाशन-सोहळा - संपादक श्री. अच्युतराव पोटभरे मनोगत व्यक्त करतांना. ५) दीपप्रज्ज्वलनाने दुपारच्या ज्ञानसत्राचा पं. धुंडिराजशास्त्री दाते - गौरव-समिती अध्यक्ष - शुभारंभ करीत आहेत.



# प. पू. ब्रम्हश्री श्री दत्तमहाराज सहस्त्रचंद्रदर्शन शांति महोत्सव एक अपूर्व सोहळा

श्री वासुदेव निवास ! प. पू. श्रीयोगिराजांचे पवित्र निवास स्थान. संत-महात्म्यांच्या चरणस्पर्शाने पावन झालेले. सदैव प्रसन्न ! पण त्या दिवशी ते अधिकच प्रसन्न वाटत होते !! कारण..........? त्या दिवशी होता, प. पू. श्री दत्तमहाराजांचा वाढदिवस ! त्यांनी ऐंशीव्या वर्षात पदार्पण केले होते. भक्तमंडळींना तर तो सोनियाचाच दिवस होता. श्रीगुरुमाऊलीच्या चरणी मस्तक ठेवून प्रत्येकजण त्यांचे मंगलाशीर्वाद घेत होता. त्यांना दीर्घायुरारोग्य चिंतीत होता. गुरुमाऊलीचे हे कृपाछत्र असेच आपणास सदैव लाभावे असे प्रत्येकाला वाटायचे. पण हे व्हायचे असेल तर ईशसेवा, गुरुसेवा घडायला हवी. 'पण ती कशी घडायची ?' याच विचारात प्रत्येकजण गर्क होता. गुरुसेवेची ओढ तर होती पण मार्ग सापडत नव्हता.

अगदी त्याचवेळी थोर गुरूसेवक श्री रघुनाथराव कुलकर्णी आणि इतर मान्यवर व्यक्ति प.पू दत्तमहाराजांच्या 'सहस्त्रचंद्रदर्शन शांति' या महोत्सवाबद्दल आपापसात चर्चा करीत होती. त्यांचे ते बोलणे भक्तजनांच्या कानांवर पडताच त्यांना अत्यानंद झाला. त्यांना वाटले की प. पू. श्रीयोगिराजांनी आपली तळमळ जाणली, हाक ऐकली व आपल्याला सेवेचा मार्ग दाखविला.

श्री रघुनाथराव कुलकर्णी यांनी लोकांचा हा सत्यसंकल्प श्रींच्या पादुकांपुढे सोडला. प.पू महाराजांकडून संमति मिळविली, त्यांचे आशीर्वाद घेतले. ट्रस्टींच्या व भक्तांच्या बैठकीत "प. पू. श्री दत्तमहाराज कवीश्वर गौरव समितीची स्थापना होऊन वे. मू. कृष्णा आर्वीकर (नागपूर), वे. मू. पं. आनंदशास्त्री पारखी (पुणे), वे. मू. पं. राजेश्वरशास्त्री उप्पीनबेटगिरी (धारवाड) यांची कार्यवाह म्हणून नेमणूक झाली. अशा ह्या तरुण, उत्साही कार्यवाहांमुळे पुढे कार्यकर्त्यांमध्ये जिद्द व आत्मविश्वास निर्माण झाला. पं. धुंडिराजशास्त्री दाते (पंचागकर्ते-सोलापूर) यांनी अध्यक्षपदाची धुरा सांभाळण्याचे मान्य केले. तर श्रीमान साबळेशेठजींनी कार्याध्यक्षाची जबाबदारी उचलली. त्यामुळे कार्यवाहांच्या या त्रयीमागे आता अनुभवसंपन्न शास्त्रीय ज्ञान व व्यवहार चातुर्य प्रत्यक्ष उभे राहिले. पं. दाते शास्त्रींनी तिथि, वार, नक्षत्र पाहून ११ मे ते १८ मे १९९० असे महोत्सवाचे निश्चित दिवस कळवले. त्यामुळे पुढील कार्यक्रमांची आखणी करण्यात एक प्रकारची निश्चितता आली.

शके १९११ आषाढ शु. पौर्णिमा, गुरुमाऊलीच्या पूजेसाठी लोकांची एकच गर्दी झाली होती, पण अशातही प्रत्येकजण दाराजवळील सोनेरी अक्षरांत लिहिलेल्या पाटीजवळ क्षणभर थांबत होता, पाटी पुनः पुनः वाचीत होता. त्यात सहस्त्रचंद्रदर्शन शांति महोत्सवानिमित्त तन-मन-धनाने सेवा करण्याचे

आवाहन मंडळींना केले होते. उत्सवाचा निश्चित महिना दिलेला होता. त्यामुळे आपणांस आता गुरुसेवेचा लाभ घडणार या विचाराने लोकांची मने आनंदून जात होती.

जितका उत्सव मोठा तितके निवेदन सुद्धा महत्वाचे होते त्यामुळे मान्यवर व्यक्ती, संस्था, यांना पत्रें पाठवून निवेदनाकरिता त्यांचे अनुमोदन मिळविण्याचे काम कार्यवाहांनी सुरु केले. त्याचवेळी प्राचार्य केरुर, वे. मू. कृष्णा आर्वीकर व श्री. ना. गो. दाते यांनी प.पू. महाराजांचा परिचय करुन देणारे सुंदर पत्रक तयार केले. पण मुखपृष्ठ ! ते तर अत्यंत महत्वाचे असल्यामुळे सुंदर व्हायलाच हवे होते. प. पू. श्रीयोगिराजांच्या इच्छेनेच सर्व चालले असल्यामुळे तेही काम आकस्मिकपणे होऊन गेले. प. पू. दत्तमहाराजांचा मोहक हास्य असलेला असा एक दुर्मिळ फोटो सहजपणे मिळून गेला. श्री. बनकर (आर्टिस्ट) यांनी त्याला अधिकच सुंदर रूप दिले. पूजनीय दत्तमहाराजांची अलौकिक गुणसंपदा उलगडून दाखविणारे संस्कृत श्लोक शोधून काढले - वे. मू. सुहास जोशीने ! कार्यवाह-आर्वीकर, वे. मू. भगवान पाध्ये, श्री. के जोशी आणि त्यांचे कामगार यांनी रात्रंदिवस अथक परिश्रम करुन अतिशय सुंदर, मनमोहक, संग्राह्य वाटावी अशी निवेदन पत्रिका तयार केली.

सौ. गायकवाड, सौ. म्हेत्रस, कु. इंदुले (भगिनी), श्री. भुसारी, श्री. कोंढरे, श्री. प्रशांत कदम इत्यादींनी रात्रंदिवस कष्ट घेऊन सर्वांचे पत्ते लिहून पोस्टींग केले. त्यामुळे लोकांना हे संग्राह्य निवेदन वेळेवर मिळाले व गुरुसेवेचा लाभ त्यांना घेता आला.

मुंबई, पुणे, नागपूर आणि मराठवाड्यातील प्रमुख वर्तमानपत्रांतून गौरव समितीने बैठकीकरिता पुण्याला येण्याचे आवाहन भक्तमंडळींना केले. त्याप्रमाणे ठरलेल्या दिवशी श्री. वासुदेव निवासातील साधना मंदिरात बैठक झाली. परगावांहून शे-दीडशे भक्तमंडळी आली होती. पं दाते शास्त्रींच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. निधी संकलनाकरिता पावती पुस्तके व निवेदने वाटली गेली. प. पू. दत्तमहाराजांची रौप्यतुला व्हायची असल्यामुळे संकलनाचे काम योजनाबद्धच व्हायला पाहिजे होते. अनेकांनी अनेक मार्ग सुचविले. त्यामध्ये थोरामोठ्यांचे कार्यक्रम निधी संकलनाकरिता करावे असे सुद्धा काहींना वाटले. पण योगायोग म्हणा अगर माऊलीची इच्छा म्हणा ठरवलेले सर्व कार्यक्रम न होता घरा-घरातून महोत्सवाचा प्रचंड निधी जमविण्यात आला.

याचा मोठा फायदा हा झाला की प्रत्येकाला सेवा करायला मिळाली. आणि सर्वांनाच वाटायला लागले की हा उत्सव आपलाच आहे.

प. पू. महाराजांच्यावर गौरव ग्रंथ काढण्याची सर्व जबाबदारी प्राचार्य केरुर यांनी उचलली तर जेष्ठ गुरुभक्त श्री. अच्युतराव पोटभरे यांनी "श्री वासुदेव निवास" हा चरित्र विशेषांक काढण्याचे निश्चित केले. त्यामुळे कार्यशील असलेली श्री गौरव समिती अधिकच गतिशील झाली.

जसजसा कार्याचा व्याप वाढू लागला तसतशी स्वतंत्र कार्यालयाची गरज भासू लागली. ही गरज विनयशील श्री. लाटे यांनी सुसज्ज कार्यालय बांधून देऊन पूर्ण केली. या सुसज्ज कार्यालयाला फोन मिळवून देण्याचे काम श्री. नंदकुमार जोशी (तंबाखूचे व्यापारी-पुणे) यांनी परिश्रमपूर्वक केले. कार्यालय प्रमुख म्हणून श्री. भास्करराव कुलकर्णी काम पाहू लागले.

आर्त जनांची दु:खे दूर करण्याकरिता प. पू. श्री. दत्तमहाराजांचे दौरे नेहमीप्रमाणे याही काळात चालूच होते. प्रत्येक ठिकाणी पावतीपुस्तके व निवेदने देण्याचे रघुनाथरावांचे काम चालूच होते. त्यामुळे दूरदूरच्या भक्तजनांपर्यंत या कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार झपाट्याने झाला आणि थोड्याच काळात मनिऑर्डर्स, ड्राफ्ट्स, चेक्स् यांचा ओघ समिती कार्यालयाकडे सुरु झाला. श्री. अरविंद पोटभरे, श्री. फडके, श्री. कोटस्थाने, श्री. दिलीप दामले, श्री. पानसे ही अनुभवी मंडळी भास्कररावांच्या मदतीला आल्यामुळे ऑडीटच्या दृष्टीने प्रत्येक नोंदी व्यवस्थित होऊ लागल्या.

मुंबईत श्री. माधवराव तांबोळी, श्री.

गोडसे, श्री. ढापरे, सौ. निलाताई जोशी यांनी पायपीट सुरु केली. तर पुण्यातील श्री वासुदेव निवास भजनी मंडळाने भजनद्वारा लोकांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. सौ. सुमनताई देशपांडे, सौ. भागवत, श्रीमती दुबळे, श्रीमती सुशिलाबाई मोडक, कार्यवाह पं. आनंदशास्त्री पारखी, श्री. लाटे, श्री. गांधी, श्री. कोटस्थाने इत्यादींनी वैयक्तिकरीत्या भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली. श्री. जानी यांचे मदतीने गुजराथी भाषेत स्वतंत्र निवेदन काढून श्री. शहापूरकर, श्री. अरगडे, श्री. भट्ट, श्री. सुधीरभाई यांनी जवळजवळ निम्माअधिक गुजराथ पालथा घालून श्री सदगुरुसेवेत भर घातली. मध्यप्रदेशात श्री. हरिलाल अग्रवाल यांची सेवेसाठी धडपड चालली होती तर तिकडे आंध्रात श्री. आजेगांवकरांची हैद्राबाद आदी शहरी धावपळ चालली होती. दिल्ली, वाराणशी, धारवाड (कार्यवाह- पं. राजेश्वरशास्त्री उप्पिनबेटगिरी), बेंगलोर सर्व ठिकाणच्या भक्तांचा एकच ध्यास-गुरुसेवा ! कळमनुरीचे श्री. शिबरामपंत तांबोळी हात मोडलेला, तशाही अवस्थेत सायकलवरुन रपेट मारीतच होते. खामगांवचे श्री. मुकुंदराव टिपरे हार्टचे पेशंट, ऑपरेशन झालेले, पण एकच ध्यास गुरुमाऊलीची सेवा, सेवा आणि सेवा ! त्यांनी घर न घर हिंडून ठरल्यापेक्षा कितीतरी पट अधिक रक्कम जमा केली. खर्डा, एक लहानसे गाव, वस्ती जेमतेम १५०००, पण डॉ. गोलेकर, श्री. बबनराव लांडगे सर, श्री. पंढरीनाथ गोले यांनी जवळजवळ वस्तीच्या दुप्पट रक्कम एवढ्याशा लहान गावातून जमवली. जालन्यातील पूज्य सौ. ताईमहाराज ! त्यांच्या वरदहस्ताबद्दल लिहावे तेवढे थोडेच आहे.

जळगाव, सोलापूर, बार्शी, रत्नागिरी, गोवा किती किती म्हणून नांवे आणि गांवे सांगायची ! गरुडेश्वर, नारेश्वर या संस्थानांनी तर कर्नाटकातील वरदपूर, कुरवपूर, शृंगेरपीठ यांनी पण आपले सहकार्याचे हात पुढे केले. कार्यवाह- श्री. कृष्णा आर्वीकर स्वत: कधी स्कुटर, कधी कार, तर कधी रिक्षा तर कधी रेल्वेने सारखी भ्रमंती करीत होते. स्वत: श्री. म्हसवडकर, डॉ. वसंतराव जोशी आपल्या कारसह त्यांच्या दिमतीला सदैव हजर होते. या सगळ्याचा एकच परिणाम झाला तो म्हणजे निधी संकलनाच्या लहान ओहळाने आत्ता मात्र विशाल गंगेचे रुप धारण केले. हे सर्व सुरु असतानाच वेळोवेळी पं. दाते शास्त्रींच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कामाचा आढावा घेतला जात होता व पुढील कामांची चर्चा केली जात होती.

आता सर्वात महत्वाचा प्रश्न होता-निवास व्यवस्था. श्री वामन निवासाची वास्तु लहान पडणार हे उघडच होते. त्यामुळे श्री वामन निवासाचा दुसरा मजला बांधण्याचा विचार पुढे आला. ट्रस्टी मंडळींनी हा विचार उचलून धरला. होणारे फायदे व न बांधल्यास येणाऱ्या अडचणी पू. श्री. दत्तमहाराजांपुढे मांडल्या गेल्या प. पू. महाराजांचा होकार मिळताच डॉ. वाघण्णा, श्री. लाटे यांच्यासारखी सेवाभावी मंडळी पुढे आली. कॉन्ट्रॅक्टर गुरुभक्त श्री. नागले यांनी बांधकामाची सर्व जबाबदारी उचलली. मुंबई, पनवेलचा व्याप सांभाळून एक गुरुसेवा म्हणूनच ते या कामाकडे पहात होते. साठी उलटलेले श्री. प्रभाकरपंत निजामपूरकर आपल्या वयाकडे न पाहता रात्रंदिवस नागलेंच्या सहाय्याकरिता कंबर कसून उभे होते. या सर्वांच्या कष्टामुळेच प. पू. श्री. योगिराज गुळवणी महाराजांच्या पुण्यतिथी पर्यंत दुसऱ्या मजल्याचा प्रचंड स्लॅब घातला देखील ! एवढे करुन देखील निवास व्यवस्था अपुरी पडेल की काय या शंकेमुळे शाळा, कॉलेजेस्, होस्टेल्सकडे विनंती अर्ज केले गेले. श्री. जावडेकरांनी कॉर्पोरेशनशी संधान बांधून पं. दीनदयाळ शाळा बुक केली.

दिवस जात होते, उत्सव जवळ येत होता. आता धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम निश्चित करणे आवश्यक होते. त्याकरिता दूरदूरच्या मान्यवर पंडितांचे व वेदोनारायणांचे पत्ते माहितीसह मिळवून त्यांच्याशी पत्रव्यवहार करणे आवश्यक होते. त्याकरिता वे. मू. कृष्णा आर्वीकर यांनी भारदस्त भाषेत पत्र लिहून त्याच्या झेरॉक्स कॉपीज काढल्या. वे. मू. पं. राजेश्वर शास्त्री व

वे. मू. पं. आनंदशास्त्री पारखी यांच्या मदतीने त्यांनी दोन-अडीचशे लोकांशी संपर्क साधला.

त्याचवेळी विविधतेने नटलेले सांस्कृतिक कार्यक्रम ठरविण्याचे काम पण चालले होते. त्यामध्ये सुगम संगीतापासून शास्त्रीय संगीतापर्यंत, प्रवचनापासून परिसंवादापर्यंत, मौलिक ग्रंथांची प्रकाशने, पू. महाराजांच्या सत्कार, तुलादान इ. अनेकविध कार्यक्रम होते. त्याकरता अध्यक्षांच्या व सल्लागार समितीच्या मदतीने मान्यवर विद्वान, प्रवचनकार, श्रेष्ठ गायक, वादक यांच्याशी कधी फोनने तर कधी प्रत्यक्ष गाठीभेटी घेऊन संपर्क साधण्यात आला. त्यात करवीर पीठाचे शंकराचार्य, कुडली शृंगेरी पीठाधीश्वर श्री. प. प. १००८ योगाभिनवनृसिंह भारती शंकराचार्य स्वामी, प. प. नित्याबोधानंद स्वामी यांसारख्या विभूतींबरोबरच आळंदीचे ह. भ. प. साखरे महाराज, केडगावचे पू. मौनीमहाराज यांसारख्या संत सत्पुरुषांचा समावेश होता.

शके १९११ माघ वद्य षष्ठी (सन १९९० मार्च) पूजनीय दत्तमहाराजांचा वाढदिवस, त्यांना ८० वर्षे पूर्ण झाली. त्यांनी ८१ व्या वर्षात पदार्पण केले. त्याच दिवशी दुपारी बैठक होऊन कार्यक्रमाची रुपरेषा पक्की झाली. निमंत्रण पत्रिका तयार केली, पण ती राष्ट्रभाषेत-हिंदीत काढावी असे ठरले. श्री. मधु पित्रे अलाहाबाद यांनी त्या मराठी पत्रिकेचे रुपांतर खास हिंदी ढंगात केले. व छापून देण्याचीही जबाबदारी उचलली. वे. मू. कृष्णा आर्वीकर यांनी पुढील सर्व जबाबदारी कर्यकर्त्यांवर सोपविली आणि आपण स्वत: पं. दाते शास्त्रींच्या बरोबर कर्नाटक आंध्रच्या दौऱ्यावर पुढील कार्यक्रमाकरिता निघाले. घरी, दारी पाकिटे लिहिण्याचे काम मोठ्या जोमाने सुरु झाले. १५ एप्रील १९९० पर्यंत निमंत्रणे पाठवून झाली देखील. त्यामुळे भक्तमंडळींना रजा काढणे, रिझर्वेशन करणे सोपे गेले.

याच सुमारास प. प. शिवोमतीर्थ स्वामी महाराज, शंकराचार्यांची चारी पीठे इ. थोर सत्पुरुषांची आशीर्वादपर पत्रे येत होती. तर प. पू. नानामहाराज तराणेकर प्रत्यक्ष पुण्यात आले. उत्सव उत्तम होईल असा आशीर्वाद देऊन त्यांनी महाराजांची एकांतात भेट घेतली. कांची कामकोटी पीठाचे शंकराचार्य प. प. जयेंद्र सरस्वती आश्रमात आले. त्यांची पाद्यपूजा होताच त्यांनी आपल्या गळ्यातील रुद्राक्षांची माळ प. पू. महाराजांच्या गळ्यात घालून सर्वांनाच अभय दिले.

या सर्वांच्याच प्रत्यक्षाप्रत्यक्ष आशीर्वादामुळे कार्यकर्त्यांचा उत्साह अधिकच वाढला व ते जोमाने पुढील कार्यास लागले. एवढा मोठा कार्यक्रम म्हणजे त्याला लागणारा सभामंडप व व्यासपीठही मोठेच करावे लागणार होते.

त्या व्यासपीठाची रचना कशी असावी यावर विचार विनिमय झाल्यावर, त्याकरिता '३×४' ची भव्य तैलचित्रे काढून घेण्याचे ठरले वे. मू. आर्वीकरांच्या बंधूनी - श्री. दामोदर यांनी हे काम आपल्या अंगावर घेतले. पू. दत्तमहाराजांनी प. प. दिक्षीत स्वामी महाराज व आपले पिताश्री प. पू. धुंडिराजशास्त्री महाराज यांचे फोटो पसंत केले. हे फोटो कार्ड साईजचेच होते. या तरुण जिद्दी कलाकाराने रात्रंदिवस खपून दोन महिन्यात ही भव्य तैलचित्रे पूर्ण केली. श्री. मधु पित्रेंच्या मित्राने श्री. किशोर गिरीधारीने प. प. टेंबे स्वामी महाराजांचे जुने तैलचित्र रीपेन्ट केले. ते इतके सुंदर झाले की नवीनच दिसू लागले.

श्री वासुदेव करंबेळकरांनी केलेली उत्सवाच्या सामानांची यादी मिळताच श्री. साबळे शेटजींनी सर्व माल आणून दिला. भक्तगणांनी दिलेल्या सामानांची पण सारखी भर पडत होती. वासुदेवनिवास भजनी मंडळाबरोबरच सौ. करमरकर, सौ. गायकवाड, सौ. भागवत, श्रीमती दुबळे, कु. इंदुले, सौ. व कु. ज्ञानपुरे, कु छाया चंद्रात्रे इ. भगिनी कामाला लागल्या. आणलेले सर्व धान्य त्यांनी नुसते स्वच्छच केले नाही तर प्रत्येक पोत्याला नावाची लेबल्स पण लावली. सर्व प्रकारच्या किरकोळ व ठोक सामानामुळे श्री वासुदेव निवासाला आता एका कोठीचे स्वरुप आले होते.

श्री. वासुदेव निवास व श्री. वामन निवास या दोन्ही ठिकाणी कार्यक्रम असल्यामुळे दोन्हीकडे सुसज्ज मंडप घालणे आवश्यक होते. वे. मू. राजाराम कुलकर्णी (अग्निहोत्री) यांच्या सूचनेप्रमाणे श्री वासुदेवनिवासात श्रौतयागासाठी पत्र्याची शेड असलेला मंडप घातला गेला. त्यामानाने श्रीवामननिवासांतील मंडपाचे काम योजनाबद्ध व्हायला हवे होते. तेथील सोसायटींचे सेक्रेटरी श्री. दरडा यांनी मोठ्या आनंदाने सोसायटीचे मैदान महोत्सवास देण्याचे मान्य केले. श्री. ना. गो. दाते आणि श्री. नागले यांनी मैदान पाहून सर्व सोयींनी युक्त अशा सभामंडपाचा कच्चा आराखडा तयार केला. त्यानुसार आग्नेयेकडे तोंड करुन '९०×५०' चा भव्य सभामंडप तयार केला. त्यामध्ये २५'×१५'×३' आकाराचे मोठे स्टेज उभारले. याची रचनाच अशी केली होती की कोठेही उभे राहिले तरी स्टेजवरचा कार्यक्रम स्पष्ट दिसावा. जवळच प्रवेशद्वारापाशीच चप्पल स्टँड, बुक स्टॉल होता. तेथून पुढे असलेल्या कमानीतून प्रवेश करताच स्वागत कक्ष-चौकशी विभाग, त्याला लागूनच समितीचे मोठे कार्यालय होते. श्री. वामन निवासाच्या प्रदक्षिणेच्या वाटेवर संपूर्ण मंडप घातला होता. बाल्कनी, दुसरा मजला व गच्ची या तिन्ही ठिकाणी मिळून चारपांचशे लोक राहू शकतील अशा सव्वीस खोल्या तयार केल्या गेल्या. दुसऱ्या मजल्यावरील कायम स्वरुपाचे लाईट फिटींगचे काम श्री. लिमये यांनी अल्प खर्चात सेवाभावाने केले. अन्य ठिकाणची प्रकाश योजनेची व रोषणाईची व्यवस्था श्री. अकोलकर यांचेकडे होती. श्री. सोहोनींनी दोन्ही मजल्यावर बॉयलरची सोय करुन दिल्याने गरम पाण्याची पण व्यवस्था झाली.

पूं. राजेश्वरशास्त्री आणि पं. आनंदशास्त्री पारखी यांनी जातीने लक्ष घालून पंचायतन यागाचे व संहिता स्वाहाकाराचे अशी दोन शास्त्रशुद्ध कुंडे श्री. नागले यांच्याकडून दिवसरात्र खपून तयार करुन घेतली. त्याचवेळी श्री. वासुदेव निवासातील पण गार्हपत्य, आहवनीय, दक्षिणाग्नि अशी तीन वैशिष्ट्यपूर्ण कुंडे श्री. अग्निहोत्री बुवांनी तयार करून घेतली. याप्रमाणे सर्व व्यवस्था सुसज्ज होताच स्वयंसेवकांची बैठक पं. दातेशास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात श्री. ना. गो. दाते यांनी प्रमुख-प्रमुख वीस पंचवीस खात्यांची नावे सांगून, प्रत्येक खाते प्रमुखाचे नाव, त्याने करावयाचे काम, त्याला लागणारे साहित्य व त्याची बसायची जागा या गोष्टी व्यवस्थित समजावून दिल्या. श्री. वासुदेव निवासातील सर्व कार्यक्रमांची व्यवस्था श्री. आबासाहेब देशपांडे आणि त्यांच्या सुविद्य पत्नि सौ. मंदाताई यांच्यावर सोपविण्यात आली त्यांच्या मदतीस वे. मू. हरिश्चंद्र जोशी, शंतनु धर्माधिकारी, प्रकाश नाईक, श्री. बाळासाहेब कोंढरे, सौ. महाजन, सौ भेडसगावकर (सांगली), सौ. ज्ञानपुरे इ. मंडळी होती. श्री. कैलास शिंदे हा आपला टेंपो घेऊन चोवीस तास सेवेस हजर होता. मोठाली भांडी, धान्याची लहान-मोठी पोती अगर कोणतेही अवजड सामान असो ही मंडळी मोठ्या आनंदाने ने-आण करीत होती. याला एकच कारण प. पू. दत्तमहाराजांचा सोहळा चांगल्या प्रकारे व्हायला हवा हीच त्यामागील भावना. नेलेल्या आणलेल्या वस्तूंची व्यवस्थित नोंद ठेवण्याचे मोठ्या जिकिरीचे काम श्री. भुसारी करीत होते.

धार्मिक कार्यक्रमात रौप्यतुलेइतकेच गोप्रदानाचे महत्व होते. त्याकरिता सुलक्षणांनी युक्त व शास्त्राला संमत असलेली गाय शोधण्याचे काम सुरु झाले. डॉ. बसंतराव जोशी वे. मू. कृष्णा आर्वीकर यांच्यासह कधी सातारा, कधी खेड-शिवापूर असे फिरत-फिरत फलटणला प्रा. श्री. दिक्षित यांच्याकडे आले. तिथे चौकशी करता करता योग्य अशी सवत्स धेनू त्यांना आढळली ती घेण्याचे निश्चित ठरले. उत्सवाच्या आधी पंधरा दिवस रात्री दहाच्या सुमारास या धेनूचे श्रीवासुदेव निवासात शुभागमन झाले. श्री. माळीबुवांनी प. पू. महाराजांच्या सांगण्याप्रमाणे चाफा व प्राजक्ताच्या झाडाखाली सुंदर गोठा तयार करून ठेवला होता. ही सवत्स धेनू-बकुळी आश्रमाच्या दारात येताच सौ. संध्या आर्वीकरांनी

तिच्या पायांवर पाणी घालून औक्षण केले. तिच्या बछड्याला कुरवाळले आणि त्यांच्यापाठोपाठ ती सवत्स बकुळी गोठ्यात गेली. श्री. माळीबुवांची सकाळ-संध्याकाळ गोसेवा सुरू झाली. दामोदर आर्वीकर नित्यनेमाने धार काढू लागले. उत्सवाच्या आधी आठ दिवस कळमनुरीचे श्री. शिवरामपंत तांबोळी स्वयंसेवक म्हणून आश्रमात आले. बकुळीला पाहता त्यांना अतिशय आनंद झाला. त्यांनी आता गोसेवा आपल्याकडे घेतली. त्यामुळे बकुळीचे फारच लाड होऊ लागले.

बुधवार दि. ९ रोजी वासुदेव निवासात वे. मू. राजाराम कुलकर्णी सपत्नीक अग्निनारायणासह आले. कोल्हापूरहून सोमयाजी मोरेश्वर भट्ट जोशी (दिक्षित), कर्नाटकातील वे. शा. सं. श्रौती ब्रह्मश्री बिष्टेश दिक्षित, श्रीक्षेत्र नृसिंहवाडीहून वे. मू. अवधूत बोरगांवकर, वे. मू. सोलापूरकर, वे. मू. दिगंबर शास्त्री पुट्टु पुजारी यांच्याबरोबर पुण्याचे वे. मू. कात्रेही आले. दुसरे दिवशी धारवाडहून पं. भालचंद्र शास्त्री उप्पिन-बेटगिरींचे सपरिवार, तर काशीहून पं. गणेश्वर शास्त्री द्रविड आणि विदिशाहून पं. लोहकरे यांचे आगमन झाले. गुरुवारी अग्निमंथन होऊन रीतसर तिन्ही कुंडात अग्निनारायणांची स्थापना झाली. अकराच्या सुमारास पौर्णिमासेष्टि झाली. शुक्रवार दि. ११ पासून बुधवार दि. १६ पर्यंत रोज एक नवीन याप्रमाणे वेगवेगळ्या काम्येष्ट्या पुढीलप्रमाणे याठिकाणी झाल्या. या सर्व इष्ट्या प. पू. दत्तमहाराजांच्या इच्छेप्रमाणेच सहसा न केल्या जाणाऱ्या, अशा वैशिष्ट्यपूर्ण करण्यात आल्या.

शुक्रवार दि. ११ रोजी पापक्षय करणारी वैश्वानरेष्टि, शनिवारी दि. १२ रोजी प्रायश्चित्त पूर्वक आत्मशुद्धी करणारी व्रातपतीष्टि, रविवार दि. १३ रोजी कायिक वाचिक मानसिक, ज्ञात-अज्ञात पापाचा क्षय करून परमेश्वराचे प्रेम संपादन करून देणारी पवित्रेष्टि झाली. प. पू. महाराजांचे जन्मनक्षत्र विशाखा त्याची देवता इंद्राग्नि, या शिवाय अग्नि व अनुमति या दोन देवतांचे याग व उपहोमादि होऊन पापक्षय करून दीर्घायुरारोग्य देणारी त्यांच्या नक्षत्राची इष्टि सोमवार दि. १४ रोजी झाली. आयुष्याची वृद्धी करणारी आयुष्कामेष्टि मंगळवार दि. १५ रोजी तर बुधवार दि. १६ रोजी श्रीप्राप्ती करून देणारी व शत्रूंचा पराजय करून सन्मित्र प्राप्ती करून देणारी मित्रविंदेष्टि झाली.

या सर्व इष्ट्यांचे यजमानपद चार्तुमास्य याजी अग्निहोत्री राजाराम कुलकर्णी यांनी भूषविले होते. तर सोमयाजी मोरेश्वर भट्ट दिक्षित-ब्रह्मा, वे. मू. अवधूत भट्ट बोरगावकर-होता, वे. शा. सं. माधवशास्त्री पुजारी (श्रीक्षेत्र नृसिंहवाडी) - आग्नीध्र, वे. शा. सं. अनंतशास्त्री कात्रे अध्वर्यु होते. बाकीचे ऋत्विज सदस्य होते. याचवेळी देवघरातील श्रींच्या पादुकांवर लघुन्यास-महान्यासपूर्वक रुद्र व पवमान एकादष्णीचा अभिषेक वे. मू. अनिल पुजारी अन्य वैदिकांच्या मदतीने रोज सात दिवस करीत होते. पुढील सभामंडपात वे. मू. जगन्नाथ धर्माधिकारी, वे. मू. चंद्रशेखर उप्पिनबेटगिरी, पं. भालचंद्रशास्त्री पुजारी, (नृसिंहवाडी) इ. वैदिक मंडळी शतचंडीचे पाठ करीत होती.

बुधवार दि. ९ मे रात्री नऊची वेळ. श्री. वामन निवासाच्या कमानीच्या मोठ्या दाराजवळ एक अँबेसीडर थांबली. त्यातून श्री. रघुनाथराव खाली उतरताच पाठोपाठ प. पू. दत्तमहाराज खाली उतरले. उपस्थित भक्तगणांच्या जयघोषातच ते आपल्या खोलीत गेले. सेवेसाठी निम्बकर पति-पत्नी, श्री. श्यामराव दिक्षित, श्री. रघुनाथराव कुलकर्णी आदि मंडळी होते.

गुरुवार दि. १०, सकाळी सात वाजल्यापासूनच सगळेच खाते प्रमुख आपापले खाते सज्ज करण्यात रंगून गेले होते. चप्पल स्टँडवर, एक महिनाभर खपून तयार केलेले नंबर्स व्यवस्थित लावण्याचे काम श्री. सकपाळ आणि श्री. गायकवाड करीत होते तर समोरच प. प. शिवोमृतीर्थांच्या स्टॉलच्या शेजारीच श्री. वासुदेव निवासाचा मोठा बुक स्टॉल श्री. दामले, श्री. पारकर, श्री. कानिटकर, श्री. कुलकर्णी आणि श्री. सबनीस आकर्षकपणे लावत होते. स्टॉलच्या पुढे गेल्यानंतर स्वागत कक्ष होता. या कक्षाच्या

मागेच समितीचे सुसज्ज कार्यालय होते. या कार्यालयात सर्व ट्रस्टी, पं. दातेशास्त्री, श्री. साबळे शेठजी, श्री. ब्रह्मे, श्री. राजाभाऊ जोशी, श्री. लाटे इ. मंडळी रात्रंदिवस उपस्थित राहून कार्यकर्त्यांच्या अडचणी सोडविण्याचे आणि इतर सर्व गोष्टींचा समन्वय साधण्याचे काम करीत होती. कार्यकर्त्यांना केव्हाही पैशाची चणचण भासू नये म्हणून समितीने याच ठिकाणी श्री. शृंगारपुरे यांना पैशाची देवाणघेवाण करण्यासाठी म्हणून एक स्वतंत्र खाते उघडून दिले. जवळच्याच खोलीत दि सांगली बँकेने पाहुण्यांच्या व आश्रमाच्या पैशाची देवाण-घेवाण करण्यासाठी म्हणून स्वतंत्र कार्यालय उघडले होते. स्वागत कक्षात श्री. सावंत गुरुजी (बार्शी), श्री. शहापूरकर, श्री. मुजुमदार पाहुण्यांचे हसत स्वागत करून त्यांना ओळखपत्र देत होते. प्रकाश नाईक, फडके, प्रशांत कदम पाहुण्यांना खोली नंबर दाखवित होते, तर देवेंद्र जोशी ब्रह्मवृंदांना त्यांच्या स्वतंत्र कक्षात नेऊन पोहोचवत होते. हॉलच्या मागील बाजूस कोठी प्रमुख श्री. माळीबुवा आणि श्री. पेळपकर, श्री. टापरे आणि श्री. सावंत यांच्या मदतीने कोठीची मांडामांड करीत होते. रोजच्या भाजीपाल्याची व पक्वांनांची 'संपूर्ण जबाबदारी श्री. राजू कुलकर्णीवर होती. त्यामुळे जवळच्याच मोकळ्या जागेत आणलेला भाजीपाला इतरांच्या मदतीने व्यवस्थित लावण्यात तो गर्क होता. या सर्व कार्यकर्त्यांचे वेळोवेळी कौतुक करून त्यांची पाठ थोपटून त्यांना 'आगे बढो' म्हणून उत्साहित करण्याचे काम प. प. श्री. गजाननआश्रम स्वामी महाराज करीत होते.

ही सगळी गडबड चालू असताना हॉलमधील स्टेजवर ब्रह्मवृंद शांत चित्ताने उदकशांतीची मांडामांड करीत होते. थोड्याच वेळात प. पू. महाराजांचे आगमन झाले व उदकशांत सुरू झाली. जवळ जवळ दोन तास पर्यंत हा कार्यक्रम चालला होता. कार्यक्रम संपताच आम्रपल्लवांनी समंत्रक पवित्र जलसिंचन उपस्थितांवर केले गेले. त्यानंतर जन्मापासून घडलेल्या ज्ञाताज्ञात पापक्षयपूर्वक आत्मशुद्धीसाठी कूष्माण्ड होम संपन्न झाला.

शुक्रवार दि. ११ उजाडला. मंगलमय सनईचे मंजुळस्वर वातावरण पवित्रमय करू लागले. थोर उपासक श्री. आबासाहेब पटवर्धन यांच्याकडून आणलेला पारंपारिक मोठा देव्हारा स्टेजवर ठेवला होता. श्री. गायकवाडांनी त्याला पॉलिश केल्यामुळे तो अधिकच खुलून दिसत होता. या सुंदर देव्हाऱ्यात श्री गुरु महाराजांच्या पादुका श्री. दत्तात्रेयांच्या फोटोसमोर ठेवलेल्या होत्या. या देव्हाऱ्याच्या दोन्ही बाजूस दोन आगळे-वेगळे नाविन्यपूर्ण तक्ते ठेवलेले होते. एका तक्त्यावर मध्यभागी प. पू. दत्तमहाराजांचा फोटो लावला होता व त्यांच्या भोवताली दहा पैशाची हजार नवीन नाणी अशा खुबीने बसविली होती की दुरून तो पौर्णिमेचा चंद्रच वाटावा परंतु, चांद्रमासाप्रमाणे ८० वर्षात एक हजार चंद्र कसे पाहिले जातात हे त्यात दाखविले होते तर दुसऱ्या तक्त्यावर ८१ हा मोठा आकडा काढून त्यावर सौर वर्षाप्रमाणे १००० चंद्र कसे पाहिले जातात हे आकडेवारीने दाखवून दिले होते. हे अभूतपूर्व तक्ते नागपूरच्या श्री. दिवाणजी यांनी पाच सहा महिने खपून तयार केले होते. अशा या दोन तक्त्यांमधील असलेल्या देव्हाऱ्यासमोर बसून कार्यवाहांनी गुरुदेवांची प्रार्थना करून साष्टांग नमस्कार घातला व ते पुढील कार्यास लागले. वे. मू. कल्याण कानडे, वे. मू. दत्ता सप्रे, वे. मू. गोविंदराव आर्वीकर हे अन्य वैदिकांच्या मदतीने पुण्याहवाचनाची तयारी करीत होते. अन्य स्वयंसेवक हॉलमध्ये पारायणांची तयारी करण्यात गुंतले होते. मांडलेल्या ३०-३५ चौरंगावर रंगीत वस्त्रे घातली जात होती. बसायला दर्भासन तर टेकायला रंगीत पाट ठेवले जात होते. त्यामागील बाजूस पारायणांच्या नावाचे फलक लावले जात होते. हे सर्व लहान फलक व मोठे आकर्षक बॅनर्स श्री. शिवाजी सूर्यवंशी (प्राथमिक शिक्षक) यांनी पूर्ण सेवाभावाने अल्पावधीत करून दिले. प. पू. महाराजांच्या हस्ते पुण्याहवाचन होऊन संकल्प होताच वैदिक मंडळी व अन्य पारायणकर्ते आपापल्या जागी स्थानापन्न झाले. ऋग्वेद, शुक्ल-

कृष्ण यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद, काण्वशाखा यांचे वेदस्वर हॉलचा परिसर भारून टाकू लागले. यामध्ये वाल्मिकी रामायण, श्रीमद्‌भागवत, प. प. टेंबेस्वामी महाराजांचे समग्र वाङमय याबरोबरच श्री गुरु चरित्र, श्री दासबोध, श्री ज्ञानेश्वरी, श्री गाथा या अमोलिक ग्रंथांची अमरवाणी त्यात मिसळून जात होती. वे. मू. येलगुर्द भट्ट (धारवाड) यांच्या पौरोहित्याखाली मध्यभागी अनेक सुवासिनी शक्तिदेवतेचे पूजन कुंकुमार्चनाने करीत होत्या. हे पूजन सात दिवस नित्य-नियमाने चालले होते. हॉलच्या बाहेरील बाजूस उजव्या हाताला संहितास्वाहाकाराची तयारी चालली होती. श्री. आबासाहेब पटवर्धन यांच्याकडून आणलेल्या दुसऱ्या देव्हाऱ्यात देवतांची स्थापना केली गेली.

सर्व प्रसंगाचे चित्रण करण्याचे काम श्री. विलास पाठक, आनंद प्रभुणे करीत होते. त्यांना श्री. मनोज तांबोळी, श्री. अजित कवीश्वर वेळोवेळी मौलिक सूचना देत होते. या चित्रीकरणाबरोबरच श्री. भागवत (दौंड) व श्री. अविनाश भोपटकर यांचे सातही दिवस मोजक्या प्रसंगांचे फोटो काढण्याचे काम चालले होते.

वे. मू. भगवान पाध्ये, वे. मू. रेणुकादास, वे. मू. देवेंद्र जोशी, वे. मू. कल्याण कानडे यांच्यासारख्या तरुण वैदिकांनी अग्निमंथन केले. अग्निनारायणाची स्थापना केली गेली. प. पू. दत्तमहाराज व पू. सौ. आईसाहेब यांच्या हस्ते संकल्प होताच वे. मू. प्रभाकर भट्ट कोडणीकर यांनी आचार्यपद स्विकारले. ब्रह्माची सुपारी वे. मू. घनपाठी आठल्ये गुरुजी (रत्नागिरी) यांना दिली आणि प्रथितयश वेदाचार्यांच्या उपस्थितीत संहिता स्वाहाकार सुरु झाला. संहिता स्वाहाकारापासून थोड्या अंतरावर श्रीमद् भागवतांतील दशमस्कंधाचे हवन पं. दत्तात्रय शास्त्री तेलंग (नागपूर), पं. देवीदास धर्माधिकारी (आंबेजोगाई), पं. पारखीशास्त्री (पुणे) यांच्या उपस्थितीत झाले. याचे आचार्यत्व पं. दादाशास्त्री जोशी (बार्शी) यांनी भूषविले होते. याच वेळेस हॉलच्या डाव्या बाजूला श्री. गणेशयाग सुरु झाला. याठिकाणी रोज क्रमशः विष्णुयाग, रुद्रयाग, सौरयाग, देवीयाग, श्रीदत्तयाग, चंडीयाग झाले. या यागांचे रोजचे यजमान वेगवेगळे असले तरी शतचंडी यागाचे यजमान मात्र प. पू. दत्तमहाराज होते.

औदुंबराखाली सौ. नीलाताई जोशी, सौ. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली भक्तगणांनी 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' या अष्टादश नाममंत्राचा टाळांच्या तालावर घोष सुरु केला. या सर्व ठिकाणी आकर्षक रांगोळी काढण्याचे काम महानगरपालिकेतील थोर रंगावलीकार श्री. थिटे रोज रात्रीच बिनबोभाट पणे करून जात असत. चाललेल्या या सर्व गोष्टींमुळे सगळे वातावरण इतके भारून गेले होते की, मध्यंतर केव्हा झाला व दहा केव्हा वाजले हे मंडळींना कळत नसे. ब्रह्मवृंदाच्या अल्पोपहाराची व्यवस्था सौ. भोपटकर व सौ. सुमनताई देशपांडे आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने चोख बजावीत होत्या तर तिकडे हौदाजवळ केवल मश्रू (वसई), त्यांच्या भगिनी आणि इतर स्वयंसेवक इतरांच्या चहापानाची व्यवस्था करण्यात गुंतले होते. दोन्ही वेळा चहा आणि अल्पोपाहार पुरविण्याचे काम श्री. वासुदेवराव करंबळेकर आणि त्यांची मंडळी सात दिवस बिनचूकपणे करीत होती.

स्टेजची सर्व जबाबदारी श्री. ना. गो. दाते यांच्याकडे होती. सर्वांना कामाच्या सूचना देऊन ते स्टेज सजावटी करण्यात व्यस्त झाले. त्यांचे मदतनीस श्री. सावंत, श्री. गुमास्ते, श्री. शिंदे आणि श्री. लोहकरे होते. श्री. मेहेंदळयांच्या टेम्पोतून मोठी तैलचित्रे आणली गेली. श्री. म्हसवडकरांनी आणलेल्या सजावटीच्या साहित्याने स्टेज सजवले जात होते. स्टेजच्या मध्यभागी प. पू. गुळवणी महाराजांनी काढलेला श्री दत्तात्रेयांचा फोटो, त्याच्या दोन्ही बाजूला प. प. टेंबेस्वामी महाराज व प. प. दिक्षित स्वामी महाराज यांची तैलचित्रे होती. प. प. टेंबेस्वामी महाराजांच्या शेजारी प. पू. गुळवणी महाराज, तर प. प. दिक्षित स्वामी महाराजांजवळ प. पू. दत्तमहाराजांचे तीर्थरुप पू. धुंडिराजशास्त्री

महाराजांचे तैलचित्र होते. सुंदर जरीचे काठ असलेली वस्त्रे त्यांना घातली गेली. श्रीमंत दगडूशेठ हलवाई यांच्याकडून आणलेल्या तीन फूट उंचीच्या मोठ्या पितळी समया कमळासमोर ठेवण्यात आल्या. याच ठिकाणी श्री. अकोलकर आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीने स्पीकर, माईक, रोषणाई, फ्लड लाईटस् यांची व्यवस्था करण्यासाठी धावपळ करीत होते, कारण संध्याकाळी पुण्याचे कलेक्टर श्री. श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन होऊन कार्यक्रमाचे उद्घाटन होणार होते. यामुळे कुठेही कमतरता न पडण्याची खबरदारी घेतली जात होती.

दुपारचा एक वाजला, वैदिक मंडळी व पारायणकर्ते आपापल्या कक्षात गेले. श्री. मधु पित्रे, श्री. राजू कुलकर्णी, श्री. मनोहर पाध्ये पति-पत्नी (मुंबई), श्री. माधवराव, मनोज तांबोळी पिता-पुत्र, वे. मू. हरिश्चंद्र जोशी, सौ. भोपटकर यांनी हॉलची साफसफाई करून चटकन भोजनाची व्यवस्था केली. यांच्या अनुभवी मार्गदर्शनाखाली पुणेकर व मुंबईकर मंडळी भोजन व्यवस्था पाहू लागली. ब्रह्मवृंदांची भोजनाची व्यवस्था स्वतंत्रच केली असल्यामुळे त्याठिकाणी सौ. सुमनताई देशपांडे, सौ. संध्या आर्वीकर इ. मंडळी मोजक्या स्वयंसेवकांच्या मदतीने त्यांची व्यवस्था करीत होत्या. चार पाच वाजेपर्यंत पहिल्याच दिवशी सात-आठशे लोकांनी प्रसादाचा लाभ घेतला. हॉलमधील हा महाप्रसाद आटोपताच याच ठिकाणी मंत्र जागराची तयारी सुरु होई. प. पू. दत्तमहाराज आपल्या आसनावर स्थानापन्न होताच ऋग्वेद, यजुर्वेद, (शुक्ल; कृष्ण) सामवेद, अथर्ववेद या चारी वेदांचा रोज क्रमश: मंत्रजागर सुरु होई. श्रवण करण्यास सौ. आईसाहेब, पू. सौ. ताईमहाराज व अन्य भक्त मंडळी आवर्जून उपस्थित रहात असत.

संध्याकाळी साडेसहाच्या सुमारास पुण्याचे कलेक्टर श्री. श्रीनिवास पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन होऊन कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. श्री. साबळेशेठजी, प्राचार्य केरुर, पं. दातेशास्त्री, श्री. राजाभाऊ जोशी यांनी तैलचित्रांना हार घातले. निवेदिका सौ. शुभदा दाते (ठाणे) यांच्या सुंदर निवेदनाने कार्यक्रमास सुरुवात झाली. गौरव ग्रंथाचे प्रकाशन, चरित्र ग्रंथाचे प्रकाशन याचबरोबर ह.भ.प. साखरे महाराज, मुळे शास्त्री, गणेश्वर शास्त्री द्रविड, प्राचार्य शिवाजीराव भोसले, सु. ग. शेवडे, सौ. उमा देशपांडे इ. ची प्रवचने झाली. तसेच पं. छोटा गंधर्व, अविनाश सहस्रबुद्धे यांच्या गायनाबरोबरच सौ. निलाताई जोशींनी प. पू. महाराजांचा लहान मुलांच्या हस्ते सत्कार केला. ह.भ.प. (माऊली) काळे बुवा यांचे वारकरी संप्रदायाचे भजन व ह.भ.प. नारायणबुवा गोडबोले (जमखिंडी) यांचे कीर्तन रात्री झाले.

दिवसेंदिवस पाहुण्यांची संख्या वाढू लागली. त्यामुळे निवास व्यवस्था अपुरी पडू लागली. श्री. बेडेकर, श्री. सावरकर, श्री. शरद नाटेकर व शेजारील इमारतीतील लोकांनी आपल्या मोकळया जागा आनंदाने भक्तगणास वापरण्यास दिल्या. लोकांच्या वाढत्या संख्येमुळे प्रसाद व्यवस्थेत देखील संकष्टीपासून बदल करावा लागला. हॉलमध्ये सोवळयाच्या पंक्ती तर बाहेरील सभामंडपामध्ये भंडारा स्वरुप जेवणाच्या पंक्ती अशी सोय करण्यात आली. एके दिवशी श्री. म्हसवडकरांनी हापूस आंब्याच्या ३० पेट्या आणल्या. परगावच्या भगिनींनी मोठमोठाली पातेली भरून आंबरस तयार केला. पू. सौ. ताई महाराजांना सभामंडपात आणले. त्यांनी सर्वांवर नजर टाकली. सर्वांना तोंडभर आशीर्वाद दिले आणि सांगायचे आश्चर्य म्हणजे आंबरसासारखा पदार्थ सर्वांना पुरून उरला. लग्न सराईचे दिवस असल्यामुळे कामगार मिळणे कठीण होते. पोळ्यांची तर अत्यंत आवश्यकता होती. पोळ्या करण्याची जबाबदारी श्री वासुदेव निवास भजनी मंडळातील भगिनी वर्ग सौ. कोचक, सौ. शालिनीबाई इत्यादिंनी मोठ्या नेटाने पार पाडली.

सभा मंडपात चाळीस चाळीस पानांच्या पंधरा पंधरा पंक्ती ओळीनें बसत असत. प्रत्येक पंक्तीला चार याप्रमाणे वाढणाऱ्यांचे गट केले होते. श्री. घोलकर, श्री. निम्बकर, श्री. बोडस,

श्री. अनिल कवीश्वर इ. गटप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली मुंबईकर, पुणेकर व इतर परगांवची मंडळी एकजूटीने वाढण्याचे काम करीत होती. श्री. ना. गो. दाते, श्री. शरद जोशी, श्री. शंतनु धर्माधिकारी माईक वरून वाढण्यासंबंधी सूचना देत होते. प्रत्येक पंक्तीत हिंडून सर्वांना सर्व पदार्थ व्यवस्थित मिळाले आहेत ना याची खात्री करून घेत होते. इंदुले भगिनी व गश्रु भगिनी कु. उमा, नीला आणि वर्षा पाणी वाढत होत्या. हॉलमधील पंगत असो अगर मांडवातील पंगत असो प्रत्येक ठिकाणी पू. सौ. आईसाहेब सुना, लेकींसह जातीने उपस्थित राहून प्रत्येकाला हवे नको विचारीत होत्या. पं. पारखी शास्त्री प्रत्येक पंक्तीत हिंडून हात जोडून 'सावकाश होऊ द्या' असे मोठ्या प्रेमाने सर्वांना सांगत होते. सर्वच दृश्य मोठे विलोभनीय होते.

सगळे कार्यक्रम संपून रात्रीच्या भोजनाला नऊ वाजत होते. कधी खिचडी तर कधी पिठले भात याप्रमाणे रात्रीचा बेत असे. रात्रीचे जेवण साधेच असले तरी सौ. गोरेंच्या साध्या आणि मिक्स लोणच्याने जेवणात एक वेगळीच खुमासदारी यायची.

दिवसेंदिवस लोकांची गर्दी एवढी वाढू लागली की त्यांना सकाळ-संध्याकाळचे कार्यक्रम पाहणे अशक्य होऊ लागले. दि. १७ आणि दि. १८ हे दिवस अत्यंत महत्वाचे. त्यादिवशी तुफान गर्दी होणार याची कल्पना कार्यकर्त्यांना आली. सर्वांना कार्यक्रम पाहता यावे म्हणून क्लोज सर्किट टी.व्ही.ची योजना श्री. शशांक खोपकर यांच्या मदतीने आखली गेली. सभामंडपात दोन व हॉलमध्ये एक याप्रमाणे रंगीत टी.व्ही. ठेवले गेले. पंक्ति पाठोपाठ पंक्ति उठत होत्या. दोन पंक्तित फारसे अंतर पडत नव्हते. याला कारण होत्या, सौ. राधाबाई आणि त्यांच्या सहकारी ! प. पू. श्रीयोगीराजांच्या वेळेपासून आश्रमात सेवा करणाऱ्या सौ. राधाबाई एवढे कष्ट पडत असून देखील सतत हसतमुख असत. सकाळपासून संध्याकाळपर्यंत भांडी घासून सफाई करून त्यांच्या हातांची अवस्था काय होत असावी पण प. पू. महाराजांच्या सोहळ्यापुढे त्यांना त्याची जरासुद्धा फिकीर वाटत नव्हती.

गुरुवार दि. १७ रोजी सकाळी दहाच्या सुमारास गोप्रदानाच्या कार्यक्रमासाठी सभामंडप भक्तजनांनी भरु लागला. इतके दिवस आश्रमात असलेली खिलार जातीची पांढरीशुभ्र सवत्स धेनू-बकुळी सभामंडपात आणली गेली. गोप्रदानाचा कार्यक्रम सुरु झाला. गाईला सोन्याचांदीच्या दागिन्यांनी, अलंकारांनी व उत्तम वस्त्रांनी नटविले गेले.

या सर्व कार्यक्रमाचे पौरोहित्य करणाऱ्या वे. मू. येलगुर्दभट्ट (धारवाड) यांनी प. पू. दत्तमहाराजांना पुढील प्रमाणे संकल्प सांगितला 'मम निखिल दुरित दौर्भाग्य दु:स्वप्न, धनधान्य, द्विपद चतुष्पद शांतिपूर्वक गोरोमतुल्य वत्सरावधि सकल भोग परिपूर्ण स्वर्गलोक प्राप्तिकाम: श्री परमेश्वर प्रीत्यर्थं सवत्स गोप्रदानमहं करिष्ये' असे म्हणून प. पू. दत्तमहाराजांनी वे. मू. राजाराम अग्निहोत्री यांना ही सालंकृत सवत्स धेनू दान केली. या संकल्पाचे सोप्या आणि सुंदर भाषेत पंडित दादाशास्त्री जोशी (बार्शी) यांनी विवरण केले. हा अपूर्व सोहळा हॉलमधील लोकांना टी. व्ही. वर स्पष्ट दिसत होता. हा कार्यक्रम संपल्यानंतर प. पू. दत्तमहाराजांनी शक्तिपीठाचे आचार्य प. पू. विमलानंदतीर्थ स्वामी महाराजांचे दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले. सर्व सोहळ्याचे अवलोकन करीत 'बहोत अच्छा' असे म्हणत स्वामींनी सर्वांचेच कौतुक केले. थोड्याच वेळात हॉलच्या उजव्या बाजूस वैदिकांच्या उपस्थितीत दत्तमहाराज व पू. सौ. आईसाहेब यांच्या हस्ते संहिता स्वाहाकाराची पूर्णाहुति झाली. लगेचच त्यांच्याच हस्ते चंडीयागाची पूर्णाहूति होऊन वैदिकांचे पूजन प. पू. महाराजांच्या हस्ते केले गेले. त्याच सुमारास हॉलमध्ये कुमारी पूजनाची तयारी चालली होती. सुंदर वस्त्रे परिधान केलेल्या छोट्या छोट्या मुली पाटांवर बसल्या होत्या. सौ. सविता कवीश्वर, सौ. तांबोळी, सौ. संध्या आर्वीकर कुमारीकांचे पाय धुवून पूजा करीत होत्या. त्यांचे वस्त्र दक्षिणा

देऊन औक्षण केले जात होते. हे साग्रसंगीत कुमारी पूजन सांगण्याचे काम पं. आनंदशास्त्री पारखी व वे. मू. दत्ता सप्रे करत होते. यांच्याबरोबरच पाच सुवासिनींची खणानारळांनी ओटी भरली गेली. उत्सवाच्या या काळात पू. सौ. आईसाहेबही साडी चोळी व सौभाग्याचे लेणे सुवासिनींना देऊन त्यांचा सत्कार करीत होत्या.

याच दिवशी संध्याकाळी प. पू. दत्तमहाराजांचा करवीर पीठाचे शंकाराचार्य श्री. प. प. १००८ विद्याशंकरभारती व कुडली पीठाचे शंकराचार्य श्री. प. प. १००८ योगाभिनवनृसिंह भारती यांच्या हस्ते मानपत्र देऊन सत्कार होणार होता. प. पू. महाराज स्वामींच्या समकक्ष बसणार नाहीत हे ध्यानात घेऊन स्टेजची मांडणी विशिष्ट पद्धतीने केली होती. मध्यभागी प. पू. महाराज व सौ. आईसाहेब यांची सिंहासने गालिच्यावर तर त्यांच्या दोन्ही बाजूस थोड्या उंचीवर स्वामी महाराजांची सिंहासने ठेवली होती मागील बाजूस पू. सौ. ताईमहाराज व अन्य मान्यवरांच्या खुर्च्या योग्य ठिकाणी मांडल्या होत्या. मुख्य कमानीपासून स्टेजपर्यंत पायघड्या घालून त्यावर गुलाब पसरले होते. या पायघड्यांच्या दोन्ही बाजूस हातात मंगलारती घेऊन सुवासिनी महाराजांना औक्षण करण्यासाठी उभ्या होत्या. कमानीच्या दारात महाराजांचे पाऊल पायघड्यांवर पडताच लोकांनी जयघोष सुरु केला. प्रत्येकीच्या मंगलारतीत ओवाळणी टाकीत टाकीत प. पू. दत्तमहाराज हळू हळू पुढे येत होते. स्टेजवर प. पू. दत्तमहाराज आसनस्थ होताच दोन्ही शंकराचार्यांचा व महाराजांचा जयजयकार होऊन सत्कार समारंभास सुरुवात झाली. सौ. दाते यांच्या वेधक, आकर्षक निवेदनाने समारंभाची रंगत हळूहळू वाढत चालली. सत्काराचा हा सोहळा जवळ जवळ अडीच ते तीन तास चालला होता. यात प. पू. महाराजांना हार व मानपत्रे अर्पण केली गेली. मुख्य मानपत्र पं. पारखी शास्त्रींनी वाचून दाखविले. श्रीमती सुशीला मोडक, श्री. राजाभाऊ जोशी, प. पू. शंकराचार्य करवीर पीठ इ. ची गौरवपूर्ण भाषणे झाली. या सत्काराला प. पू. दत्तमहाराजांनी अतिशय नम्र शब्दात उत्तर दिले आणि कार्यक्रम संपला.

शुक्रवार दि. १८ रोजी प. पू. दत्तमहाराज यांची सहस्त्रचंद्रदर्शन शांति होणार होती. त्याकरिता संहिता स्वाहाकाराच्या कुंडाशेजारी थोड्या अंतरावर प्रशस्त स्थंडिल घातले होते. शुक्ल यजुर्वेदी घनपाठी वे. मू. लक्ष्मीकांत दिक्षित (नासिक) यांनी या शांतिचे आचार्यपद स्वीकारले. त्यांच्या मदतीस त्यांच्याच शाखेचे वे. मू. भानोसे, वे. मू. लोहगावकर, वे. मू. अण्णाजी उपाध्ये हे घनपाठी वैदिक होते. प. पू. महाराजांच्या हस्ते पुण्याहवाचन होऊन ग्रहदेवतांची स्थापना होताच यज्ञास प्रारंभ झाला. या शांतीची देवता चंद्र ही असल्यामुळे 'नवो नवो भवति' या मंत्राने चंद्रदेवतेस हवन केले जात होते. याची पूर्णाहुती होताच प. पू. महाराजांना ८१ निरांजनांनी ओवाळण्यात आले. सलिल-गुड-दुग्धाचे प्राशन होताच आज्यावलोकन झाले. आचार्य व वैदिकांचे महावस्त्र देऊन पूजन होताच प. पू. महाराजांना मंत्रक्षता दिल्या गेल्या. प. पू. महाराजांनी त्यांना वंदन केले. वैदिकांनी दीर्घायुरारोग्य लाभो असे आशीर्वाद देताच प. पू. महाराज पुढील कार्यक्रमाकरीता निघाले.

प. पू. महाराजांची वाट पहात जवळ जवळ सात आठ हजार माणसे सभामंडपात बसली होती. प. पू. महाराजांच्या प्रेमापोटी तळपणारे ऊन व जीवाची घालमेल करणारा उकाडा यांची त्यांना यत्किंचितही पर्वा वाटत नव्हती. अंथरलेल्या पायघड्यांवरील गुलाबाच्या नाजूक पाकळ्यांवरून महाराजांची कोमल पाऊले जसजशी पुढे पुढे पडत येत होती तसतसे त्यांचे दर्शन घेण्याकरीता म्हणून लोकांची एकच धडपड चालली होती. सगळ्यांचेच मंगल चिंतीत, चिंतीत, आशीर्वाद देत देत साधारण १२।। च्या सुमारास महाराज स्टेजवर पोहोचले. रौप्यतुला दानाचा कार्यक्रम स्टेजवर सुरु झाला. डॉ. श्री. वाघण्णा, श्री. नगरकर सराफ आदि मान्यवर व्यक्ती स्टेजवर उपस्थित होत्या. अध्यक्ष पं. दातेशास्त्री यांचा चांदीची समई देऊन तर

कार्यवाह वे. मू. कृष्णा आर्वीकरांचा सोन्याची अंगठी बोटात घालून प. पू. महाराजांनी सत्कार केला. त्यांच्याबरोबरच त्यांच्या सौभ्याग्यवतींचा पण सत्कार होताच वैदिकांच्या मंत्रघोषात तुलादानाचा कार्यक्रम सुरु झाला. प. पू. महाराजांनी तुलेची पूजा करून तिला प्रदक्षिणा घातली व मांडीवर श्री दत्तात्रेयाचा फोटो घेऊन ते तुलेत स्थानापन्न झाले. दुसऱ्या बाजूला चांदी टाकली जाऊ लागली जसजसे पारडे वर जाऊ लागले तसतशी लोकांची उत्कंठा वाढू लागली. पू. सौ. आईसाहेबांनी सोन्याचे तुळशीपत्र टाकले. तराजू समतोल झाल्याचे दिसताच लोकांनी टाळ्यांचा कडकडाट केला. हे विलोभनीय दृश्य भक्तगणांनी आपल्या डोळ्यात साठवून हर्षातिरेकाने प. पू. सद्गुरु महाराजांच्या नावाचा जयजयकार केला.

नंतर महाप्रसादाला सुरुवात झाली. पाच वाजेपर्यंत हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. महाप्रसादाचा हा कार्यक्रम संपतो न संपतो तोच मुसळधार पावसास सुरुवात झाली. गेले आठ दिवस हा पाऊस संध्याकाळ झाली की धमकावयाला लागायचा. ढगांचा गडगडाट सुरु व्हायचा, विजांचा चकचकाट व्हायचा. पण मेघराज न बरसताच अन्यत्र निघून जायचे. त्यामुळे पुणे परिसरात मुसळधार वृष्टी झाली तरी श्रीवामन निवासात मात्र सुखद गारवा मिळून उकाडा कमी होण्यापलिकडे काही होत नसे ! केवढे हे आश्चर्य ! आणखी एक नवल म्हणजे आदल्याच दिवशी शुक्रवारी सकाळी सर्व पुण्यातील पाणी पुरवठा बंद राहणार असल्याबद्दलची जाहिरात आली होती. त्यामुळे सर्वांनाच शुक्रवारची काळजी होती. पण काय आश्चर्य वामननिवासाचा परिसर सोडून सगळीकडील पाणी गेले आणि दुसरे म्हणजे चोरी तर सोडून द्याच पण सापडलेल्या वस्तूदेखील कार्यलयात आणून दिल्या जात. याची साक्ष देणारी भारी कपडे असलेली गौरव समितीच्या कार्यालयात आणून दिलेली एक पिशवी अद्यापि श्री वासुदेव निवासात मूळ मालकाची वाट बघत थांबली आहे. प. पू. दत्तमहाराजांनी सत्काराला दिलेल्या उत्तरात सांगितल्याप्रमाणे उत्सव काळात या ठिकाणी परमेश्वर शक्तिचा संतत वास होता हे या गोष्टींवरून सिद्ध होते.

अनंतधारांनी कोसळणाऱ्या पावसामुळे नाईलाजास्तव समारोपाची सभा हॉलमध्ये घ्यावी लागली. अनेकांनी आपली भावसुमने प. पू. महाराजांच्या चरणी वाहिली. अध्यक्षांनी सगळ्यांच्या अमौलिक सेवेचे कौतुक केले. थोरामोठ्यांच्या दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार मानले. सर्वांना प्रसादाचे पेढे, लाडू व प्रसाद अंक देण्यात आला. उत्सवातील मधुर स्मृती हृदयात साठवत एकमेकांचा निरोप घेत मोठ्या जड अंत:करणाने मंडळी आपापल्या गावी परतू लागली.

**संकलक : ना. गो. दाते**

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपाद



# अशी झाली – सहस्त्रचंद्रदर्शन – विधी सोहळ्याची ''पायाभरणी''

वर्षा–दीड वर्षापूर्वीचा एक अविस्मरणीय दिवस. प. पू. दत्तमहाराजांच्या वाढदिवसाचा ! त्या दिवशी त्यांनी ८० व्या वर्षात पदार्पण केले होते. सर्वजण महाराजांचे अभिष्टचिंतन करून आशीर्वाद घेत होते. प्रत्येकाच्या मनात एकच विचार होता, हे कृपाछत्र आपल्याला असच अखंड, दीर्घकाळ लाभायला हवय. मग त्याकरिता श्रींची प्रार्थना करायला हवी. गुरुसेवा व्हायला हवी आणि त्याच तळमळीतून सहस्त्रचंद्रदर्शन विधीची कल्पना निघाली. सर्वांनी ती तात्काळ उचलून धरली. श्री. रघुनाथराव कुलकर्णी यांनी लोकांचा हा सत्यसंकल्प श्रींच्या पादुकांपुढे सोडला. प. पू. महाराजांकडून संमती मिळवली. त्यांचे आशीर्वाद घेतले.

लगेचच विश्वस्तांच्या बैठकीत श्री सद्गुरू – गौरव समितीची स्थापना झाली. पं. धुंडिराजशास्त्री दाते यांनी अध्यक्षपदाची अवघड धुरा सांभाळण्याचे मान्य केले आणि त्यांच्या समर्थ नेतृत्वाखाली वे. मू. कृष्णा आर्वीकर (नागपूर), वे. मू. पं. आनंदशास्त्री पारखी (पुणे), वे. मू. पं. उप्पिनशास्त्री बेट्टिगिरी या तरुण आणि उत्साही कार्यवाहांनी हे आव्हान स्वीकारले. पं. दातेशास्त्री यांच्या पंचागातील अधिकारवाणीने तिथी, वार, नक्षत्र पाहून ११ मे १९९० ते १८ मे १९९० हे दिवस निश्चित करून कळवले आणि मग कार्यक्रमाच्या आखणीला विलक्षण वेग आला.

सर्वप्रथम वासुदेव निवासच्या दाराजवळ प. पू. महाराजांच्या सहस्त्रचंद्रदर्शन विधी समारंभास तन–मन–धनाने सहकार्य करण्याचे आवाहन करणारा फलक लावला गेला. गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने येणाऱ्या साधकांना गुरुसेवेची संधी मिळणार याचा झालेला आनंद त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता.

आता पुढचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे सर्वांना पाठविण्यासाठी एक देखणे निवेदन–पत्रक तयार करणे. प्रा. केरुर, वे. मू. कृष्णा आर्वीकर, श्री. नारायणराव दाते, वे. मू. सुहास जोशी, श्री. भगवान पाध्ये, श्री. बनकर आणि श्री. के. जोशी या सर्वांच्या कल्पकतेतून, परिश्रमातून सुंदर आणि संग्राह्य अशी निवेदन–पत्रिका साकारली. महाराजांच्या असंख्य भक्तगणांना ही पत्रिका साक्षेपाने पोहोचविण्यासाठी सौ. गायकवाड, सौ. म्हेत्रस, श्री. भुसारी व अन्य सहकाऱ्यांनी रात्रंदिवस परिश्रम घेतले. म्हणूनच सर्वांना गुरुसेवेचा लाभ घेता आला.

मुंबई, पुणे, नागपूर, मराठवाडा या विभागातील प्रमुख वृत्तपत्रांतून बैठकीकरता पुण्याला

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपाद

येण्याचे आवाहन समितीने भक्त मंडळींना केले. वासुदेव निवासातील साधना मंदिरात बैठक झाली. पं. दातेशास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली घराघरातून निधी गोळा करण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रचंड निधी तर जमलाच पण प्रत्येकाला सेवा करण्याचे भाग्य लाभले व हा उत्सव आपलाच आहे अशी आत्मीयतेची भावना निर्माण झाली.

प. पू. महाराजांच्यावर गौरव ग्रंथ लिहिण्याची जबाबदारी प्रा. केरुर यांनी उचलली. ज्येष्ठ गुरुभक्त श्री. अच्युतराव पोटभरे यांनी श्री वासुदेव निवास हा चरित्र – विशेषांक काढण्याचे निश्चित केले.

आता कामाला गती आली व व्यापही वाढला. तेव्हा फोनच्या सुविधेसकट सुसज्ज कार्यालय श्री. लाटे यांनी श्री. नंदकुमार जोशी यांच्या सहाय्याने उभे केले. कार्यालय–प्रमुख म्हणून श्री. भास्करराव कुलकर्णी काम पाहू लागले.

प. पू. दत्तमहारांच्यामुळे श्री. रघुनाथरावांचा लोकसंग्रहही विलक्षण झालेला. पावतीपुस्तके, निवेदने देण्याचे काम त्यांनी झपाट्याने चालू केले. कार्यालयाकडे मनीऑर्डर्स, ड्राफ्टस्, चेक्स यांचा ओघ सुरू झाला. नोंदी व्यवस्थित होऊ लागल्या.

मुंबईत श्री. माधवराव तांबोळी, श्री. गोडसे, श्री. ढापरे, सौ. नीलाताई जोशी यांनी पायपीट सुरू केली. पुण्यातील श्री वासुदेव निवास भजनी मंडळाने भजनाद्वारा लोकांशी संपर्क साधण्यास सुरुवात केली. सौ. सुमनताई देशपांडे, सौ. भागवत, श्रीमती दुबळे, श्रीमती मोडक, श्री. लाटे, श्री. पारखी शास्त्री, श्री. कोटस्थाने यांनी वैयक्तिकरित्या भेटीगाठी घेण्यास सुरवात केली. गुजराथी भाषेत स्वतंत्र निवेदन काढून श्री. शहापूरकर, श्री. अरगडे, श्री. भट्टभट्ट व श्री. सुधीरभाई यांनी निम्मा गुजराथ पालथा घालून निधी संकलन केले तर मध्यप्रदेशात श्री. हरिलाल अग्रवाल यांनी जनता–संपर्क साधला. आंध्र, दिल्ली, वाराणसी, बेंगलोर, कलमनुरी, खामगाव इ. सर्व ठिकाणी भक्तगण आपले आजारपण विसरून गुरुसेवेसाठी अथक परिश्रम घेत होते. जेमतेम १५,००० वस्तीच्या 'खुर्दा' या लहानशा गावातून वस्तीच्या जवळजवळ दुप्पट रक्कम उभी केली डॉ. गोर्वेकर व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी. जालन्यात सौ. ताई महाराज परिसीमेचे प्रयत्न करीत होत्या. गरुडेश्वर, मारेश्वर या संस्थानांनी आणि कर्नाटकातील वरदपूर, कुरवपूर, शृंगेरीपीठ यांनी सहकार्याचे हात पुढे केले. कार्यवाह श्री.कृष्णाशास्त्री आर्वीकर यांच्या पायाला तर जणू चाकेच लागली होती. त्यांची अविश्रांत भ्रमंती चालू होती.

श्री. म्हसवडकर, श्री. वसंतराव जोशी यांचीही सतत धडपड चालू होती. पाहता पाहता निधीच्या लहान ओहळाचे विशाल गंगा प्रवाहात रुपांतर झाले. अधून मधून पं. दातेशास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कामाचा आढावा घेऊन पुढच्या कामाची योजना आखली जात होती.

आता निवासस्थानाच्या प्रश्नाला सर्वात अग्रक्रम देणे आवश्यक होते. वामन निवासाचा दुसरा मजला तातडीने बांधण्याचा निर्णय विश्वस्तांची संमती आणि प. पू. दत्तमहाराजांच्या मान्यतेने घेण्यात आला. डॉ. वाघण्णा व श्री. लाटे यांच्या कळकळीच्या सहकार्यामुळे कामाला सुरवात झाली आणि कॉन्ट्रॅक्टर गुरुभक्त नागले यांच्या साक्षेपामुळे पाहता पाहता कामाला वेग आला आणि निवासाची सोय झाली. ही व्यवस्थाही अपुरी पडण्याची शक्यता म्हणून श्री. जावडेकरांनी महानगरपालिकेकडून जवळचीच प. दीनदयाळ शाळाही निवासासाठी मिळवून ठेवली.

आता धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची आखणी करण्याचे वेध लागले. वे. मू. कृष्णा आर्वीकर व वे. मू. पं. आनंदशास्त्री पारखी यांनी मान्यवर पंडित, वेदोनारायण, व्यासंगी वक्ते यांचे पत्ते मिळवून दोन अडीचशे विद्वानांना अतिशय आग्रहाची पत्रे पाठवली व प्रवचने व व्याख्याने ठरवली.

त्याचवेळी सुगम संगीतापासून शास्त्रीय संगीतापर्यंत विविधतेने नटलेले सांस्कृतिक कार्यक्रम ठरवले जात होते. प्रवचने, परिसंवाद, मौलिक ग्रंथांची

प्रकाशने, प. पू. दत्तमहाराजांचा सत्कार, तुलादान असे बहुरंगी कार्यक्रम होते. करवीर पीठाचे जगद्‌गुरू श्रीमत् शंकराचार्य, कुडली शृंगेरी पीठाधीश्वर श्री प. प. योभाभिनव नृसिंहभारती स्वामी हे या सत्कार सोहळ्याला अध्यक्ष आणि प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते.

माघ वद्य षष्ठी शके १९११ या दिवशी, प. पू. दत्तमहाराजांचा वाढदिवस. त्या शुभमुहूर्तावर कार्यक्रमाची रूपरेषा निश्चित झाली. सर्वांसाठी म्हणून हिंदीतून निमंत्रणपत्रिका तयार केली. निमंत्रणे पाठवण्याची व इतर सर्व जबाबदारी पुणे–मुंबईच्या कार्यकर्त्यांवर सोपवून पं. दातेशास्त्री व मे. मू. कृष्णा आर्वीकर आंध्रच्या झंझावाती दौऱ्यावर गेले. १५ एप्रिलपर्यंत सर्वांना निमंत्रणे मिळाली.

याच सुमारास प. प. शिरोम्‌तीर्थ स्वामी महाराज शंकराचार्यांची चारी पीठे व अनेक थोर सत्पुरुषांची आशीर्वादपर पत्रे येत होती. प. पू. नानामहाराज तराणेकर यांनी स्वतः आश्रमात येऊन या मंगलकार्याला आशीर्वाद दिला. कांची कामकोटी पीठाचे प. प. जयेंद्र सरस्वती आश्रमात आले. त्यांची पाद्यपूजा केली. त्यांनी प्रसाद म्हणून आपल्या गळ्यातील रुद्राक्षांची माळ प. पू. महाराजांच्या गळ्यात घातली, केवढी ही पुण्याई !

आता सभामंडप व व्यासपीठाच्या रचनेच्या दृष्टीने तयारी सुरू झाली. श्री. दामोदर आर्वीकर यांनी प. प. दीक्षितस्वामी महाराज व प. पू. दत्तमहाराजांचे पिताजी प. पू. श्री धुंडिराजमहाराज यांची भव्य तैलचित्रे काढली. त्यासाठी या कलाकाराचे हात अक्षरशः रात्रंदिवस खपत होते.

श्री. वासुदेव करंबेळकरांनी संपूर्ण उत्सवात भोजन/नाश्ता/चहा यासाठी लागणाऱ्या सामानाची यादी केली आणि साबळे शेठजींच्या ट्रकमधून धान्याची पोतीच्या पोती आणि इतर सर्व सामान, चहा, कॉफी, मसाले, सुका मेवा इ. सामान वासुदेव निवासात उतरत होते. भजनी मंडळातील भगिनी व इतर सेवाभावी भगिनींनी धान्ये निवडण्याचे अवाढव्य पण किचकट काम नेटकेपणाने पार पाडले. लेबल्स लावून पोती, डबे, 'अन्नपूर्णेच्या' सिध्दतेसाठी तयार झाले.

वामन निवासच्या सोसायटीचे सेक्रेटरी श्री. दरडा यांनी आनंदाने सोसायटीचे मैदान देऊ केले व श्री. नारायणराव दाते आणि श्री. नागले यांनी सभामंडपाचा अचूक सर्वंकष आराखडा तयार केला. २५'×१५'×३ चे भव्य स्टेज, ९०'×५०' चा विशाल सभामंडप, प्रवेशद्वाराजवळ चप्पल स्टँड, बुक–स्टॉल यांची योजना, स्वागत कक्ष, चौकशी, कार्यालय अशा अत्यावश्यक सुविधा यांची योजनाबध्द आखणी केली. वामन निवासात सव्वीस खोल्या तयार केल्या. वीज–पंखा– गीझर या सर्व सुविधा सर्वश्री लिमये, अकोलकर व सोहोनी यांच्या मेहनतीने उपलब्ध झाल्या.

वामन निवासात पं. राजेश्वरशास्त्री व पं आनंदशास्त्री पारखी यांनी पंचायतन याग व संहिता स्वाहाकार यांच्यासाठी दोन स्वतंत्र शास्त्रशुध्द कुंडे तयार करून घेतली तर वासुदेव निवासात श्री. अग्निहोत्री बुवांनी गार्हपत्य, आहवनीय आणि दक्षिणाग्नी अशी ३ कुंडे बांधून घेतली. श्री. नारायणराव दाते यांचे नेतृत्वाखाली विविध कामांच्या समित्या तयार झाल्या. समितीप्रमुख व स्वयंसेवक, त्यांची कामे, त्यांच्या जागा या सर्व गोष्टींचे बारीक सारीक तपशील ठरविण्यात आले व प्रत्येकावर त्याच्या त्याच्या कामाची जबाबदारी सोपवण्यात आली.

गोप्रदानासाठी देखणी, सुलक्षणी, सवत्स गाय मिळवणं हेही काम वाटतं तितकं सोपं नव्हतं. अशी शास्त्रसंमत गाय मिळवण्यासाठी श्री. वसंतराव जोशी व वे. मू. कृष्णा आर्वीकर सातारा, खडे–शिवापूर, फलटण असा दौरा करून आले. फलटणला प्रा. दीक्षित यांच्या सहकार्याने उत्सवाच्या आधी पंधरा दिवस या गोमातेला वासुदेव निवासात आणले. प्राजक्त व बकुळीच्या झाडाखाली तिला सुंदर निवासस्थान दिले आणि आता बकुळीचे लाड–कोड

करण्यात माळीबुवा, दामोदर आर्वीकर, शिवरामपंत तांबोळी यांची जणू स्पर्धाच लागली. रोज गरम पाण्याची आंघोळ घालून घेतांना बकुळा अगदी खुषीत यायची.

बुधवार दि. ९.५.९० पासूनच "वासुदेव निवासात" दशग्रंथी ब्राम्हण , पुरोहित यांचे जणू कौटुंबिक सम्मेलनच भरले.

गुरुवारी अग्निमंथन होऊन शास्त्रोक्त व विधीवर तिन्ही कुंडात अग्नी-नारायणाची स्थापना झाली व पौर्णिमासेष्टि झाली. त्यानंतर दररोज एक याप्रमाणे पापक्षय करणारी वैधानरेष्टि, प्रायश्चित्तपूर्वक आत्मशुध्दी करणारी व्रातपतीष्टि, कायिक, वाचिक, मानसिक, ज्ञात, अज्ञात पापांचा क्षय करणारी पवित्रेष्टि, प. पू. महाराजांचे जन्म नक्षत्र विशाखा – त्यांची देवता इंद्राग्नि, अग्नी, अनुमती या दोन देवतांचे याग व उपहोमादि होऊन पापक्षय करून दीर्घायुरारोग्य देणारी नक्षत्रांची इष्टि, आयुष्याची वृध्दी करणारी आयुष्यकामेष्टि व श्रीप्राप्ती करून देणारी, शत्रूंचा पराजय करून सन्मित्रप्राप्ती करून देणारी, मित्रविंदेष्टि या सर्व इष्टि यथासांग पार पडल्या. त्यांचे यजमानपद चातुर्मास्य शास्त्री अग्निहोत्री राजाराम कुलकर्णी यांनी भूषवले. तर सोमयाजी मोरेश्वर भट्ट दीक्षित, 'ब्रह्मा ', वे. मू. अवधूत भट्ट बोरगावकर – 'होता', वे. शा. सं. माधवशास्त्री पुजारी (श्रीक्षेत्र नृसिंहवाडी) – अग्निधं, वे. शा. सं. आनंदशास्त्री कात्रे – अध्वर्यु' होते. बाकीचे ऋत्विज सदस्य होते.

याचवेळी देवघरात श्रींच्या पादुकांवर लघुन्यास, महान्यास पूर्वक रुद्र व पवमान एकादषणीचा सात दिवस अभिषेक होत होता. पुढील सभामंडपात वे. मू. जगन्नाथ धर्माधिकारी, वे. मू. चंद्रशेखर उप्पिन बेट्टिगिरी, पं. भालचंद्र शास्त्री पुजारी (नृसिंहवाडी) इ. मंडळींनी शतचंडीचे पाठ केले.

वासुदेव निवासातील सर्व कार्यक्रमांची चोख व्यवस्था प्रसिध्दी प्रमुख पराङमुख भक्त श्री. आबासाहेब देशपांडे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. मंदाताई यांनी अतिशय उत्तम ठेवली होती.

सहस्रचंद्रदर्शन विधी सोहळ्याचे स्वरूप पूर्णतया आध्यात्मिक होते आणि सर्व साधक सेवाभावाने अक्षरशः जिवापाड कष्ट करत होते. त्यात नावलौकिकाचा वा मानापमानाचा विचार कुणाच्याच मनात येणे शक्य नाही. ज्या नांवाचा उल्लेख केलेला असतो, तोही प्रातिनिधिकच असतो. हा सोहळा संपन्न होण्यासाठी इतके हात लागलेले आहेत की सर्वांचा उल्लेख करणे शक्यच होणार नाही.

मराठवाडा, गुजराथ, नागपूर, विदर्भ, जालना अशा सर्व दूर ठिकाणी पावती पुस्तके पाठवणे, त्यांचे हिशोब चोख ठेवणे, बँकेचे व्यवहार पाहणे इ. अतिशय जोखमीची कामे श्री. भास्करराव कुलकर्णी यांना सांभाळता आली. कारण श्री. फडके व श्री. कदम या तरुण उत्साही साधकांनी रात्रंदिवस खपून सहकार्य दिल्यामुळेच !

वर्षभर प्रचार साहित्याची जबाबदारी उत्तम प्रकारे सांभाळणारे आणि वर्षभर सतत सेवा करणारे, साठी उलटलेले श्री. निजामपूरकर यांनी वामन-निवासाच्या वाढीव बांधकामासाठी श्री. नागले यांना अतिशय मोलाची मदत केली. शिवाय सप्ताहात लागलेल्या सर्व सामानाची खरेदी आणि एकूण देखरेख यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. समारंभामध्ये ज्या व्यासंगी वक्त्यांची भाषणे झाली त्यांचे टाचण काढण्याच्या कामात श्री. शहापूरकर यांनीही मदत केली.

याखेरीज सर्वश्री शिवरामपंत तांबोळी, शरद जोशी, टिपरे (खामगांव), राजू कुलकर्णी, मुजुमदार, शृंगारपुरे, मधू पित्रे तसेच श्री. मनोहर पाध्ये, सौ. पाध्ये, सौ. नीलाताई जोशी या सर्वांचेच निरलस व निरपेक्ष सहकार्य लाभले होते. ज्यांचा उल्लेख वा नामनिर्देश राहिला असेल त्यांची सेवाही फार मोठी होतीच पण त्यापेक्षाही सेवेचे समाधान अधिक मूल्यवान नाही का ?

म्हणूनच हा सर्व कार्यक्रम निर्विघ्नपणे आणि अत्यंत उत्कृष्टपणे पार पडला.

* * * * *







१) पृथ्वीला आधारभूत असणाऱ्या सात तत्वांचे आणि 'सती' या विषयावरचे अभ्यासपूर्ण विवेचन करतांना - पं. गणेशशास्त्री द्राविड. २) सर्व साधकांचे आराध्य दैवत, श्रध्दास्थान प. पू. दत्तमहाराज - प्रसादाचे श्रीफल देत आहेत. ३) पं. भालचंद्रशास्त्री मुळे, त्रंबकेश्वर यांचे रंगलेले प्रवचन.












४) गौरव-समिती अध्यक्ष पं. धुंडिराजशास्त्री दाते एका वेगळ्याच मनोवस्थेत. ५) अविच्छिन्न परंपरा कुडली श्रृंगेरी मठाचे जगद्गुरु श्री. शंकराचार्य - योगाभिनव नरसिंहभारती स्वामी-महाराज यांची पाद्यपूजा करतांना प. पू. दत्तमहाराज व सौ. आईसाहेब.








१) अध्यक्ष श्री. दातेशास्त्री यांचे मार्गदर्शनाखाली सत्कार समारंभाचे प्रभावी संचालन करतांना सौ. शुभदा दाते. २) प. पू. दत्तमहाराज गौरव समितीचे समर्थ, उत्साही विनीत सचिव श्री. कृष्णा आर्वीकर यांचे सुवर्ण-अंगठी देऊन कौतुक करत आहेत. ३) दैनंदिन २/२॥ हजार लोकांच्या भोजनाची पूर्व तयारी - वाढण्यासाठी सिध्द झालेले स्वयंसेवक. ४) गौरव-समिती अध्यक्ष पं. धुंडिराजशास्त्री दाते शक्तिपात संप्रदायातील आचारांचे महत्व सांगत आहेत. ५) कार्यक्रमाचा आस्वाद निर्वेधपणे घेता यावा, म्हणून श्रोत्यांची पादत्राणे सांभाळणारे - बाल, तरुण, वृध्द.





दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपाद



**सर्वेत्रः सुखिनः सन्तु — सर्वे सन्तु निरामयः ।**
**सर्वे भद्राणि पश्यन्तु — मा कश्चित दुःखमाप्नुयात् ॥**

प. पू. दत्त महाराजांचे जीवनाचे हे ध्येयवाक्य म्हणून त्यांचा सहस्त्रचंद्रदर्शन विधी समारोह भव्य प्रमाणावर साजरा करण्याचे त्यांच्या सर्व साधक भक्तांनी ठरवले. निर्णय झाल्यावर उत्साहाने सर्व कामाला लागले. पं. दाते शास्त्रीसारखे सात्विक आणि समर्थ नेतृत्व, श्रीकृष्णशास्त्री आर्वीकर यांच्यासारखा तरुण उत्साही आणि पू. महाराजांबद्दल अतीव श्रध्दा असलेला सचीव वर्षभर नागपूरच्या आपल्या व्यवसायाची व्यवस्था करून आईवडिलांच्या संमतीने पुण्यास येऊन राहिला. प्रवास, पत्रव्यवहार, विविध शास्त्री पंडित, पारायणे, स्वाहाकार यांचे कार्यक्रम ठरविणे, सायंकाळचे कार्यक्रम ठरविणे हे सर्व सोपे नव्हते. पण ते अत्यंत उत्तम प्रकारे पार पडले. आज त्या स्मृतींनीसुध्दा असे वाटते की, एक परमानंदाचे स्वप्नच आपण अनुभवले. पण ते स्वप्न नव्हते. ती एक वस्तुस्थिती होती.

संपूर्ण भारतातून अनेकानेक विद्वान, शास्त्री, पंडित, ब्रह्मवृंद पू. महाराजांबद्दलच्या अतीव प्रेमादरामुळे संपूर्ण सप्ताहभर उपस्थित होते. अनेक कार्यक्रमांमुळे उपस्थित सहभागी होणाऱ्या हजारोंच्या वृत्ती सात्विक भक्तीभावाने भाराऊन गेल्या.

ज्या साधकभक्तांना या कार्यक्रमात प्रत्यक्ष सहभागी होण्याचे भाग्य मिळाले त्यांना पुनःप्रत्ययाचा आनंद मिळावा आणि जे उपस्थित राहू शकले नाहीत त्यांच्यासाठी शब्दांच्या माध्यमातून काही अनुभूति द्यावी हा या प्रतिवृत्त प्रकाशनाचा हेतू. अर्थात प्रत्यक्ष अनुभूति आणि शाब्दिक वर्णन यात फरक रहाणारच. याशिवाय आजच्या महागाईच्या काळात या बाबतीत काही मर्यादा आहेत. इच्छा असूनही अनेक गोष्टींना आवर घालावा लागतो. त्यामुळे हे सर्व समावेशक प्रतिवृत्त होणे संभवनीय नाही. कांही फोटो छापण्याचे ठरले. सर्व प्रवचन–कार्यक्रमांचा किमान सारांश द्यावा लागला आहे. पण या बाबतीत कोणी नाराज होणार नाही, अशी खात्री आहे. कारण साधनांसहित काळाची मर्यादा लक्षात घेऊनही श्रध्दाळू साधकांना या

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपाद

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपाद

सोहळ्याचे वर्णन वाचून आनंद द्यावा असा हा एक प्रयत्न आहे.

समारंभ उत्तम पार पडला. पण त्यात १८ तास कधी दुपारचे भोजनही न करता पण सर्वांना भोजनाची तृप्ती मिळावी म्हणून धडपडणारे, अनेकांचे रागलोभाकडे दुर्लक्ष करून केवळ सेवाभावनेने अखण्ड काम करीत रहाणारे किती तरी साधक भक्त होते. आपले श्री. नारायणराव दाते सर्वांनाच माहित आहेत. त्यांचे हाताखाली आरास करण्यापासून, झाडलोट, स्वच्छता, सर्वत्र कष्ट करणारे अनेक भक्त सेवाभावाने झटत होते. शेकडो भक्त मुक्कामास राहून गैरसोयीबद्दल तक्रार न करता आनंदात होते म्हणून हा समारोह सर्वांना परम आनंददायक झाला.

त्याचे त्रोटक प्रतिवृत्त आपणा सर्वांच्या हाती देताना आनंद होत आहे. त्यातील प्रवचनांचे टांचण श्री. गोडसे यांनी केले आहे. धार्मिक कार्यक्रमांचे सार्थ आणि समर्थ माहिती पं. धुंडीराजशास्त्री दाते यांनी दिली आहे आणि या सर्वांना प्रतिभासंपन्न निवेदनात्मक वर्णन अथक परिश्रमाने केवळ दोन दिवसात तयार केले सौ. शुभदा दाते यांनी आणि अगदी अल्पकाळात छपाई करून देणारे जयभारत प्रि. प्रेस, ठाणे यांचा उल्लेख केलाच पाहिजे. या प्रतिवृत्तासाठी अनेकांच्या अनेक कल्पना. पण ते सर्व एकत्र येणे कठीण. निर्णय आणि कार्यवाही फार लांबणीवर पडून कार्यक्रमाचे ताजेपण नाहीसे होईल म्हणून अगदी ३/४ दिवसात धडपड करून सर्व संबंधितांनी हे काम केले आहे. त्यांत तृटी संभवतात. पण वेळेच्या मर्यादांमुळे ते अटळ होते.

सर्व साधक भक्त याचे स्वागत करतील व आपले मत कळवतील अशी आशा व्यक्त करून ही प्रस्तावना पूर्ण करतो.

**भगवान कृ. पटवर्धन**
विश्वस्त
वासुदेवानंद सरस्वती ट्रस्ट,
पुणे.

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपाद

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा । दिगंबरा दिगंबरा श्रीपाद

# इये ब्रह्मश्रींचिये नगरी . . . . .

**मनसि वचसि काये पुण्यपीयूषपूर्णाः ।**
**त्रिभुवनमुपकारश्रेणिभिः प्रीणयन्तः ।**
**परगुणपरमाणुन् पर्वतीकृत्य नित्यम् ।**
**निजहृदि विकसन्तः सन्ति सन्तः कियन्तः ।**

मनाने, वाणीने आणि शरीराने पुण्यरूपी अमृताने परिपूर्ण असलेले, तिन्ही लोकांना उपकारांच्या मालिकांनी संतुष्ट करणारे दुसऱ्यांचे परमाणुएवढे सूक्ष्म गुण पर्वताएवढे मोठे करून सांगणारे आणि त्याच वेळी स्वतःच्या अंतःकरणाचा विकास साधणारे सत्पुरुष या जगात किती आहेत ?

यां सुभाषितकाराच्या प्रश्नाला ठामपणे उत्तर देता येईल असा एक सत्पुरुष, महात्मा म्हणजे आपले प्रातःस्मरणीय गुरुदेव प. पू. दत्तमहाराज कवीश्वर !

आपणा सर्वांचं हे श्रध्दास्थान आणि प्रेरणास्थान पर्वतराज हिमालयासारखं भव्य, दिव्य अन् उत्तुंग आहे. पण होतं काय या हिमालयाची उंची मान वर करकरून पहावी तर ज्ञानाच्या रुंदीची कक्षा आकळत नाही. तर कधी त्यातली अनमोल विचाररत्ने दृष्टिपथात येत नाहीत. अनेक प्रापंचिक व्याधी – उपाधींवर रामबाण औषध देणाऱ्या त्यातल्या औषधी वनस्पतींकडे दुर्लक्ष होतं. कितीही वेळा त्यांना पाहिलं तरी डोळ्यांची तृप्ती होत नाही आणि कितीही वेळ सहवासात राहिलं तरी मनाची भूक भागत नाही. कारण महासागरासारखं अथांग आणि विविध मिती असलेलं महाराजांचं लोकविलक्षण व्यक्तिमत्व आहे.

एक साक्षात्कारी महात्मा असूनही प्रापंचिक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पण कमलपत्राच्या अलिप्ततेने दत्तमहाराज पार पाडतात.

देही असोनि नाही अहंकृती । गेही असोनि नाही गृहासक्ती । असे सहज – स्वरुप असलेले दत्तमहाराज म्हणजे आधुनिक काळात एकनाथांचा अवतार आहे असे म्हटल्यास अतिशयोक्तीचा दोष लागू नये.

दत्तमहाराजांची चारित्र्यसंपन्नता, प्रगाढ विद्वत्ता, निस्सीम वात्सल्य, शांत वृत्ती, निरासक्त जीवन, ज्ञान परिप्लुत पण गंगेच्या प्रवाहासारखे निर्मळ आणि प्रभावी वक्तृत्व आणि या सर्व गुणसमुदायाला उजळून टाकणारे विनयशीलतेचे कोंदण हे सर्वांच्याच परिचयाचे आहे. अशा या आपल्या उपास्य–देवतेला ८० वर्षे पूर्ण झाली. शुध्द पक्षातील द्वितीयेच्या वर्धिष्णु अशा १००० चंद्रकोरीचे दर्शन त्यांना या जीवनप्रवासात घडले. म्हणून पुष्पनगरीत दि. ११ मे ते १८ मे या सप्ताहात महाराजांचा सहस्त्रचंद्र दर्शन विधी सोहळा मोठ्या दिमाखात, ऐश्वर्यपूर्ण असा साजरा झाला. परमेश्वराच्या हजारो हातांनी तो संपन्न झाला – त्याचा हा धावता आढावा.

## सहस्त्रचंद्र दर्शन – विधी विषयी –

फार थोड्या भाग्यवंतांच्या जीवनात एक हजार चंद्रदर्शने होतात. त्यापैकी एक आपले दत्तमहाराज आहेत. या विधीची अधिदेवता मृत्यूंजय आहे. प्रत्यधिदेवता काळरुप सूर्य आहे. सहस्त्रसंख्यांक दर्शन गुणविशिष्ट चंद्र ही मुख्य देवता आहे. या देवतांचे पूजन–हवन केले जाते.

**सतिलं गुडसंमिश्रं अंजल्यर्धमितं पयः ।**
**मार्कंडेयाद्वरं लब्ध्वा पिबाम्यायुर्विवृध्दये ।**

हा मंत्र म्हणून आयुष्यवृध्दीसाठी दुधात तीळ व गूळ घालून ते प्राशन करण्यास दिले जातात. त्यानंतर अश्वत्थामा, बली, व्यास इ. सप्त चिरंजीव आणि मार्कंडेय यांची प्रार्थना करावयाची असते.

हा सहस्त्रचंद्रदर्शन विधी केल्याने ती व्यक्ती पुण्यवान व ब्रह्मशरीरी होते. ब्रह्मधारणेस योग्य होते. त्या व्यक्तिपासून अनेकांना सन्मार्गदर्शनाचा लाभ होतो.

प. पू. दत्तमहाराजांना दीर्घायुरारोग्य लाभावे

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा दिगंबरा दिगंबरा श्रीपाद

आणि त्यांच्या सन्मार्गदर्शनाच्या परीस–स्पर्शाने आपल्या सर्वांच्या आयुष्याचे सोने व्हावे म्हणून हा सहस्त्रचंद्रदर्शन विधी सोहळा पुण्यनगरीत संयोजित केला होता.

## भक्ती पंढरीचे वारकरी –

या सोहळ्यात सहभागी होण्यासाठी काशीच्या शास्त्री–पंडितांपासून धारवाडच्या प्राध्यापकांपर्यंत सर्व प्रकारचे लोक आले होते. आसेतू हिमाचल पसरलेले महाराजांचे शिष्यवृंद तर सहकुटुंब सहपरिवार उपस्थित होते. महाराजांबद्दल असलेला निस्सीम आदर, अविचल श्रध्दा यामुळे सर्वांचे ज्ञानाचे, प्रतिष्ठेचे, पदव्यांचे बुरखे केव्हाच गळून पडले होते. एका विशाल विश्वकुटुंबाचे स्वरूप 'वामन–निवासाला' आले होते. कारण या कुटुंबाचा प्रमुखच फार अधिकारी आणि आगळा वेगळा होता. पाठीवर मायेचा हात फिरवणारा होता प्रत्येकाची आस्थेने विचारपूस करणारा होता, आश्वासन देणारा होता.

## ''आनंदाचे डोही आनंद – तरंग''

अशीच अनुभूती प्रत्येक जण घेत होता. येथे संसारातल्या व्यथा–विवंचना नव्हत्या, विक्षेप नव्हते, विकल्प नव्हते. होता फक्त चैतन्यरस. अनुभूती होती आनंदाची, परमानंदाची, ब्रह्मानंदाची. वाणीतून मधुर नाम स्रवत होते, कान वेदमंत्रांनी पावन होत होते, पाय दिगंबराची धुन धरण्यासाठी उतावीळ होत होते. हात नमस्कारासाठी जुळत होते आणि मन एका अनिर्वचनीय अशा समाधी अवस्थेप्रत नकळत जात होतं. सत्ता होती सात्विक गुणांची. तमोगुणांना तिथं थाराच नव्हता. सत्य सुंदर मंगलाचीच आराधना होत होती. शब्दांशिवाय अंतःकरणे एकमेकांशी बोलत होती. एक नव्हे दोन नव्हे पुरे ८ दिवस माणसं अशा अनोख्या मंगल वातावरणात भारावल्यासारखी वावरत होती.

## प्रसन्न–मंगल पहिल्या प्रहरी

प. पू. दत्तमहाराजांच्या या सहस्त्रचंद्रदर्शन विधी सोहळ्याचा शुभारंभ शुक्रवार दि. ११.५.९० रोजी सकाळी पुण्याहवाचनाने झाला. आपल्या भारतीय संस्कृतीत प्रत्येक धार्मिक आणि मंगल सोहळ्याची सुरुवात पुण्याह वाचनाने होते. पुण्य म्हणजे पुण्यकारक. अह म्हणजे दिवस आणि वाचन म्हणजे म्हणणे ! ज्योतिषशास्त्रदृष्ट्या उत्तम दिवस पाहूनच कोणताही कार्यक्रम ठरविला जातो. तरीसुध्दा विद्वान ब्राह्मणांनी तो 'पुण्याह' आहे असे म्हटले की त्यावर योग्यतेचे शिक्कामोर्तब होते. म्हणून ब्राह्मणांकडून पुण्याहवाचन केले जाते. हे कर्म समृध्द –संपन्न व्हावे असा त्यांच्याकडून आशीर्वाद घेतला जातो.

## पुण्याहवाचन –

देव, ऋषी, आचार्य यांचे ऋण घेऊनच मनुष्य जन्माला आलेला असतो. या तिघांनाही संतुष्ट करण्यासाठी पुण्याहवाचन–विधी असतो. नांदीश्राध्द म्हणजे वृध्दिश्राध्द. कर्माची वृध्दी व्हावी आणि पितर संतुष्ट व्हावेत म्हणून यात नांदीश्राध्द असते. त्यामुळे संतुष्ट झालेले पितरही आशीर्वाद देतात.

महाराजांनी केलेल्या पुण्याहवाचनाचे वेळी, ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या चारही वेदांचे समग्र अध्ययन केलेले चार शाखांचे वैदिक ब्राह्मण उपस्थित होते. त्या सर्वांनी दत्तमहाराजांना आणि या मंगल सोहळ्याला शुभाशीर्वाद दिले आणि या कार्यक्रमाला खऱ्या अर्थाने सुरवात झाली.

## अग्निमंथनाचा अपूर्व सोहळा –

आजच्या युगात सामान्यांना सहसा पहायला मिळणार नाही असा मंथनातून अग्नी सिध्द करण्याचा विधी त्यानंतर प्रत्यक्ष पाहिला आणि अनेकांच्या डोळ्याचे पारणे फिटले. अर्थात् अग्नीनारायणाने प्रसन्न आणि प्रकट होतांना सर्वांच्याच निष्ठेची थोडी परीक्षा पाहिलीच ! अग्नी निर्माण करण्यासाठी घुसळावयाचा मंथा हा शमीवृक्षाचा असतो. कारण शमीवृक्षात अग्नीचा वास असतो असे वेदात सांगितले आहे. शमीवृक्षात अग्नी असल्यानेच पांडवांनी अज्ञातवासात

जातांना आपली शस्त्रे शमीवृक्षावर ठेवली होती. म्हणून ती गंजली नाहीत. उलट तेजस्वी राहिली. अग्नी–देवता ही मुळात पवित्र आहेच. त्यातही मंथन करून काढलेला अग्नी जास्त पवित्र असतो. सर्व ब्राह्मणांचे अग्नी–देवतेचे आवाहन व गुणगान करणारे मंत्रोच्चार आणि आम्ही सर्वांचे दिगंबरा–दिगंबरा असे नाम:स्मरण – अशा थाटात अग्नीदेवता प्रविष्ट झाली आणि तिच्या तेजाने आणि आनंदाने सर्वांचे चेहरे उजळून निघाले.

अग्नीचे ज्वलन तीन प्रकारांनी होते आणि त्याला सहा जिव्हा आहेत. म्हणजेच अग्नीज्वाळेत सात रंग आहेत.

सृष्टी रचनेमध्ये परमेश्वराने प्रत्येक देवतेचा हविर्भाग त्या त्या देवतेला पोहोचवण्याचे काम अग्नीकडे दिलेले आहे. '' अग्निमुखा वै देवता:'' असे वेदवचन आहे. देवतांचे मुख अग्नी आहे म्हणून पवित्र अग्नीवर आहुती द्यावयाच्या असतात.

विविध यागांसाठी आणि ऋग्वेद संहिता स्वाहाकारासाठी असा पवित्र अग्नी सिध्द करून घेतला आणि यज्ञांना सुरुवात झाली.

## यज्ञांचे सामर्थ्य –

यज्ञ कशासाठी करायचे, पैशाचा अपव्यय का करायचा ? अनेक महागाईच्या वस्तू आहुतींच्या नावाखाली का जाळायच्या असले पाखंडी प्रश्न आज एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणारे आणि स्वत:ला विज्ञाननिष्ठ समजणारे अनेक लोक उपस्थित करतात. पण ते केवळ अज्ञानापोटी आणि खोट्या अभिनिवेशाने – त्यांचा भ्रम दूर करण्यासाठी थोडा यज्ञामागच्या हेतूचा परामर्श घेणे अस्थानी ठरणार नाही.

विश्वाचा समतोल ढासळू नये यासाठी निसर्गात सर्वत्र सतत चालू असणारे हे यज्ञचक्र भारतीयांनी मानवी जीवनात पुन्हा प्रवर्तित केले अहे. व्यक्तीची, समाजाची अन् राष्ट्राची धारणा परस्पर सहयोग आणि सहकार्य यांच्यावर अवलंबून आहे याची प्रेरणा सतत व सहजगत्या मिळत रहावी यासाठी यज्ञाची महान् परंपरा भारतात निर्माण झाली. आज यज्ञाचा खरा आशयच आपण जाणून घेत नाही. शासनाची सर्व मूलभूत प्रमेये आणि शाश्वत तत्वज्ञान हे सर्व यज्ञमंडपातून उदयास आले आहे. त्यावेळी म्हटल्या जाणाऱ्या मंत्रांतून भव्योदात्त विचारांची जी स्पंदने वातावरणात घुमत असतात, त्यांचा परिणाम मानवेतर सृष्टीवर सुध्दा होतो. निरनिराळ्या स्तवनांवर म्हटल्या जाणाऱ्या सूक्तांच्या आरोह–अवरोहांचा परिणाम वनस्पती सृष्टी, पशुसृष्टी, तिर्यक योनी यांच्यावर तर होतोच पण जड पाषाणादिकांवर सुध्दा होतो. सारा आसमंत सत्वगुणांच्या लहरींनी उचंबळून येतो. नीतीचे पाठ व्यासपीठावरून देण्याची गरज उरतच नाही. विचारांच्या अतिसूक्ष्म कंपनांनी सारी सृष्टी सारा परिसर रोमांचित होतो. यज्ञातून प्रीतीचा प्रवाह सुरु झाला की, पशुपक्ष्यांसह सारे त्यात नकळत केव्हाच प्रवाहित होऊन जातात. म्हणूनच यज्ञ म्हणजे तेल–तूप जाळणे नव्हे – काळाचा अपव्यय नव्हे. तर यज्ञ म्हणजे शुध्दीकरण – दानाची विमलगंगा, सर्वांना समान पातळीवर आणणारी महान् संस्था – सर्व आसक्तींचे आणि दुष्प्रवृत्तींचे हवन करणारी अग्निशिखा !

## अपूर्व – यज्ञ संमेलन –

यज्ञाचे हे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेऊनच या समारंभात विविध यागांचे आयोजन हेतुपुर:स्सर केले होते. अर्थातच प्रारंभ गणेश–यागाने झाला. '' "आविर्भूतं च सृष्ट्यादौ'' सृष्टीच्या प्रारंभी गणपती प्रकट झाला असे अथर्वशीर्षात म्हटले आहे आणि तो विघ्नहर्ता आहे. म्हणून प्रथम त्याचे पूजन करायलाच हवे. '' मंगलादीनि कर्माणि मंगलांतानि च कर्माणि'' कार्याच्या प्रारंभी व शेवटी मंगल असावे असे शास्त्रवचन आहे. म्हणूनच प्रारंभी गणेश–याग झाला. ब्राह्मणस्पती सूक्तांनी या यागात हवन करण्यात आले. यानंतर पंचायतन यागापैकी रोज एकेक याग संपन्न झाला.

प्राचीन काळी विष्णु श्रेष्ठ की शंकर श्रेष्ठ की

गणपती श्रेष्ठ असा खूप वादविवाद झाला तेव्हा श्री आद्य शंकराचार्यांनी पंचायतन-पूजा रुढ केली व हा वाद मिटला. त्या पाच देवतांचे हे वेगवेगळे याग.

विष्णुयागात पुरुषसूक्त व पवमान पंचसूक्तांनी हवन झाले. तर रुद्रयाग रुद्रावर्तनांनी संपन्न झाला. सौर याग सौर-सूक्तांनी तर देवी याग देवीसूक्तांनी संपन्न झाला. श्री. प. पू. टेंबे-स्वामीकृत दत्तस्तोत्रांनी दत्तयाग सिध्दीस गेला आणि त्यानंतर सप्तशती याग झाला व श्रीमत् भागवताच्या दशम स्कंधाचे हवन झाले. या सर्वच धार्मिक कार्यक्रमांचे वेळी कै. गाणगापूरकर गुरुजींची सर्वांनाच प्रकर्षाने आठवण येत होती. कारण प. पू. दत्तमहाराजांच्या अमृत-महोत्सवाच्या आयोजनाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे व उत्तमरित्या सांभाळली होती. त्यावेळच्या त्यांच्या कडक शिस्तीचीही आठवण येत होती.

मनात आले या सर्व देवतांना पूर्ण संतुष्ट आणि तृप्त केल्याने वरुण देवताही संतुष्ट झाली असावी आणि 'आवाहनं न जानामि' ही आमची व्यथा ओळखून पर्जन्य-देवताही या नगरीत शेवटच्या दिवशी आपल्या सर्व सामर्थ्यानिशी अवतरली असावी आणि या मंगल आनंदसोहळ्यात सहभागी झाली असावी.

याचवेळी दुसरीकडे दररोज ऋग्वेद-संहिता स्वाहाकार चालू होता. यात भाग घेणारे घनपाठी विद्वान ब्राह्मण होते. या सर्व यागांची पूर्णाहुती शुक्रवार दि. १८ मे रोजी सकाळी झाली. अग्नीवर मंत्रोच्चारपूर्वक गाईच्या तुपाची संततधार धरणे म्हणजे पूर्णाहुती. अशा पूर्णाहुतीनेच यज्ञाची सांगता होते. हे सर्व यज्ञ निर्विघ्नपणे, विधिवत्, शास्त्रोक्त पध्दतीने संपन्न झाले ही ईश्वरी कृपा अन् गुरु कृपा !

ही सर्व यज्ञादि कर्मे ब्रह्मापासून निर्माण झाली आहेत.

**कर्म ब्रह्मोद्भवं विध्दि ब्रह्माक्षरसमुद्भवम्।**
**तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ।**

अर्थातच ब्रह्मापासून निर्माण झालेली ही कर्मे ब्रह्मपद-प्राप्ती करून देतात.

## पवित्र ग्रंथांची पारायणे –

रोज सकाळी ८ ते १२ या वेळात वामन निवासातील सभागृहाचे वायुमंडल अत्यंत पवित्र, चैतन्यरसात बुडालेले आणि श्रोत्यांच्या अंतःकरणात सात्त्विक लहरी निर्माण करणारे असे होते. त्याचे वर्णन शब्दातीत आहे. आयुष्यात कुणाच्याही कानावर विविध ग्रंथांच्या पारायणांचा एकत्र असा अपूर्व नाद अन्यत्र पडणार नाही. ज्या ग्रंथांची नावे सुध्दा परिचित नाहीत अशा ग्रंथांचे सुस्पष्ट – शुध्द – गंभीर आवाजात चाललेले पारायण ऐकायला मिळणे हा कपिलाषष्ठीचा योग होता. कांही निवडक पवित्र ग्रंथ आणि त्यांची पारायणे करणाऱ्या भाग्यवंत अधिकारी व्यक्ती यांचा तपशील मुद्दामच देत आहे. किमान आपल्या धर्मात एवढे अलौकिक ग्रंथ आहेत आणि त्यांचा अभ्यास करणारे जिज्ञासू आणि व्यासंगी विद्वानही आहेत याची तोंडओळख तरी आपल्याला असावी. कारण आजच्या धकाधकीच्या संघर्षमय जीवनात आपल्या संस्कृतीशी – धर्मग्रंथांशी आपली फारकतच होत चालली आहे. या पारायणांनी आणि त्यांच्या श्रवणानेसुध्दा आपला धर्म म्हणजे काय हे समजते. दुष्ट विचार नाहीसे होतात. पापांचा नाश होतो आणि मोक्षप्राप्ती होते.

**श्रुत्वा धर्मं विजानाति, श्रुत्वा त्यजति दुर्मतिम्।**
**श्रुत्वा पापं प्रणश्येत, श्रुत्वा मोक्षमवाप्नुयात् ।**

अविद्या (अज्ञान), अस्मिता (अहंकार), राग, द्वेष, मोह हे पंचक्लेश नाहीसे होतात.

१) ऋग्वेद पारायण – प्रकाश दंडगे.
रामचंद्रभट्ट फणसळकर
२) शुक्ल यजुर्वेद पारायण – लक्ष्मीकांत दिक्षित
नारायणशास्त्री भानोसे
३) कृष्ण यजुर्वेद पारायण – रामचंद्रभट्ट श्रौती (गोकर्ण)
वासुदेवभट्ट गोखले (पुणे)
४) सामवेद पारायण – सुबराय भट्ट (होन्नावर)
शिवराम (होन्नावर)

५) अथर्ववेद पारायण – श्रीधरशास्त्री (गोकर्ण)
६) ब्रह्मसूत्र भाष्य – व्यंकटरमणशास्त्री दीक्षित (औदुंबर)
७) उपनिषद् भाष्य – रामचंद्रशास्त्री सुरी (होन्नावर)
८) गीता भाष्य – चंद्रमौळीशास्त्री सिंदगी (कर्नाटक) वेणीमाधवशास्त्री उप्पिनबेट्टिगिरी
९) दासबोध पारायण – कानडे बुवा
१०) गुरु चरित्र – दादाशास्त्री जोशी अरविंद जोशी
११) दत्तमहात्म्य – दादा सरदेशपांडे (ठाणे)
१२) ज्ञानेश्वरी पारायण – निवृत्तीबुवा सूर्यवंशी (पुणे)
१३) गाथा पारायण – सूर्यवंशी (पुणे)
१४) प. पू. टेंबबे स्वामींच्या – अंबादास शास्त्री जोशी विविध ग्रंथांची पारायणे – /माधवशास्त्री जोशी / निपाणीकर शास्त्री जोशी
१५) तुलसी रामायण – जनार्दन काळे (उज्जयिनी)
१६) वाल्मिकी रामायण – नारायणशास्त्री गोडबोले (जमखिंडी)
१७) शतपथ ब्राह्मण– पं. गणेशशास्त्री द्रविड.

आपापल्या ग्रंथांचा सखोल अभ्यास असणाऱ्या या भाविकांनी अत्यंत श्रध्देने ही पारायणे केली. ' शतपथ ब्राह्मण' या ग्रंथाचे पारायण इतके कष्टसाध्य आहे की संपूर्ण भारतात हाताच्या बोटावर मोजता येणारे लोकही मिळणार नाहीत. असे पारायण या समारंभात झाले आणि या सर्वांचा वस्त्र/दक्षिणा वगैरे देऊन यथोचित सन्मान करण्यात आला. वामन् – निवासातले मूळचे मांगल्य वृध्दिंगत होण्यास या मंडळींचा फार मोठा सहभाग लाभला.

## अखंड नामस्मरण –

शास्त्राभ्यास वा वेदाध्ययन झाले नाही म्हणून खंत वाटण्याचे आम्हां सामान्य माणसांना काहीच कारण नव्हते. कारण औदुंबराखालचा अखंड नाम–जागर आम्हांला साद घालीत होता. १। लाख नामजपाचा संकल्प सोडला होता. '' उफराट्या नामासाठी । वाल्या तरला उठाउठी'' हे माहीत असूनही रोज ईश्वराच्या नामःस्मरणालाच तेवढा वेळ मिळत नाही. इथं मिळालेला सारा वेळ भाविक बंधू–भगिनी नामःस्मरणात व्यतीत करीत होत्या. वाणी – वृत्ती – वातावरण सारेच पावन होत होत पाहता पाहता केलेला संकल्प केव्हाच सिध्दीस गेला. '' मंगल मंगल जिकडे तिकडे जय मांगल्याचा'' असेच वातावरण सर्वत्र निर्माण झालेले होते आणि १७ तारखेला या जपाची सांगता म्हणून ' दिगंबरा ...... या मंत्राचे विधियुक्त हवन झाले.

## कुंकुमार्चन सोहळा –

दररोज ११ वाजता देवी भगवतीला प्रिय असलेले कुंकुमार्चन होत होते. पहिले कुंकुमार्चन सौ. आईसाहेब, त्यांच्या मुली, सुना आणि सौ. ताई महाराज यांनी देवीला केले. आपल्या माणसांच्या जशा अतिशय आवडत्या / प्रिय गोष्टी असतात. तसं देवांच्या बाबतीतही असतं अस लक्षात येतं. भगवान विष्णू हा अलंकार–प्रिय आहे. तर महादेवाला विविध अभिषेक प्रिय आहेत. विघ्नहर्त्या गणपतीला तर्पण प्रिय आहे तर सूर्याला नमस्कार आवडतो. देवीला कुंकुमार्चन अतिशय प्रिय आहे. कुंकू हे सौभाग्याचे लेणे आहे. त्यामुळेच अनेक सुवासिनींनी भक्तीभावाने – ललिता सहस्त्र – नामाच्या गजरात हे कुंकुमार्चन केले. कुंकू प्रसाद म्हणून घेतांना जणू देवी भगवती अखंड सौभाग्याचे वरदान देत आहे, असाच भास होत होता.

## मंत्र–जागर –

आजकाळ पुण्या–मुंबई सारख्या शहरात मंत्रपुष्प वा लघुरुद्र करावयाचा ठरवला तर अधिकारी ब्रह्मवृंद मिळत नाही. ही फार मोठी अडचण येते. पण महाराजांची पुण्याई केवढी, तिचे वर्णन कसे करावे आणि वर्णनाची गरज तरी काय ? प्रत्येक कार्यक्रमाच्या वेळी याची प्रचीती येत होती.

पवित्र वेदांचे अध्ययन आणि अध्यापन करणारे

शास्त्री-पंडित आपण होऊन या मंत्र जागराला उपस्थित होत होते. ऋग्वेद, कृष्ण-यजुर्वेद, शुक्ल-यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद याप्रमाणे पाच दिवस पाच वेदांचा मंत्र जागर झाला. यावेळी प्रत्येक वेदाची संहिता, पदे, क्रम, जटा, घन म्हणण्यात आले. या मंत्रजागराचे महत्व फार मोठे आहे. वेदमंत्रांच्या उच्चारांनी वातावरण एकदम शुध्द व प्रसन्न होते. कारण ती ईश्वरी वाणी आहे. यांच्या ध्वनिलहरीने माणसांची मने प्रसन्न होतात.

## अन्नदान –

यज्ञामध्ये अन्नदान झालेच पाहिजे असे शास्त्र आहे. विधिहीन आणि अन्नदान केलेले नाही असा यज्ञ करण्यापेक्षा न करणे अधिक चांगले असे भगवद्गीता सांगते. अन्नदान हे श्रेष्ठदान आहे " अन्नदानं परं दानं" असे म्हटलेच आहे. भुकेलेल्या माणसांना अन्न देण्यासारखे दुसरे पुण्य नाही. या समारंभात सतत ८ दिवस सकाळ-संध्याकाळ २/२॥ हजार माणसे जेवत होती. रोज साग्रसंगीत जेवण असायचे. तोंड गोड करणारं पक्वान्न इतक्या सगळ्यांना असायचं. विश्वास बसणार नाही पण आमरसाचा बेत सुध्दा होता. स्वयंसेवक हसतमुखानं आणि चपळाईनं वाढत होते. अठरा तास काम करूनही चेहऱ्यावर नाराजीची वा थकव्याची छटा नव्हती. दशग्रंथी ब्राह्मण – शास्त्री पंडित यांची सोवळ्यातील पंगत होती. तशीच मांडवात गुरुनिष्ठांची मांदियाळी जात-पंथ, इ. भेदभाव विसरून सहभोजनाचा, प्रसादग्रहणाचा सात्विक आनंद लुटत होती. श्लोक म्हटले जात होते. पाने वाढून होईपर्यंतसुध्दा ' दिगंबरा दिगंबरा' हा सामुदायिक नामजप चालायचा. एकावेळी पाच-पाचशे माणसे जेवतांना पाहूनच पोट भरून जायचे. शेवटच्या दिवशी तर ५००० माणसे जेवली – ' अन्नदाता सुखी भव' असाच दुवा प्रत्येकाच्या मनाच्या गाभाऱ्यातून उमटत होता. तृप्ततेचा सूर आळविला जात होता.

**अन्नदानात् परं दानं विद्यादानमतः परम् ।**
**अन्नेन क्षणिका तृप्तिः यावज्जीवं च विद्यया ।**

अन्नदान श्रेष्ठ आहेच पण विद्यादान त्याहीपेक्षा श्रेष्ठ आहे. कारण विद्यादानाने होणारी तृप्ती आयुष्यभर टिकणारी असते. म्हणूनच संध्याकाळी दररोज वेगवेगळ्या प्रकारचा ज्ञानयज्ञ होता. रोजची सकाळ भक्तीरसात आणि यज्ञ-दान कर्मात न्हाऊन निघायची तर संध्याकाळ ज्ञानाची नवनवीन दालने खुली करायची.

शुक्रवारी ११ तारखेला या ज्ञान सत्राची सुरुवात दीपप्रज्ज्वलनाने झाली. ' तमसो मा ज्योतिर्गमय' हा भारतीय संस्कृतीचा मूलमंत्र ! अज्ञानाच्या, निराशेच्या, दुष्प्रवृत्तींच्या अंधारातून आम्हांला ज्ञानाच्या, सत्प्रवृत्तीच्या प्रकाशाकडे घेऊन जा, असे सांगण्यासाठीच गौरव-समिती अध्यक्ष मा. धुंडिराजशास्त्री दाते यांनी मंगलदीप प्रज्वलित करून या ज्ञानसाधनेचा – व्याख्यानपुष्पांचा शुभारंभ केला.

भव्य अशा व्यासपीठावर दत्तसंप्रदायातील अधिकारी व्यक्तींची छायाचित्रे होती. त्यांचे दर्शनही पुण्यकारक होते. त्यांना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

महाराजांचे परम पूज्य पिताजी **धुंडिराजशास्त्री** यांचे भव्य छायाचित्र व्यासपीठावर होते. मराठवाड्यात यांचा फार मोठा शिष्य समुदाय आहे. महात्म्यांच्या तीन पिढ्यांतला हा मधला दुवा ! देऊळ गावराजा येथे त्यांची समाधी आहे. दुसरी प्रतिमा **दीक्षित स्वामींची** होती. प. पू. दत्तमहाराजांचे हे श्रध्दास्थान ! यांच्याच आज्ञेवरून दत्तमहाराजांनी सोळाव्या वर्षी भागवत सप्ताह केला. प. पू. वासुदेवानंद सरस्वतींनी अनुग्रह द्यावा म्हणून रात्रभर त्यांच्यासमोर उभे होते. डोळ्यांतून अश्रुपात होत होता. निष्ठेची/अविचल श्रध्देची एवढी किंमत मोजल्यावर कार्यभाग साध्य झाला. स्वामींनी ज्यांना संन्यास दीक्षा दिली असे हे एकमेव शिष्य होत. नृसिंहवाडीजवळील ' अमरापूर' ही त्यांची कर्मभूमी आणि अयोध्येला त्यांनी आपली जीवनयात्रा संपवली.

वासुदेवानंद सरस्वतीचा, दत्तसंप्रदायातील साधकांना वेगळा परिचय करून देण्याची गरज नाही.

पण दत्त महाराजांच्या जन्माच्या वेळचे त्यांचे ''प्रत्यक्ष वक्रतुंडमहाराज जन्माला आलेले आहेत. त्यांचे दत्तात्रय असे नाव ठेवा'' हे उद्‌गार त्यांच्या द्रष्टेपणाची साक्ष देतात. आपणा सर्वांचे हे फार मोठे उपास्यदैवत आहे.

आणि चौथे छायाचित्र

**प. पू. गुरुदेवांचे, गुळवणी महाराजांचे ।**
**नसे गर्व अंगी सदा वीतरागी ।**
**दया—दक्ष योगी क्षमा—शांती भोगी ।**
**नसे लोभ ना क्षोभ ना दैन्यवाणा ।**
**ईही लक्षणी जाणिजे योगिराणा ॥**

हा मनाचा श्लोक गुरुदेवांसाठीच असावा असे आपणा सर्वांचे आश्रयस्थान, आधारवट असे गुरुदेव !

या चार दर्शनांपैकी प. पू. वासुदेवानंद सरस्वती आणि प. पू. दीक्षित स्वामी यांची दर्शने दामोदर आर्वीकर यांच्या सिध्दहस्त कुंचल्यातून उतरली होती.

त्यानंतर ज्ञान—सत्राचे पहिले पुष्प गुंफले ते गौरव समितीचे अध्यक्ष पं. धुंडिराजशास्त्री दाते यांनी ! विषय होता '' शक्तिपात संप्रदायात आचारांचे महत्व'' 'आचारः प्रभवो धर्मः' या सुवचनाचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे दाते शास्त्री — पंचांगकर्ते म्हणून सुपरिचित. महाराष्ट्रातल्या या सर्वात प्रमुख पंचागाला ७५ वर्षे पूर्ण झाली. त्याबद्दल अनेक ठिकाणी फार मोठ्या प्रमाणावर सत्कार—सोहळे साजरे झाले. त्यांच्या घरी म्हणजेच सोलापूरलाही नागरिकांनी त्यांचा भव्य सत्कार केला. शांत, प्रसन्न, मितभाषी असे दाते शास्त्री म्हणजे धर्मशास्त्राचा चालता बोलता ज्ञानकोशच आहे. त्यांनी आपल्या भाषणातून दैनंदिन जीवनातल्या अनेक धर्मकल्पना चातुर्याने उलगडून दाखवल्या.

---

**श्री. धुंडिराज शास्त्री दाते (११.५.९०)**

*आजपर्यंत होऊन गेलेल्या सर्व संतांनी आचार धर्मावर भर दिलेला आहे. शक्तीसांप्रदायात तर त्याला फारच महत्व आहे. स्वधर्माचे व्यवस्थित ज्ञान करून घेऊन त्याप्रमाणे आपण आपले आचरण ठेवून आपले ऐहिक व पारमार्थिक कल्याण साधून घेतले पाहिजे. शास्त्राने मानवाच्या सुखासाठी आणि हितासाठीच आचार धर्म सांगितला आहे.*

*व्यवहारात आपण निरनिराळी प्रतिके मानतो, त्याप्रमाणे जानवे हे ४ वेद, ६ शास्त्रे, १८ पुराणे आणि १६ मूलद्रव्यांचे प्रतिक आहे. त्याचे ३ पदर हे ब्रह्मा, विष्णू, महेशांचे तर त्याची गांठ हे अद्वैताचे प्रतिक आहे.*

*कलीयुगात यज्ञ, दान आणि तप ही अतिशय पवित्र कर्मे सांगितली आहेत. ब्राह्मणांची समंत्रक आणि इतरांची आमंत्रक कर्मे यांचे फळ एकच आहे. फलाट साम्य हे हिंदू धर्माचे वैशिष्ठ्य आहे.*

---

त्यानंतर डॉ. केरुर यांनी संपादित केलेल्या 'प्रसन्न पारिजात' या गौरव ग्रंथाचे डॉ. रा. ना. दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रकाशन झाले. 'प्रसन्न पारिजात' किती सुरेख नांव ? नावाप्रमाणेच आपल्या प. पू. महाराजांचे सदैव प्रसन्न आणि गुणसुगंधाने दरवळून टाकणारे व्यक्तिमत्व ! या 'प्रसन्न—पारिजात' च्या देखण्या प्रकाशन समारंभाला त्यातले सर्व लेखक महाराजांचा आशीर्वाद घेण्यासाठी उपस्थित होते. यातील सर्वच लेखांशी गौरव—समिती सहमत नसेल पण हे लेख अत्यंत दर्जेदार, उद्‌बोधक आहेत. वाचनीय आहेत. साधकांनी हे लेख जरुर वाचावेत.

प्रा. रा. ना. दांडेकर आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हणाले,

---

**डॉ. रा. ना. दांडेकर, (११.५.९०)**

*ब्रह्मर्षि दत्तमहाराजांसारखे अध्यात्म शास्त्रात उच्च पदवीला पोहोचलेले, " आपणासारखे करीती तत्काल" असा अधिकार असलेले आणि " आता राहिलो उपकारापुरता" अशी वृत्ती निर्माण झालेले महाभाग आज आपल्यात आहे हे आपले भाग्य आहे. त्यांचे स्फूर्तिदायक मार्गदर्शन आणि क्रियाशील सहवास असाच आपल्याला लाभत राहो.*

---

दि. १२.५.९० शनिवारची संध्याकाळ ही विद्वत्ता, वक्तृत्व, व्यासंग, तर्कशुध्द विवेचन यांचे अनोखे सम्मेलन होते. प्रथम आळंदीच्या श्री. किसन महाराज साखरे यांचे विद्वत्तापूर्ण प्रवचन झाले. घराण्याने दिलेला विद्वत्तेचा वारसा, ज्ञानेश्वरीचा गाढा व्यासंग, माऊली विषयीचे नसानसातून वाहणारे प्रेम, स्वच्छ व शुध्द वाणी आणि विषयावरचे प्रभुत्व यासारख्या गुणांनी नटलेले साखरे महाराजांचे प्रवचन म्हणजे बुध्दीला फार मोठे खाद्य होते. त्यांनी मांडलेले विचार वरच्या दर्जाचे होते. म्हणून अनेक दृष्टांताच्या सहाय्यांनी त्यांनी ते सुलभ करून सांगितले.

श्री. किसन महाराज साखरे यांचे प्रवचन –

---

**श्री. किसन महाराज साखरे**

*यज्ञाचे अनेक प्रकार आहेत. त्या पैकी सद्गुरुंच्याप्रमाणे आत्मबोध करून घेणे हा सुध्दा एक यज्ञच आहे.*

*ईश्वरी कृपेनेच तीव्र जिज्ञासा निर्माण होऊन सद्गुरुंची प्राप्ती होते. पण नंतरही श्रेष्ठ अशी गुरुसेवा करून आत्मबोध प्राप्त करून घ्यावा लागतो. गुरुभक्तीला विशेष प्राधान्य आहे. महापराक्रमी असून देखील केवळ कपटगर्भिणी भक्तीमुळे कर्ण निष्प्रभ ठरला.*

*महात्मे ईश्वरी साक्षात्कार झालेले असतात. त्यामुळे ते मनाने विश्वव्यापक/विश्वरूपच होतात.*

*वेदांच्या ठिकाणी भ्रम, प्रमाद, विप्रलिप्सा कर्णापाठ इ. पुरुष बुध्दिकृत अथवा पुरुष बुध्दिमध्ये असणारे दोष संभवत नाहीत म्हणून वेद अपौरुषेय आहेत.*

*दैवी संपत्ती असणाऱ्या कोणत्याही जीवाला ब्रह्मज्ञान होते. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञान प्राप्तीच्या विवेक, वैराग्य, ब्रह्मज्ञान, फल पर्यवसायी वैराग्य, श्रवण, मनन, निदिध्यासन अशा ज्ञानाच्या पायऱ्या सांगितल्या आहेत.*

*श्री महाराजांच्या सत्संगतीचा फायदा व्हावा असे आपल्याला वाटत असेल तर अत्यंत लीन होऊन, मीपणा विसरून जाऊन – थोरपण पऱ्हा सांडिजे । व्युत्पत्ती आघावी विसरीजे । जगा धाकुटे होईजे । तै जवळीक माझी ॥ या भावनेने सद्गुरुला शरण गेले तरच त्यांच्याकडून ज्ञान घेण्याची पात्रता येईल.*

---

या शनिवारी मांडव श्रोत्यांनी फुलून गेला होता. माणसे जागा मिळेल तिथे बसलेली होती. उभी सुध्दा होती. प्रत्येकाच्या डोळ्यात प्रतिक्षेची छटा होती आणि जिवाचे कान झाले होते. कशासाठी – शब्दप्रभू प्राचार्य शिवाजीराव भोसले यांच्या व्याख्यानासाठी. मा. शिवाजीराव भोसल्यांचे त्या दिवशीचे व्याख्यान म्हणजे एक प्रफुल्लित असे देखणे कमळ–पुष्प होते. त्यांत विचारांचे सौंदर्य होते. ज्ञानाचा मकरंद होता आणि भक्तीचा सुगंध होता. विशेष म्हणजे विषय नेहमीपेक्षा वेगळा होता. म्हणूनच कमालीची उत्सुकता होती. '' विज्ञान युगातील परमार्थ साधना'' या विषयाचा प्रवास त्यांनी सुरुवातीलाच सर्वांची मने जिंकून एकेका उदाहरणांनी अतिशय उत्तम तऱ्हेने केला व सर्वांना घडवला. त्यांच्या अस्खलित, प्रभावी, प्रवाही, परिणामकारक शैलीने श्रोत्यांना खिळवून ठेवले होते.

प्राचार्य शिवाजीराव भोसले यांचे भाषण,

---

**प्रा. शिवाजीराव भोसले, (१२.५.९०)**

*निर्मल, निर्मन, निराग्रही झालं तर कुठे परतत्वाचा चिरंतन तत्वावर आपले लक्ष आहे. एखाद दुसरा अपवाद वगळता विज्ञानाच्या मार्गाने जाणाऱ्या बहुतेकांना ब्रह्मचिंतनाची आवश्यकताच वाटली नाही.*

*तुकारामांसारख्या कुठल्याही ऐहिक आकर्षणाला बळी न पडता अव्यभिचारी भक्ती मागणारे संत भोळे भाबडे नक्कीच नव्हते. जीवनात श्रेष्ठ काय आहे हे त्यांना निश्चित कळले होते आणि तेच त्यांचे प्राप्तव्य होते.*

*विद्वानांचे राजे शोभतील एवढे महान् विवेकानंद केवळ अगतिग होऊन रामकृष्णांसारख्या निरक्षर माणसाला शरण गेले नाहीत. त्यांना हवा असलेला मूर्तिमंत अनुभव रामकृष्णांच्या ठिकाणी दिसला म्हणून ते त्यांच्याजवळ थांबले.*

*महाराजांच्या रुपाने आज परमार्थाचा वस्तुपाठच आपल्या पुढे आहे.*

*विवेकानंदांप्रमाणेच ईश्वराचे प्रत्यक्ष दर्शन घेणारे आंग्लविद्या विभूषित योगी अरविंद हे देखील याच विज्ञान युगातले. माताजींसारख्या मूळ जन्माने फ्रेंच असलेल्या व्यक्तीने अरविंदांच्या सान्निध्यात योगाभ्यास करून ईश्वराचा साक्षात्कार करून घेतला.*

---

भाषणानंतरच्या समारोपात प. पू. दत्तमहाराजांच्या शुभहस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. तेव्हा मन भूतकाळात पोहोचलं. अगदी आपल्या लाडक्या शिवछत्रपतींच्या काळात ! वाटलं, शिवरायांना अनेकांनी अनेक नजराणे दिले असतील, पण शिंगणवाडीच्या परिसरात समर्थ रामदासांनी त्यांच्यावर केलेला अनुग्रह हा त्यांचा सर्वात महत्वाचा गौरव असेल. तद्वतच या वाचस्पती शिवाजीरावांचे आजवर अनेक सत्कार समारंभ झाले असतील. पण प. पू. दत्तमहाराजांच्याकडून मिळालेली शाल, श्रीफळ म्हणजे त्यांनी आजवर महाराष्ट्रभर फिरून, रसिकांना, श्रोत्यांना झपाटून टाकणारा, भान विसरायला लावणाऱ्या अनेक व्याख्यानरूपी वाक्–यज्ञानंतर लाभलेले '' पसायदान'' होते आणि याच व्याख्यानात आयुष्याच्या उत्तरार्धाच्या उत्तरार्धात जीवनाकडे एका नव्या उदात्त दृष्टिकोनातून पाहून जीवनाचा खरा अर्थ शोधण्याचा आणि इतरांना सांगण्याचा संकल्प त्यांनी केला होता. या नवीन वाक्–यज्ञासाठी महाराजांनी दिलेले हे **पायस** होते. ज्याच्या स्वीकारानंतर त्यांचा हा यज्ञ सर्वार्थाने सिध्द होणार आहे. प्रा. शिवाजीरावांचे अमृत–बोल कानात गुंजत असतानाच ही संध्याकाळ विराम पावली.

रविवार दि. १३.५.९०.

या दिवशी शक्तिपात संप्रदायाचे अधिकारी 'शिवोमृतीर्थ' यांचे शिष्य 'नित्यबोधानंदतीर्थ' यांचे प्रवचन हेतुपुरःस्सर आयोजित केले होते. आपल्या प. पू. गुरुदेवांनी गुळवणी महाराजांनी १९६७ साली यांना 'शक्तिपात' दीक्षा दिली व शिवोमृतीर्थांनी त्यांना संन्यासदीक्षा दिली. प्राचार्यांची मानाची नोकरी, अधिकार, प्रतिष्ठा सोडून देऊन त्यांनी या कार्याला वाहून घेतले आहे. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, नाथ भागवत, तुकाराम गाथा, शंकराचार्यांचे वाङ्मय यांचा त्यांनी सखोल अभ्यास केलेला आहे. या विषयावर मराठी, हिंदी, गुजराथी, तेलगू, इंग्रजी इ. विविध भाषांत लेखन केले आहे. सध्या दहिसर–नेवाळी येथील आपल्या गुरुंच्या आश्रमाची संपूर्ण जबाबदारी ते सांभाळत आहेत आणि अनेक साधकांना मार्गदर्शन करीत आहेत.

शक्तिपात संप्रदायाचे महत्व सांगताना त्यांनी हा बोलण्याचा संप्रदाय नाही तर अनुभूतीचा विषय आहे, हा महत्वाचा विचार मांडतांना,

**प्रचीतिविण जे बोलणे ।ते अवघेच कंटाळवाणे**
**जैसे तोंड पसरुनी सुणे ।ओरडोनि गेले ॥** या ओवीचा दृष्टांत त्यांनी दिला.

गुरुंचे सामर्थ्यही '' गुरुंविना ब्रह्म नान्यात्''

अशा अत्यंत समर्पक शब्दांत त्यांनी सांगितले. गुरुही व्यक्ती नसून शक्ती आहे. ही शक्ती धारण करणारे मंदिर म्हणजे गुरु शरीर. गुरु जवळची शक्ती शिष्यात संक्रमित झाली की, शिष्याचा आपले मन–बुध्दी–चित अहंकार यांना सोडून आत्म्यांशी संवाद साधला जातो. शिष्यात कुंडलिनी शक्ती जागृत होते. पण हे गुरुकृपाप्रसादाशिवाय शक्य नाही.

**"जयाचेनि कृपा–तुषारे ।**
**परतले अविद्येचे मोहरे"**

अशा शब्दात त्यांनी गुरुमहात्म्य सांगितले.

प. पू. दत्तमहाराज ज्या गुळवणी महाराजांच्या पीठाचे उत्तराधिकारी आहेत, ते पीठ पू. वासुदेवानंद सरस्वतींचे दत्तपीठ म्हणून जसे सर्वश्रुत आहे. तसेच ते एक शक्तीपीठ आहे. किंबहुना महाराष्ट्रात शक्तिपात संप्रदायाचे प्रभावी आध्यात्मिक केंद्र म्हणून प्रसिध्द आहे. म्हणूनच कार्यक्रमाच्या रचनेत शक्तीपातपरंपरेचे एक अधिकारी संन्यासी – नित्य–बोधानंदतीर्थांचे प्रवचन, मार्गदर्शन, त्यांच्यासह पहाटे सामूहिक साधन – हेतुपुरःस्सर आयोजित केले होते.

## परिसंवाद –

यानंतर या सोहळ्यासाठी आलेल्या काही अभ्यासू, उत्साही लोकांचा प्राचार्य भिंगारकर यांच्या अध्यक्षतेखाली एक परिसंवाद रंगला. विषय होता सर्वांच्याच जिव्हाळ्याचा– ''विज्ञानयुगात संस्कारांची आवश्यकता आहे/नाही.'' या परिसंवादात बरेच जोशी अहमहमिकेने पुढे सरसावले होते. श्री.गोपाळ–राव जोशी, सौ. नीलाताई जोशी, अंबादासशास्त्री जोशी, डॉ. राजाभाऊ जोशी, गणेशशास्त्री द्रविड, डॉ. केरुर, पं. दाते शास्त्री, यांनी या विषयाच्या विविध अंगांना स्पर्श केला. शेवटी डॉ. भिंगारकरांनी समारोप केला. कोणत्याही युगात सुसंस्कार हे आवश्यक आहेतच. धर्माला विज्ञानाचे कधीच वावडे नव्हते वा नाही उलट आजच्या गतिमान युगात आणि विभक्त कुटुंब पध्दतीत सुसंस्कारांची संपन्न व्यक्तिमत्व निर्मितीसाठी आत्यंतिक गरज आहे व असे संस्कार जाणीवपूर्वक व साक्षेपाने केलेच पाहिजेत हे या परिसंवादातून हाती लागलेले नवनीत होते आणि अशी संस्कार–केंद्रे काढली पाहिजेत हा विचार प्रत्येकाच्या मनात डोकावत होता आणि पावले निवासस्थानाकडे वळली होती.

सोमवार, दि. १४ मे १९९०.

या दिवशीच्या ज्ञानसत्राची दोन वैशिष्ट्ये म्हणजे डॉ. कोपर्डेकर यांचे व्याख्यान आणि त्र्यंबकेश्वरच्या पं. भालचंद्र शास्त्रीजींचे अभ्यासपूर्ण प्रवचन आणि प. पू. दत्तमहाराजांचे सम्यक् आणि हृद्य दर्शन घडवणाऱ्या प. पू. दत्तमहाराज वासुदेव–निवास विशेषांकांच्या प्रकाशनाचा हृद्य सोहळा ! श्री. अच्युतराव पोटभरे यांच्या तळमळीतून, धडपडीतून अथक परिश्रमातून साकारलेला हा अंकराज ! संपादकांचे प्रास्ताविकात त्यांनी वाचून दाखवलेल्या पत्रांनी सर्वांच्याच काळजाला हात घातला. प. पू. नित्यबोधानंदतीर्थ यांनी या त्रैमासिकाचे प्रकाशन केले. अमळनेरचे प्रा. डॉ. ज. वा. जोशी, मुधोजी कॉलेजचे प्राध्यापक डॉ. प्र. ना. दीक्षित, चिंचवडचे विघ्नहारी महाराज यांनी प. पू. दत्तमहाराजांबद्दलचा आदर व अंकाबद्दलच्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. श्री. अच्युतराव पोटभरे यांचा गौरवसमिती अध्यक्ष पं. धुंडिराजशास्त्री दाते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

---

### डॉ. कोपर्डेकर, (१४.५.९०)

*ज्ञानेश्वरी हा केवळ तत्वज्ञानाचा ग्रंथ नसून जगातील अत्यंत श्रेष्ठ असा काव्यग्रंथही आहे. भगवंतांच्या मनातले हृतगत् त्यांनी स्पष्ट केले आहे. ज्ञानेश्वरीत कर्ममार्ग, ज्ञानमार्ग आणि भक्तीमार्ग या तिन्हींचा उत्तम संगम झाला आहे. आत्यंतिक प्रेमाने भगवंताला आळवलं पाहिजे. त्यासाठी विवेकाचे अधिष्ठान हवे. एक ईश्वराशिवाय सर्व नाशवंत आहे, ही जाणीव झाली की शाश्वत अशा भगवत् प्रेमाची प्राप्ती होते. प्रत्येक कर्म ईश्वरार्पण करावे. आपल्या हृदयात जर भगवंताचे अधिष्ठान असेल तर व्यावहारिक*

*सुखदुःखांच्या घटनांनी आपली शांती ढळत नाही.*

*भगवंताच्या ठिकाणी सदा सर्वकाळ आपलं मन स्थिर करण, तेही नाही झालं तर दिवसातून थोडा वेळ तरी स्थिर करा. तेही नाही तर निदान जे जे घडतयं ते ते त्याच्या इच्छेने घडतयं अशी भावना ठेवा. स्वतःकडे कर्तृत्व घेऊ नका आणि हे देखील कठीण वाटत असेल तर फलाच्या इच्छेने कोणते कर्म करू नका म्हणजे कर्तृत्व आणि भोक्तृत्व दोन्हीही बाजूला जातात, असं ज्ञानेश्वर महाराज सांगतात. यापैकी कोणती तरी एक भूमिका प्रयत्नपूर्वक मिळवली पाहिजे.*

*स्वधर्म पालनाला त्यांनी खूप महत्व दिलयं. ज्ञानेश्वरीत वर्णन केलेली ज्ञानी महात्म्याची सर्व लक्षणे आपल्याला दत्त महाराजांच्या ठिकाणी दिसून येतात.*

---

त्यानंतर त्र्यंबकेश्वराचे पं. भालचंद्र शास्त्रीजी मुळे यांचे संस्मरणीय असे प्रवचन झाले. त्यात त्यांनी आपल्या खुसखुशीत शैलीत विचारांचे मौलिक–धन श्रोत्यांच्या हातात मुक्तहस्ताने दिले. '' उच्च गतीला नेणारा धर्म समजण्यासाठी ज्ञानाची गरज आहे आणि ज्ञानदानासाठी महापुरुषांची गरज आहे. भौतिक विज्ञानाच्या घोडदौडीने थकलेला समाज शान्त सावलीच्या कल्पवृक्षाच्या शोधात आहे. श्री. दत्त महाराजांसारखे कल्पवृक्ष पूर्वसंचिताने कुठे तरी लाभतात. त्यांच्या सहवासात चित्त चैतन्यमय बनते. मनोनिग्रह साधता येतो. परमार्थपर पुस्तके फॅशन म्हणून नुसती वाचून चित्त एकाग्र होणार नाही. ज्ञानेश्वरी जगता आली पाहिजे. ' सर्वावस्थासु भगवद्भक्तिः' साधनेच्या सर्व प्रवासात भगवद्भक्ती कठड्यासारखा भक्कम आधार देते. माणसे धनाची अपेक्षा करतात व मनाची उपेक्षा करतात. हे मनरूपी धन परमेश्वराच्या कधीही न बुडणाऱ्या बँकेत ठेवावे. परमकल्याण निश्चितच आहे. कारण परमेश्वर सर्वज्ञ आहे. ज्ञानस्वरूप आहे तो पापपुण्याचा अचूक हिशेब ठेवतो. कोणताही पापी त्याच्या न्यायालयातून निसटत नाही. कारण परमेश्वर स्वतः नित्यशुध्द, नित्यमुक्त असतो.

कोणत्याही जिवाला आपले कर्म चुकवता येत नाही. हजारो गाईंमध्ये वासरू जसे आपल्या आईलाच जाऊन चिकटते, त्याप्रमाणे आपले कर्म आपल्यालाच चिकटणारच ! ' तो मी नव्हेच' असे म्हणून आपण कर्म टाळू शकणार नाही. जो मनानं भगवन्मय झाला त्याचं शरीर, त्याचं कर्म भगवन्मय म्हणजेच सत्प्रवृत्तच असणार. परमेश्वराशी नित्याभियुक्त झाले पाहिजे. त्याची प्रणिधानात्मक सेवा/भक्ती करावी. शास्त्रज्ञांची शास्त्रीय सिध्दांतापासून दूर न जाण्याची श्रध्दा जशी अढळ असते तशीच परमेश्वरापासून विचाराने, मनाने सुध्दा दूर न जाण्याची अविचल श्रध्दा हीच ब्रह्मपद प्राप्तीचा सोपान आहे.''

परमेश्वराशी अशी जवळीक साधण्याच्या विचारात गुंगूनच श्रोत्यांनी सभामंडपाचा निरोप घेतला.

मंगळवार, दि. १५ मे १९९०.

मा. सु. ग. शेवडे यांचे सुश्राव्य प्रवचन आणि छोट्या गंधर्वांची सुरवातीपासूनच रंगलेली मैफल यांनी मंगळवारची संध्याकाळ अक्षरशः अविस्मरणीय ठरली.

प्रा. सु. ग. शेवडे उत्तम प्राध्यापक – शिक्षक – मुख्याध्यापक अशा जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळून व्यवसायात स्थिरावलेले. पण त्यांनी आयुष्याची दिशाच एकदम बदलली आणि आंतरराष्ट्रीय कीर्तीचे प्रवचनकार झाले. १०००० प्रवचनांचा विक्रम केला. परदेशातही भारतीय संस्कृतीचे महत्व व्याख्यानातून सांगितले. समर्पक दृष्टांतांनी अवघड विषय सोपा करून सांगण्यात शेवडे यांचा हातखंडा. त्यांचे व्याख्यान म्हणजे विचार व खुसखुशीत विनोद यांची मेजवानी होती.

---

**प्रा. शेवडे यांचे व्याख्यान**

*धर्म, विज्ञान आणि अंधश्रध्दा यांचा परस्पर संबंध उलगडून दाखवतांना मा. शेवडेशास्त्री म्हणाले,*

*धर्म एकच. पंथ अनेक असतात. सनातन वैदिक धर्म ईश्वरनिर्मित आहे, आर्यांनी आचरण केलेला आहे. म्हणूनच धर्म म्हणजे रिलीजन (Religion) नव्हे. ईश्वरी अवस्थेत कधीही बदल होत नाही. त्यामागेही कार्य कारण भाव असतोच. ज्ञानदृष्टीने जगाकडे पाहिले असता जगतात सर्वत्र परब्रह्म भरलेले दिसते. वेद अपौरुषेय आहेत. विधात्याने विश्व का निर्माण केले हे वेद सांगतात. वैज्ञानिक संशोधनांनी वेदांना धक्का पोहोचत नाही. वेदांचा अभ्यास करावा, ज्ञान घ्यावे व ते जगाला द्यावे ही कामगिरी एका विशिष्ट वर्गाकडे सोपवली. ' सत्य वद धर्मं चर' असा उपदेश केला.*

*विज्ञान म्हणजे विशेष ज्ञान. अनुभवसिध्द ज्ञान. जर विज्ञान पदार्थलाच सर्वस्व समजून विचार करु लागलं तर गोंधळ होईल. ते यथार्थ ज्ञान न होता विपरीत ज्ञान होईल. न बदलणं हे ज्ञानाचे लक्षण आहे तर बदलणे हे विज्ञानाचे लक्षण आहे.*

*सनातन वैदिक धर्म परिपूर्ण ज्ञानांनी युक्त आहे. विश्वाच्या उत्पत्तीबरोबरच धर्म आहेच. हा अनादि परिपूर्ण धर्म विधात्यांनी निर्माण केला. धर्मग्रंथांवरची श्रध्दा ही अंधश्रध्दा नव्हेच. वेदांना धरून असलेला शब्दन् शब्द आमच्यापर्यंत पोहोचण्यासाठी आलेल्या महात्म्यांपैकी प. पू. दत्तमहाराज हे एक आहेत. भक्ती-भावनेचे फूल ज्यांच्या पायाशी ठेवावे असे हे स्थान आहे. अशा शब्दात प. पू. दत्तमहाराजांबद्दलचा आदर व्यक्त करून त्यांनी आपल्या भाषणाचा समारोप केला.*

---

## छोटा गंधर्वांच्या गायनाने अवतरलेली गंधर्वनगरी —

केवळ नावापुरतच छोटेपण असलेला हा गंधर्व केवळ एक गायक नसून श्रेष्ठ साधक आहे. ''तिन्ही लोक आनंदाने भरून जाऊ दे । तुझे गीत गाण्यासाठी सूर लागू दे'' अशी भगवंताची आळवणी करून छोट्या गंधर्वांनी आपली स्वरयात्रा सुरू केली आणि अव्याहत चालू ठेवली. ही स्वरसंपदा मिळवतांना त्यांनी कोणत्याही विशिष्ट घराण्याची बांधिलकी मानली नाही. ज्या ज्या गुरूंकडून जे चांगलं आणि नवीन मिळालं ते स्वीकारलं आणि त्यातून त्यांनी स्वतःची अशी खास गायकी निर्माण केली. ही सृजनशीलता आपल्या गाण्यात आली. कारण सरस्वती, नारद, तुंबरु या गानदेवतांचा आपल्यावर पूर्ण वरदहस्त आहे अशी त्यांची श्रध्दा आहे आणि अविचल श्रध्देला या जगात अशक्य असे काय आहे ? शाळेच्या चार भिंतीत या गंधर्वांना फारसं शिक्षण घेता आलं नाही. पण जगाच्या अनुभवाच्या शाळेत त्यांनी भरभरून कमावलं. यामागे असणारी त्यांची नित्य साधना, गुरु चरित्र, सप्तशती, देवी महात्म्य यांची अनेक पारायणे, शतचंडी, नवचंडी यासारखे यज्ञ हे मोलाचे आहेत. कलावंत असूनही त्यांच चारित्र्य पाण्यासारखं निखळ आहे. कसलंही व्यसन नाही. व्यसन असलच तर ते प्रसिध्दी पराङ्मुखतेचं !

## सूरांची अन् स्वरांची भावपूर्ण मैफिल —

छोट्या गंधर्वाचा आवाज पहिल्याच आलापापासून दृष्ट लागावी असा सुरेख लागला. परब्रह्माचा मार्ग नादब्रह्मातून जातो याची सर्वांना प्रत्यक्ष प्रचीती आली. संगीतातल्या विलक्षण सामर्थ्यानं सर्वांच्याच मनाच्या तारा छेडल्या गेल्या. जिवा–शिवाच्या ऐक्याची अनुभूती देणारं त्याच नारायण नारायण .... हे भजन इतक रंगलं की त्यांनी सर्वांनाच एका अनिर्वचनीय आनंदाच्या साम्राज्यात नेऊन सोडलं. '' सिंप सुनी इक मोती बिना'' ही भैरवी तर मानवाच्या आयुष्याची अपूर्णता आणि अर्थपूर्णता विविध दृष्टांतांनी पटवून देणारी होती. हे सूर संपूच नयेत असं वाटत असताना सूर हवेत विरले.'

आजकाल कलावंतांची बिदागी परवडत नाही म्हणून अनेक उत्तम कार्यक्रमांचे संयोजन करता येत नाही. पण छोट्या गंधर्वांनी मागितलेली बिदागीही लोकविलक्षणच होती. '' प. पू. टेंबे स्वामींची सर्व ग्रंथसंपदा प. पू. दत्तमहाराज यांच्याकडून आशीर्वाद म्हणून आपल्याला द्यावी'' असे मागणाऱ्या

कलावंताचे मन किती सश्रध्द असेल याची कल्पनाच करावी लागेल. शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह व प. पू. टेंबे स्वामींची ग्रंथसंपदा असा प्रसाद त्यांना देण्यात आला.

सप्तसुरांनी आणि स्वरांनी भारलेल्या या गंधर्व नगरीत रेंगाळत असतानाच तो दिवस संपला.

बुधवार, दि. १६ मे १९९०.

खरं तर आता सर्वांचेच डोळे १७ ता. च्या सत्कार–समारंभाकडे लागलेले होते. पूर्व तयारी जोरदार चालू होती. विविध योजना आखल्या जात होत्या. लोकांची वाढती उपस्थिती लक्षात घेऊन मांडवाचा विस्तारही वाढवला जात होता. प्रत्येकजण आपापल्या परीनं ह्या सत्कार–सोहळ्यात भाग घेण्यासाठी उत्सुक होता. अनेक सूचना दिल्या जात होत्या. कार्यकर्त्यांची धावपळ उडाली होती.

पण तरीही रोजचं ज्ञानसत्र अखंडितपणे चालूच होतं. बडोद्याच्या डॉ. सौ. उमा देशपांडे यांनी 'श्रीरंग हृदयम्' म्हणजेच 'पू. रंगावधूतस्वामी' यांच्या जीवनाचा पट आपल्या व्याख्यानातून उलगडून दाखवला. प. पू. रंगावधूत स्वामी हे गुजराथमध्ये दत्तसंप्रदायाचा प्रचार करणारे महात्मे ! प. पू. गुरुदेवांचे, गुळवणी महाराजांचे गुरु–बंधू ! नर्मदेच्या काठी नारेश्वरला पू. रंगावधूत स्वामींच्या मातोश्रींची समाधी आहे. तेथे नामःस्मरण, अन्नदान असा अखंड सोहळा चालू असतो. दत्तभक्तांनी एकवार अवश्य भेट द्यावी असे हे स्थान आहे. त्याचे प्रमुख प्रेरणास्थान असलेल्या पू. रंगावधूत स्वामींच्या जीवनावर प्रकाश टाकणारे असे हे व्याख्यान होते.

नंतर पं. गणेशशास्त्री द्रवीड यांचे विश्वरचना व तिला आधारभूत अशी सात तत्वे या अवघड विषयावर अतिशय विद्वत्तापूर्ण असे प्रवचन झाले. या प्रवचनात त्यांनी वादग्रस्त अशा सती आणि पातिव्रत्य या विषयावर सुरेख प्रकाश टाकला.

विश्वाची आधारभूत सात तत्वे म्हणजे – १) गाय २) विप्र ३) वेद ४) सती ५) सत्यवक्ता ६) अलुब्ध ७) दानशील.

१) गाय ही सर्व जगाची माता – तिचा वध कधीही होता कामा नये.

२) विप्र – ब्राह्मणांनी वेदांचे रक्षण केले. त्यातून विद्येचे रक्षण झाले. त्यांनी सर्व विद्या, कला यांत पारंगतता मिळविली. अध्यापन, सत्प्रतिग्रह व पौरोहित्य यावरच ब्राह्मणांनी आपली उपजीविका केली. शिल्पशास्त्र, नाट्यशास्त्र, गांधर्वशास्त्र यांनी रचना करणारे ऋषीमुनी होऊन गेले. आज कर्मादिकांचे अनुष्ठान नाही. त्यामुळे ब्राह्मतेज लुप्त होत आहे. मार्गच्युत झालेल्यांनाही योग्य मार्गावर आणण्याची जबाबदारी ब्राह्मणांची आहे. त्यांच्यात गुरुत्वाचा अंश असतो म्हणून त्यांनी त्यागवृत्ती ठेवावी आणि चारित्र्यसंपन्न असावे.

३) वेद – वेदांकडून चांगल्या गोष्टी आलेल्या आहेत. वेदोक्त यज्ञयाग वेळेवर केले की, पाऊस चांगला पडतो. पूर, दुर्भिक्ष्य, अपमृत्यू यासारख्या दैवी विपत्तींचा मंत्रशास्त्रांनी परिहार करता येतो.

४) सत्यवादी – खरे बोलणारे लोकच जगाला तारतात, 'सत्ये सर्वं प्रतिष्ठितम्' सत्यमेव जयते ही शास्त्रवचने प्रसिध्दच आहेत.

५) अलुब्ध – ज्यांना लोभ नाही असे लोक. यांच्याकडून सत्कर्मे व सदाचरण घडते.

६) दानशील – दान देणारे लोक. हे दान 'प्रियवाक्सहित' असावे, देशे, काले, च पात्रे च असे सात्विक दान असावे. असे दान करणाऱ्यांचे जगावर फार मोठे उपकार असतात. त्यांच्या आश्रयाने अनेकांची जीवनधारणा होते.

७) सती म्हणजेच पतिव्रता स्त्री. या पतिव्रतांचा धर्म पती जिवंत असतांना पतीला देववत् पूज्य मानून त्यांच्या मनाप्रमाणे वागावे.

पती वारल्यानंतर दोन पर्याय १) सहगमन २) विधवा धर्माचे पालन. दोन्हींचे फळ सारखेच. कोणता मार्ग स्वीकारायचा हे पत्नीने ठरवायचे.

शास्त्रोक्त सहगमनात जबरदस्ती व सक्ती अजिबात नाही. पत्नीच्या सहगमनाला घरच्यांनी विरोध केल्यास ती आत्महत्या करेल. त्यापेक्षा सहगमनाला परवानगी देणे योग्य असा मूलभूत

विचार आहे.

'अनुव्रजन्ति भर्तारं गृहात् मुदा' असे सतीचे वर्णन आहे. उच्च कोटीच्या पतिव्रता – सत्वाधिका स्त्रिया यांना सूर्य–अग्निही घाबरत . या स्त्रिया स्वतःच्या तेजाने जळतात. अग्नींची दाहकता त्यांना लागत नाही. अनुसूया – रेणुका या पतिव्रतांचे सहगमन असे उच्च कोटीचे आणि आदर्शभूत आहे. एखाद्या सतीला सती जातांना कष्ट होऊ लागले तर तिला बाहेर काढावे असेही शास्त्रवचन आहे. एवढेच नव्हेतर गर्भिणी, रजस्वला, सूतिका आणि बालापत्या (अतिशय लहान अर्भकाची आई) यांना शास्त्राने सहगमन निषिध्द ठरवले आहे.

या शास्त्राधारभूत आणि तर्कशुध्द, व्यासंगी विवेचनाने 'सती' या विषयाबदलचे उपस्थितांच्या मनांतले सर्व संशय व अज्ञान विराम पावले आणि त्याचवेळी काशी येथील अध्ययनाने पं. गणेशशास्त्री यांच्या ज्ञानाला आलेल्या तेजस्वी पैलूंचेही हृदयंगम दर्शन घडले.

सती या विषयावर जेव्हा राजकीय वादळ उठले, तेव्हा पं. गणेशशास्त्री यांनी २०० पानांचे माहितीपूर्ण पुस्तक लिहून मुख्यमंत्री, पंतप्रधानांपासून राष्ट्रपतींपर्यंत सर्वांना पाठवले होते आणि मत मागवले होते. पण एकही उत्तर आले नाही, असे ते म्हणाले.

गुरुवार, दि. १७ मे ९०.

ज्या दिवसाची सर्वजण चातकासारखी वाट पहात होतो तो धन्य आनंद दिन उगवला. 'भूवरी वैकुंठ अवतरले' असेच या दिवसाचे वर्णन करता येईल.

सकाळी प्रसन्न–मंगल वातावरणात प. पू. दत्तमहाराजांनी 'अविच्छिन्न परंपरा कुडली – शृंगेरी (बेंगलोर) मठाचे जगद्‌गुरु श्रीमत् शंकराचार्य योगाभिनव नरसिंहभारती स्वामी महाराज' यांची पाद्यपूजा केली. गुणवंत विद्वानाने गुणसंपन्न विद्वानाचा केलेला गौरव म्हणजे ही पाद्यपूजा हा दुग्ध–शर्करा योग होता आणि त्यानंतरचा गोप्रदानाचा कार्यक्रम अनेकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा होता.

गाईला आपण गोमाता म्हणतो. गाईचे दूध हे पूर्णान्न आहे.

**गौर्धेनुर्भव्या माता रुद्राणां दुहिता वसूनां ।**
**स्वसाऽदित्यानां अमृतस्य नाभिः ॥**

गोमाता ही एकादश रुद्रांची माता आहे. अष्ट वसूंची मुलगी आहे. बारा सूर्यांची बहीण आहे. तर अमृताची खाण आहे, असे वेदात गाईचे महत्व सांगितले आहे. या गाईचे दान मुलीप्रमाणेच सालंकृत करावयाचे असते. तिला उत्तम वस्त्रे घालावयाची आणि मुख्य म्हणजे ती सवत्स हवी. महाराजांच्या हातून जिचे दान झाले ती किती भाग्यवान् ? आणलेली गाय पांढरी शुभ्र आणि देखणी. तिला लगटून चाललेले तिचे तितकेच गोंडस वासरु. त्याचं रुपडं सारी कशी डोळ्यात साठवून घेत होती. नववधूला नटवावं तसा तिला साज चढवला जात होता. मंत्रोच्चारांच्या पवित्र निनादाने वातावरण दुमदुमलं होतं. तिच्या शिंगांना सोन्याची टोपणं घातली. खुरांना चांदीची टोपणे घातली. चांदीची साखळी कमरेला बांधली. डोक्यावर रत्न ठेवले. गळ्यात मोत्याचा सर घातला. हिरव्यागार वस्त्राची पाठीवर झूल घातली तेव्हा खरोखरच एखादी गोरीपान युवती हिरवीगार साडी परिधान करून सर्वांच्या कौतुकाच्या नजरा झेलीत, दिमाखात उभी आहे, असा भास होत होता. गाईन हे सारं कोडकौतुक अगदी गुण्या–गोविंदानं करून घेतल कारण ती प्रसन्न होती. त्यासाठी सकाळीच ५ सुवासिनींनी औक्षण करून सुगंधी तेल लावून गरम पाण्याने चोळून–चोळून तिला न्हाऊ–माखू घातली होती. म्हणूनच प्रचंड जनसमुदाय तिला परका वाटत नव्हता, ती बुजली नव्हती.

गळ्यात हार घालून महाराजांनी ही गाय विधीवत् गोसूक्त पठण चालू असतांना अग्निहोत्री राजारामशास्त्री कुलकर्णी यांना प्रदान केली. ज्या

कर्मात गाईचे दूध, तूप, गोमय, गोमूत्र या सर्वांचा उपयोग केला जातो ते कर्म म्हणजे अग्निहोत्र. अशा योग्य व्यक्तिला केलेले गोप्रदान अगदी सार्थ होते. गोप्रदानानंतरही वर्षभर तिच्या योगक्षेमाची व्यवस्था दान देणाऱ्याने केली पाहिजे, असे शास्त्रात सांगितले आहे. त्यानुसार ५००० रु. श्री. दत्तमहाराजांनी आहिताग्नी श्री. राजाराम कुलकर्णी यांना दिले. शास्त्रात या गोप्रदानाचे महत्पुण्य सांगितले आहे. भगवान गोपालकृष्ण आणि प्रभु दत्तात्रेय यांनाही गाई अत्यंत प्रिय आहेत. प्राचीन काळी – तर गोधन हेच सर्वश्रेष्ठ धन होते.

या गोप्रदानानंतर सगळ्यांच्याच मनाने दुपारच्या सत्कारसमारंभाचा ध्यास घेतला होता.

## कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर–

सत्कार–समारंभाची जय्यत तयारी झाली होती. जेवणे होताच लोकांनी मंडपात जागा धरण्यास सुरुवात केली होती. तर सुवासिनींची महाराजांना औक्षण करण्यासाठी धांदल उडाली होती. वातावरण उत्साहाने भारलेले होते. करवीर पीठाचे शंकराचार्य आणि कुडली मठाचे शंकराचार्य यांच्या उपस्थितीने त्याला पावित्र्याची जोड दिली आणि प्रभाशंकर गायकवाड आणि बंधूंच्या सनईच्या मंगल सुरांनी त्यात मांगल्य ओतले होते. साऱ्यांच्या उत्सुक नजरा एकदा व्यासपीठाकडे तर एकदा महाराजांच्या वाटेकडे वळत होत्या. प. पू. दत्तमहाराज १०२ सुवासिनींच्या भावपूर्ण औक्षणांचा दोन्ही बाजूंनी स्वीकार करीत आणि त्यांना ओवाळणी घालत व्यासपीठावर आले. पाठोपाठ दोन्ही शंकराचार्यांचेही आगमन झाले.

आणि या भव्य, दिव्य, देखण्या सोहळ्याला सुरुवात झाली. वैदिक मंगलाचे पठण चालू होते. त्याचवेळी श्री संस्थान कुरवपूर, नृसिंहवाडी, औदुंबर, गाणगापूर, कांची कामकोटी पीठाचे जगद्गुरु शंकराचार्य, शृंगेरी पीठाचे शंकराचार्य आणि श्रीधरस्वामी संस्थान वरदहळ्ळी या अत्यंत पवित्र धामांकडून आलेल्या आशीर्वादपर मंगलाक्षता पं. श्रीनिवासशास्त्री यांनी महाराजांच्या मस्तकावर वाहिल्या व व्यासपीठावरचे सर्व वायुमंडल भारून गेले.

त्यानंतर गौरव–समितीचे अध्यक्ष पं. दाते–शास्त्री यांनी आपले मनोगत व्यक्त करून उपस्थितांचे मनःपूर्वक स्वागत केले. असा सोहळा आपल्या सर्वांना अनुभवायला मिळतो आहे हे आपले परम भाग्य आहे, असेच त्यांना प्रास्ताविकातून सांगायचे होते. पं. दाते शास्त्री हे एक प्रसन्न आणि संयत व्यक्तिमत्व. कोणत्याही पेचप्रसंगाची निरगाठ होते आहे असं लक्षात येताच ती हळूवार हाताने सोडवणारे, कुणालाही न दुखवता आपला मुद्दा पटवून देणारे असे अध्यक्ष लाभल्यानेच हा सर्व समारंभ निर्विघ्नपणे पार पडत होता.

त्यानंतर या समारंभाचे अध्यक्ष करवीर पीठाचे श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य विद्याशंकर भारती स्वामी महाराज यांचा पुष्पहार, शाल, गौरवचिन्ह आणि श्रीफळ देऊन समिती अध्यक्षांनी सत्कार केला व प्रमुख अतिथी अविच्छिन्न परंपरा कुडली शृंगेरी मठाचे श्रीमत् जगद्गुरु शंकराचार्य योगाभिनव नरसिंहभारती स्वामी महाराज यांचा असाच सत्कार समितीचे उपाध्यक्ष मा. किशोरजी व्यास यांनी केला.

## संदेश वाचन –

या आनंद सोहळ्यात प्रत्यक्ष सहभागी झालेले लोक खरच भाग्यवान आणि कृतार्थ ठरले. पण तीव्र इच्छा असूनही या सोहळ्याला अनेक लोक काही कारणांनी येऊ शकले नव्हते पण त्यांनी मनाने केव्हाच या सोहळ्यात उपस्थित झाले होते. आपल्या शुभकामना या सोहळ्यासाठी पाठविल्या होत्या. त्यातील काही प्रातिनिधिक संदेशांचे वाचन महाराजांचे सदाचार संपन्न विद्यार्थी आणि गौरव–समितीचे एक कार्यवाह श्री. पारखीशास्त्री यांनी केले.

## प्रातिनिधिक वक्त्यांचे मनोगत –

माऊली म्हणते, ये हृदीचे ते हृदि ठावे ।

महात्मे मनकवडे असतात. त्यांना शब्दांवाचून शब्दांपलीकडचे सुध्दा कळते पण आपण सामान्य माणसं, आपल्याला दुसऱ्यांचं मन जाणून घ्यायला, आपल्या मनातल्या भावना आपल्या आराध्यदैवता–पर्यंत पोहोचवायला शब्दांचाच आधार घ्यावा लागतो. ' शब्दांनो मागुते या' असेच म्हणावे लागते. महाराजांबद्दल सर्वांच्याच मनात प्रेमादराच्या भावना उचंबळून आलेल्या होत्या. त्या शब्दरुप धारण करू पहात होत्या. या सर्वांच्याच मनातल्या भावनांची, शब्दफुलांची ओंजळ महाराजांच्या चरणारविंदी निवडक प्रतिनिधींनी अर्पण केली.

मा. श्रीनिवासशास्त्री यांनी संस्कृतमधून महाराजांचे गुणगान केले. प. पू. दत्तमहाराजांनी पं. नागेशशास्त्री यांच्याकडे संपूर्ण शास्त्राध्ययन केले आहे आणि या विद्येचा वारसा त्यांनी आपल्या गुरुंच्या मुलाला म्हणजेच पं. भालचंद्रशास्त्री यांना दिला आहे. या शिष्याने आपल्या गुरुबद्दलचा भक्तिभाव आपल्या मनोगतातून व्यक्त केला. महाराजांच्या सहस्त्रदर्शन विधीचे प्रमुख पौरोहित्य ज्यांनी केले असे वेदमूर्ती लक्ष्मीकांत दीक्षित ! यांना प. पू. गुळवणी महाराज आणि दत्तमहाराज या दोघांचाही घनिष्ठ सहवास ३५–४० वर्षे लाभलेला आहे. त्यांनी वैदिकांच्या तर्फे महाराजांची थोरवी सांगितली आणि साधक बंधू–भगिनींतर्फे श्रीमती सुशिला ताई मोडक आणि श्री. भाऊसाहेब शिंगणे यांनी आपले हृद्य अनुभव सांगितले. (श्रीमती सुशिलाताई मोडक हे एक भावनाशील व्यक्तिमत्व आहे. ज्ञानेश्वरी आणि प. पू. दत्तमहाराज ही त्यांची श्रध्दास्थाने ! कुरवपूर ही प्रथम दत्तावतारी श्रीपादवल्लभांची तपोभूमी ! मोठे तीर्थक्षेत्र पण तिकडेच दुर्गम. अशा अवघड ठिकाणी प. पू. दत्तमहाराजांच्या भागवत सप्ताहाचे संयोजन करण्यात श्रीमती सुशिलाताईंचा फार मोठा वाटा होता.) (श्री. भाऊसाहेब शिंगणे – एक अत्यंत सात्विक व्यक्तिमत्व. अतिशय शास्त्रोक्त पध्दतीने, संपूर्ण मौन पाळून, घराच्या आवाराच्या बाहेरही न पडता त्यांनी श्रेष्ठतम असे गायत्री पुरश्चरण केले. महाराजांचे अनुग्रहीत असलेल्या त्यांच्या पवित्र वाणीतून दत्तमहाराजांचे वर्णन ऐकणे हा एक चांगला योग होता.) प. पू. दत्तमहाराजांच्या थोरल्या बंधूंनी जे अनुभव सांगितले ते रोमांचकारी होते. महाराजांच्या सामर्थ्याच्या एका वेगळ्याच पैलूचे दर्शन त्यांच्या भाषणातून घडले.

## मानपत्र–वाचन –

प. पू. दत्तमहाराजांचे महात्म्य शब्दातीत आणि कालातीत आहे. शिवाय लौकिक मान–सन्मानाकडे असे निरासक्त महात्मे अत्यंत अलिप्त वृत्तीने पहातात. आपण केवळ आपल्या आनंदासाठी – समाधानासाठी संस्कृतमधून एक मानपत्र तयार केलेलं आहे. ते धारवाडच्या कर्नाटक कॉलेजातील संस्कृत विभागाचे प्रमुख पं. महेश्वरशास्त्री उप्पिनबेट्टिगिरी यांनी वाचून दाखवले आणि त्याचा मराठी अनुवादही डॉ. राजाभाऊ जोशी यांनी वाचून दाखविला.

## महाराजांचा सत्कार–सोहळा –

ज्या क्षणाची सर्वजण आतुरतेने वाट पहात होते, तो सुवर्णक्षण अवतरला.

**विद्वत्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन ।**
**स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते ॥**

थोडासा बदल करावासा वाटतो, विद्वान सर्वेषु विद्वत्सु पूज्यते । म्हणूनच कांची कामकोटी पीठाचे परमाचार्य श्रीमत् जगद्गुरु चंद्रशेखरेंद्र सरस्वती स्वामी महाराज यांच्याकडून महाराजांचा सत्कार करण्यासाठी कामाक्षीची प्रतिमा असलेली सुवर्णशृंखला व शाल आली होती. ती पं. श्रीनिवास–शास्त्री यांनी प. पू. दत्तमहाराजांना अर्पण केली. कुडली शृंगेरी मठाकडून शालजोडी आली होती. तीही अर्पण केली गेली.

यानंतर गौरव समितीतर्फे पं. धुंडिराजशास्त्री दाते यांनी महाराजांचा भव्य, दिव्य, हृद्य आणि विविधांगी सत्कार केला. सामान्यतः शाल पांघरणाऱ्या माणसाला ऊब मिळावी म्हणून शाल

अर्पण केली जाते. पण साधकांतर्फे महाराजांना भक्तिची/श्रध्देची शाल घातली आणि महाराजांच्याकडून वात्सल्याची, कृपेची ऊब मिळविली.

दूरदूरच्या ठिकाणाहून अनेक साधक वामन–निवासात वास्तव्याला आले होते. प्रत्येकाचे नाव, गाव, प्रवृत्ती, प्रकृती वेगवेगळ्या पण महाराजांबद्दल असीम श्रध्दा ही भावना मात्र एकच ! म्हणून अनेक गुलाबपुष्प एकाच सूत्रात गुंफलेला एक भरघोस पुष्पहार महाराजांना सर्वांतर्फे अर्पण करण्यात आला आणि नाण्यांचा हार समर्पण करण्यात आला.

पगडी हे पुणेरी विद्वानांचे भूषण. पेशव्यांच्या या पुण्यातून ते आज लुप्त होत चालले आहे, त्याची आठवण म्हणून महाराजांना पगडी अर्पण करण्यात आली. सामान्य माणसाच्या शरीराला अलंकारांनी शोभा येते. पण देवांच्या शरीराचा आश्रय लाभला तर अलंकारांचे मूल्य वाढते. त्याचप्रमाणे महाराजांच्या मस्तकावर विराजमान होण्याचे भाग्य लाभल्याने त्या शिरोभूषणाचीच शान वाढली होती.

त्यानंतर महाराजांना मानपत्र समर्पण करण्यात आले. ही खरं तर ज्योतीने तेजाची केलेली आरती होती. कारण मानपत्र द्यायला तसा अधिकार असावा लागतो. आपल्याकडे अधिकार नसला तरी प्रांजळ इच्छा व तळमळ आहे ना ? तिचा आधार पुरेसा ठरला.

शेवटी १००१/– रु. ची थैली, श्रीफळ व इतर फळे अर्पण करण्यात आली. हा सुवर्णक्षण इतका मोलाचा होता की, कधीही न थांबणारा काळ, त्यालाही पळभर थांबावेसे, रेंगाळावेसे वाटले असेल.

## मा. सौ. आईसाहेबांचा सत्कार –

अगस्त्यांच्या जीवनांत लोपामुद्रेने पार पाडलेली भूमिका पू. दत्तमहाराजांच्या जीवनात सौ. आई–साहेबांनी अंशतः उत्कृष्टपणे पार पाडलेली आहे. आपले अस्तित्व पतीच्या अस्तित्वात लोपवूनही, आपल्या संसार रथाची दोन्ही चाके त्यांनी समर्थपणे पेलली. म्हणूनच मुले, मुली, जावई, सुना, नातवंडे यांनी त्यांचा संसारवृक्ष बहरलेला आहे आणि महाराज आपल्या सर्वांच्या आध्यात्मिक जीवनात आनंद निर्माण करू शकत आहेत. सौ. आईसाहेब यांना साडी–चोळी, वेणी असे सौभाग्यलेणे देऊन सौ. ताईमहाराजांनी त्यांची ओटी भरली.

## सौ. ताई महाराजांचा सत्कार –

श्री. ज्ञानेश्वर काजळकर हे सौ. ताई–महाराजांचे वडील. मराठवाड्यात त्यांची मोठी शिष्यपरंपरा आहे. त्यांनी सौ. ताईमहाराजांना आपला उत्तराधिकारी नेमले. पण त्यांनी स्वतःकडे कधीच गुरुपद घेतले नाही. अनुग्रहासाठी आलेल्यांना त्या महाराजांकडेच पाठवतात. जालन्याला एका सत्पुरुषाच्या समाधी–मंदिरात त्यांनी भक्तिपीठ उभारले आहे. येथे ६/६ महिने अखंड दिगंबराचे नामःस्मरण चालते. महाराज तर त्यांना साक्षात् भगवती मानतात. त्यांना सौभाग्यलेणे देऊन सौ. सुशिलाताई दाते यांनी त्यांची ओटी भरली.

त्यानंतर वेदविद्येचे माहेरघर व आद्यपीठ असलेल्या काशीहून आलेले मानपत्र पं. गणेश्वरशास्त्री यांनी वाचून दाखवले व महाराजांना समर्पण केले.

देऊळगावराजा–महाराजांच्या पिताजींचे समाधी–स्थान प. पू. धुंडीराजमहाराज कवीश्वर समाधी–मंदिर व श्री दत्त मंदिर उपासनाधाम देऊळगावराजा विश्वस्त मंडळी यांचेकडून आलेल्या मानपत्राला खास जिव्हाळा आणि विशेष महत्व होते. ते वाचून दाखवण्यात आले.

महर्षी वेद व्यास प्रतिष्ठान अहमदनगर यांच्याकडून शाल, रोख ५००० रु. कृष्णार्जुनाची मूर्ती असलेला चांदीचा रथ व मानपत्र श्री. ओंकारनाथजी मालपाणी यांनी महाराजांना अर्पण केले.

त्यानंतर विविध संस्था व व्यक्ती यांच्या वतीने एकच भरगच्च पुष्पहार महाराजांना अर्पण केला. तसेच पुण्यातील देवदेवेश्वर संस्थानच्या ट्रस्टने एक देखणा व भव्य हार महाराजांना अर्पण केले.

महाराजांचा हा भव्य व हार्दिक सत्कार पहातांना सर्वांचीच मने भारावून गेली होती. 'माझी न दृष्ट लागो' असाही भाव मनात उमटत होता.

यानंतर समारंभाचे प्रमुख अतिथी अविच्छिन्न परंपरा, कुडली शृंगेरी मठाचे शंकराचार्य यांनी आपल्या छोट्याशा भाषणात महाराजांचे अभीष्ट चिंतन केले व सर्वांना मंगल आशीर्वाद दिले.

---

## जगत् गुरु शंकराचार्य कुडली मठ (१७.५.९०)

*ब्रह्मश्री कविश्वरशास्त्रींची विद्वत्ता आणि सात्विकता या बरोबर साधनामार्गातलाही उत्कर्ष होत असलेला पाहून आम्हांला समाधान होत आहे. असे सज्जन आणि तपस्वी विरळाच आहेत.*

*या शांती समारोहाच्या निमित्ताने त्यांचे दीर्घायुरारोग्य उत्तरोत्तर वाढून ईश्वर शरणागतीचे उत्तम साधन स्वतःला साध्य करून, अन्य अधिकारी वर्गांच्या योग्यतेप्रमाणे त्यांनाही बोध करून जिज्ञासूंना यांच्या साधनाचे फल मिळो अशी आम्ही अपेक्षा करतो.*

*यांच्या उत्तरोत्तर कल्याणासाठी श्री विद्याशंकर चंद्रमौळीश्वर स्वामींजवळ आम्ही प्रार्थना करीत आहोत.*

---

हे शंकराचार्य ऋग्वेदमंत्रसिध्दी करून योगतपसिध्द झाले आहेत. केवळ वायूवर ते ४० दिवसांचे एक मंडळ राहतात. असा वेगळा अधिकार असलेल्या करवीर पीठाच्या शंकराचार्यांचे भाषण,

---

## करवीर पीठाचे जगद्‌गुरु शंकराचार्य यांचे अध्यक्षीय भाषण

*आजच्या या स्वर्गीय सोहळ्याचे वर्णन माऊलीच्या भाषेत ' आजि सोनियाचा दिनु । वरुषे अमृताचा धनु" असेच करावे लागले. १९९० सालात जर राम, कृष्ण, दत्तात्रेय या आदिपुरुषांची प्रचीति घ्यायची असेल तर वासुदेव निवासात जा. पुष्पातील चोखंदळ लोकांनी दत्तमहाराजांचा गौरव केला म्हणजे अखिल भारताने केला असे मानायला हरकत नाही.*

*आजचा सत्कार एका सज्जनाचा, गुरुभक्ताचा, सत्प्रवृत्त माणसाचा आणि एका महान विज्ञानाचा आहे म्हणून त्याचे महत्व वेगळे आहे. वैदिक धर्माची महती की येथे विनयाच्या कोंदणात शोभणारी विद्या असेल तरच तिचा गौरव होतो. ज्ञानाच्या सात पायऱ्या ओलांडून जाणाऱ्या महापुरुषाला सर्वश्रेष्ठ मानले जाते. जीवनमुक्त अवस्थेतल्या आमच्या ब्रह्मश्री दत्तमहाराजांचा सत्कार या समारंभाच्या सातव्या दिवशी होत आहे. हा एक योग आहे. भगवान श्रीकृष्ण म्हणतात,*

***मनुष्याणां सहस्त्रेषु यःकश्चित् यतति सिध्दये ।***
***यततां अपि सिध्दानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः ।***

*आपल्याला बहिर्मुखतेमुळे महाराजांचे मोठेपण कळत नाही. काहीच नको असं वाटतं तेव्हा अवघड अशा मुमुक्षतेला सुरुवात होते. पण आम्हांला जगातलं सर्वच हव अस आहे, हव्यास आहे. हा हव्यास सोडून हवन करायला शिकलं पाहिजे. कारण आमची संस्कृती यज्ञ-प्रधान आहे, म्हणूनच इथे सात दिवस हवन चाललय ! आपली संस्कृती स्वयंपूर्ण आहे तरीही पाश्चात्त्यांकडे भीक मागण्याची आमची जी दयनीय स्थिती आहे त्यातून बाहेर येण्याकरिता अशा समारंभाची गरज आहे.*

*आपल्या प्रातःस्मरणीय ब्रह्मश्री दत्तमहाराज कवीश्वरांचा हा जो सोहळा होतो आहे, तो अनेक दृष्टींनी अर्थपूर्ण आहे. यातून काय घेऊन जायचं ते कळलं पाहिजे. कारण ते वर्णन करून सांगणे कठीण आहे.*

*वस्तुतः सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा हा घरगुती स्वरूपाचा असतो. पण त्यांचे घरचेच लोक इतक्या मोठ्या संख्येत आहेत, कारण*

***अयं निज परो वेत्ति गणना वघुचेतसाम् ।***
***उदारचरितानां तु वसुधैव कुष्टुम्बकम् ।।***

*त्यामुळे कौटुंबिक सोहळा, पण कुटुंब फार मोठं.*

*लौकिककार्यात मी त्यांच्या कुटुंबाच हे वर्णनकेल असलं तरी त्यांचं खरं कुटुंब वेगळच आहे. सामान्य कुटुंब मृत्युलोकाच्या नियमाप्रमाणे वियोगात्मक असतात. महाराजांना लाभलेल कुटुंब ज्यांचा कधीच वियोग होत नाही अस आहे. याचे वडील आहेत अधिकारी धुंडिराज-महाराज. आजोबा वक्रतुंड महाराज. यांचा अधिकार असा की, एकदा प्रवचनाला बसले की हजारो लोकांना त्यांच गणपती स्वरुपात दर्शन झालेल आहे. लौकिक कुटुंबही इतक अधिकारी पण सुभाषितकाराच्या मते,*

***धैर्यं यस्य पिता क्षमा च जननी***
***शांतिश्चिरं गेहिनी ...***

*प्रत्यक्ष धैर्य पिता, क्षमा ही माता, शांतीशी लग्न केलेलं ज्ञानामृत हेच भोजन. भारतीय संस्कृतीच पायाभूत असलेल वैराग्य दत्तमहाराजांच्या ठिकाणी मूर्तिमंत वास करतय. हे आदर्श स्थान आमच्या संस्कृतीच गौरीशंकर आहे.*

*भगवान श्री दत्तात्रेय महाराजांचे सान्निध्य यांना लाभलं आहे. 'नृसिंहवाडी' या दत्तस्थानाशी यांचा सतत संपर्क आहे. तिथे घर आहे. वास्तव्य आहे. अगदी बालवयात प. पू. वासुदेवानंद सरस्वतींचे दर्शन त्यांना झाल आहे. ही फार मोठी बाब आहे. घराण्याचा केवढा मोठा वारसा लाभला आहे आणि प्रातःस्मरणीय योगिराज गुळवणी महाराजांचा संपूर्ण वरदहस्त लाभलेला आहे. कपिला गाईचे दूध मुळात उत्तम, ते तापवलेल, त्यात साय मिसळलेली, शिवाय खडीसाखर, दूधमसाला आणि केशर घातलेल अशा तऱ्हेच हे दूध आहे. ते भक्तीने सेवन करा. आपल भाग्य उजळल्या-शिवाय रहाणार नाही.*

*हजारो वैदिकांनी यांना आशीर्वाद दिले. श्री दत्त महाराजांना ठरलेलं, हक्काच, अधिकाराच शंभर वर्षांच आयुष्य लाभाव एवढ्याचसाठी सात दिवसपर्यंत भगवान दत्तात्रेय महाराजांच्या समोर आपण सर्वांनी धरण धरलेलं आहे. आम्हीही त्यात सहभागी आहोत आणि भगवान दत्तात्रेय परमकृपाळू आहेत. 'करूणा' हेच त्यांच स्वरुप आहे. आपण त्यांना दत्त माऊली म्हणतो. एवढ्या जबरदस्त मागणीला नकार देणे त्यांना शक्य होणार नाही. महाराज शतायुषी होतीलच. आपल्याला मार्गदर्शनाकरिता असे महापुरुष हवे आहेत. त्यांचे दर्शन आपल्या कल्याणाला कारणीभूत ठरेल आणि ते तस घडाव.*

*शेवटी*

***सर्वेऽपि सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः ।***
***सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखमाप्नुयात् ।***

*असे म्हणून या ठिकाणी आम्ही विराम घेतो.*

---

करवीर पीठाचे जगद्गुरु श्रीमत शंकराचार्य – विद्याशंकर भारती स्वामी महाराज ह्यांचे कार्य खरोखरच लोकाभिमुख आहे. संस्कृत मराठी साहित्याचा त्यांचा सखोल अभ्यास असून त्यांना संगीताची आवड आहे. म्हणून ३/३।। तास चाललेल्या कार्यक्रमानंतरही त्यांचे आशीर्वादपर भाषण ऐकताना कुणीही कंटाळले नव्हते. कारण ते तर्क कर्कश नव्हते तर रसाळ होते, श्रवणीय होते. विनोदाची झालर असलेले होते आणि सर्वसामान्यांच्या हृदयाला जाऊन भिडणारेही होते.

यानंतर सभेच्या नेहमीच्या पध्दतीत थोडा बदल करून आधी कृतज्ञता व्यक्त करण्याचे काम या गौरव–समितीचे उत्साही व धडाडीचे सहकार्यवाह श्री. बसंतराव जोशी यांनी केले. रात्रंदिवस काम करणाऱ्या लोकांना अशी कौतुकाची थाप फार मोठे प्रोत्साहन देते.

आणि शेवटी काशी, कर्नाटक, देऊळगावराजा, फलटण, कोल्हापूर, जालना इ. अनेक दूरदूरच्या ठिकाणाहून आलेली सर्व साधक मंडळी अगोदरचे ५/६ दिवस सतत प. पू. दत्तमहाराजांचे आशीर्वचनपर संजीवक अन् समर्थ वाणी ऐकण्यासाठी उत्सुक होती, भुकेली होती. खूप ऐकायला मिळत होत. आवडत होत. पण आपल्या उपास्य देवतेची अमृतवाणी, शांत, स्निग्धतेने ओथंबलेला शब्द ऐकायला, ते विचार आपल्या हृदय–संपुष्टात साठवून ठेवायला सारेच जण उत्सुक होते आणि त्या साऱ्यांचे पूर्ण समाधान प. पू. दत्तमहाराजांनी आपल्या

आशीर्वादपर भाषणाने केले. हे भाषण म्हणजे,

**का कमळिकेचेनि घालेपणे ।**
**हृदयीच्या मकरंदा राखो नेणे ।**
**दे राया रंका पारजे ।आमोदाचे ॥**

या ज्ञानेशांच्या वचनाची साक्षात अनुभूती होती.

---

## प. पू. दत्तमहाराज यांचे सत्काराला आशीर्वादात्मक उत्तर

*सहस्त्रचंद्रदर्शन हे शास्त्रीय आणि हितकारक कर्म आहे. म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन. शिवाय अशी सत्कर्म ज्या ठिकाणी होतात त्या ठिकाणी सामुदायिक ईश्वर शक्ती विशेषरूपाने आविष्कृत होते.*

*येथे ऋक-संहिता स्वाहाकार झाला. दहा-दहा हजार मंत्र ज्यांनी कंठस्थ केले आहेत. अशा तपसंपन्न मंडळींच्या मुखातून मंत्र कधी संपला, स्वाहा कधी निघाला आणि पुढचा मंत्र कधी सुरु झाला हे लक्षातसुध्दा आलं नाही. प्रत्येक देवतांच्या प्रीतीकरता पंचायतन याग झाले. नाममंत्राच अखंड भजन भक्तांनी या ठिकाणी केल. ते श्रवण करतांना दिगंबरा दिगंबरा या वाणीला द्रुत गती केव्हा आली व पुन्हा मंद गती केव्हा झाली हे सुध्दा लक्षात यायच नाही.*

*बाह्य विषय विसरून जाणं हे अंतीम समाधान आहे. अशी मंडळी आत्यंतिक श्रध्देन हे कर्म करीत आहेत हे पहायला मिळाल. सामुदायिक शक्तीचा आविर्भाव झाल्याने निर्विशेष समाधान मिळाले. कृष्णशास्त्री आर्वीकर गौरव समितीचे अध्यक्ष महोदय पं. दाते शास्त्री व इतर सहकाऱ्यांचे चार-पाच महिने काम चाललेले आहे.*

*धारवाडच्या आचार्य पीठाची जबाबदारी सांभाळून पं. राजेश्वर शास्त्री येथे वारंवार आले. आचार्यांच्या अनुज्ञेने इथे येऊन कार्य केले. या सर्व कार्यकर्त्यात ईश्वर-शक्ती जागृत झाल्यामुळे हे कार्य घडलेले आहे. शक्ती जागृत करणे हे गुरुमहाराजांच्या शक्तीपीठाचे विशेष कार्य आहे. या ठिकाणी सात-आठ दिवस शक्ती जागृत झाली आहे असे म्हणावयास हरकत नाही. त्याशिवाय एकमताने, सामंजस्याने सर्व कार्य कशी पार पडतील ?*

*'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्' हे भगवंताच्या आविर्भावाचे गौण प्रयोजन आहे. 'धर्म-संस्थापना' हे मुख्य आहे. असाधूंचा नाश करणे शक्य नाही कारण जीवरूप हे नित्य आहे. म्हणजे असाधूंचा नाश म्हणजे त्यातील असाधुत्वाचा विनाश. ज्ञानेश्वर महाराज 'जे खळांची व्यंकटी सांडो' म्हणताहेत. खळांचा नाश होवो असे म्हणत नाहीत. तसच साधूंचे परित्राण म्हणजे साधुत्वाच परित्राण ! साधुत्वाच रक्षण आणि असाधुत्वाचा विनाश हे भगवंताच कार्य !*

*येथे गुरुरूपाने असणारी ईश्वरशक्ती आज आपल्यासमोर आहे. मुद्दाम महाराज बेंगळूरहून या ठिकाणी आले आणि साक्षात् ईश्वराभिन्न असणारी गुरुशक्ती, तीही आपल्यासमोर आहे. ती आशीर्वाद देण्याकरिता आज उपस्थित राहिली आहे.*

*पोहायला पाण्यात उतरल्यानंतर आपण बुडून तळाशी गेलो तरी आपल्याला वर काढू शकेल इतका उत्तम पोहोणारा, कुणीतरी आपल्याकडे लक्ष देणारा आहे. तो आपल्याला पाण्यात बुडू देणार नाही. ही श्रध्दा जरूर आहे. पण या ठिकाणी सर्व व्यक्तिविशेष गेले पाहिजेत ना ?*

*ईश्वर - स्वरुपाच ज्ञान होण्याकरिता भगवंतांनी ज्ञानाची साधनं सांगितली आहेत. सर्वांच्या हृदयामध्ये ईश्वर शक्तीचा आविर्भाव झालेला आहे, हे गृहीत धरून मी त्या ईश्वरशक्तीपुढे ही शंका मांडत आहे. भगवंताला साधुत्वाचं संरक्षण करायच आहे, त्याकरिता ईश्वर भक्तीचा आविर्भाव आहे म्हणून वैयक्तिक दृष्टीने महाराजांनी कौतुक केलं, आशीर्वाद दिला अस म्हणायला हरकत नाही.*

*पण याच्या योगाने साधुत्वाचं परित्राण कसे होणार ? भीती आहे ना ?*

***पूज्यता डोळा न देखावी ।***
***स्वकीर्ती कानी नायकांनी ।***
***हा आमुची ऐसी नोहावी । हेचि लोका ।***

*मनात शंका आहे. सिध्यन्ते सर्व संशयात् ही भूमिका फार मोठी आहे. अनेक जन्मांनी ती मिळणारी आहे.*

*साधुत्वाला हे सगळ प्रतिबंधक अशा प्रकारच होण्याची शक्यता आहे का ? साधुत्व मिळवण कठीण आहे. ते मिळालेल असताना त्याला प्रतिबंधक उपाय झाला तर मिळालेल साधुत्व जाईल काय ? अर्थात् मिळालेल म्हणजे लोकांनी दिलेल आहे.*

***समर्थांच्या घरचे श्वान । त्यास सर्वही देती मान ।***
*अशी वस्तुस्थिती आहे.*

*तर हा संशय आपल्या सर्वांच्या हृदयात जागृत झालेल्या शक्तीपुढे मांडलेला आहे. त्या संशयाची निवृत्ती करायला कर्तुं अकर्तुं ईश्वरी शक्ती समर्थ आहे. पण प्रतिबंधक अस काही होऊ नये अशी त्या ईश्वर शक्तीजवळ प्रार्थना आहे.*

***ईश्वरः सर्व भूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ।***
***भ्रामयन्सर्वभूतानि यन्त्रारुढानि मायया ।***
***तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ।***
***तत्प्रसादात् परां शांतिं स्थानं प्राप्यसि शाश्वतम्।***

*अस आश्वासन त्यांनी दिलेल आहे. प्रतिबंधक अशा प्रकारच जरी ते कार्य भासलं तरी विषमणि अमृतं क्वचित् भवेत.*

*द्रौपदीची विटंबना होण्याचा प्रसंग आला असता प्रभूने वस्त्र उत्पन्न केली या चमत्काराचा परिणाम धृतराष्ट्रावर होऊन त्याने द्रौपदीला वर मागायला सांगितल. ती म्हणाली, आम्ही मुक्त झालो अस सांगा. म्हणजे ती ईश्वरकृपेने मुक्त झाली. अशीच ईश्वरकृपा आपल्यावर झालेली आहे. म्हणून हा अशा प्रकारचा उत्सव उत्तमरितीने पार पडला आहे. केवळ मानवी शक्तीच्या योगाने हे होणं शक्य नाही. विधिज्ञानी पुष्कळ विधी केले. त्या विधींचे सामर्थ्य आहेच. व्यावहारिक कार्य काय किंवा पारमार्थिक कार्य काय, सर्व माहिती सांगणारी, मार्गदर्शन करणारी अशी मंडळी गुरुस्थानातून या ठिकाणी आलेली आहेत आणि त्यांचे व्यवस्थित मार्गदर्शन होऊन हे कार्य पार पडलेलं आहे.*

*जाता जाता आपल्याजवळ एक संशय व्यक्त केला. महाराज या ठिकाणी उपस्थित झालेले आहेत. हे गुरु स्वरूपही आहेत. त्यांचेही आशीर्वाद मिळालेले आहेत. तेव्हा आपल्या सर्वांच्या हृदयात जागृत झालेल्या ईश्वरशक्तीची योग्यता यावी एवढीच त्या ईश्वरशक्तीच्या चरणी प्रार्थना.*

*॥ अवधूत चिंतन श्रीगुरुदेव दत्त ॥*

---

प. पू. दत्त महाराजांच्या आशीर्वादानंतर त्यांना विनम्र अभिवादन करणारा श्लोक सामुदायिकरीत्या म्हटला व त्यानंतर ''दुरितांचे तिमिर जाओ । विश्व स्वधर्म सूर्ये पाहो । जो जे वांछील तो ते लाहो'' या माऊलीच्या पसायदानाने जवळ जवळ चार तास रंगलेला, स्थळकाळाचे भान विसरायला लावणारा हा देखणा, संस्मरणीय कार्यक्रम संपला आणि आता फक्त उद्याचीच सकाळ राहिली हा विचार मनाला हुरहूर लावून गेला.

शुक्रवार, दि. १८ मे १९९०

आज शेवटचा दिवस. तो अतिशय गोड झाला. आजवरच्या साऱ्या कार्यक्रमांचा हा कळस होता. परमोच्च बिंदू होता. प्रसन्न, मंगल सकाळच्या शुभमुहूर्तावर गेले वर्षभर ज्याची योजना – त्याचे बारीक सारीक तपशील ठरविणे, शास्त्रीय आधार शोधणे, कार्यक्रमाचे स्वरुप , पुरोहित ठरवणे, त्यांना आमंत्रित करणे अशी विविध प्रकारची धावपळ साक्षेपाने, आस्थेने केली जात होती. तो प. पू. महाराजांच्या सहस्त्रचंद्रदर्शन विधीचा सोहळा संपन्न होत होता.

प्रत्येक महिन्याच्या शुक्ल द्वितीयेस दिसणारी चंद्रकोर तिला चंद्रदर्शन म्हणतात. हा चंद्र जसा उत्तरोत्तर वृध्दिंगत होणारा असतो तसा दीर्घायुष्य देणारा असतो. 'चंद्रमा मनसो जातः' चंद्र परमेश्वराच्या मनापासून निर्माण झाल्याने मनाचा कारक ग्रह चंद्र आहे. चंद्राप्रमाणेच मनही चंचल आहे. पण ८० वर्षे पूर्ण झाल्यावर मनाची चंचलता नाहीशी

होऊन स्थिरता येते. मनोनिग्रह करता येतो. म्हणूनच शास्त्राने अशावेळी हा विधी सांगितला आहे. मनावर ताबा मिळविला की, ब्रह्मपदप्राप्तीचा मार्ग सुकर होतो व हा विधी करणारा ब्रह्मशरीरी होतो असे वैखानसांनी म्हटले आहे. म्हणूनच हा विधी महत्वाचा आहे.

आपल्या सर्वांच्या परमभाग्याने हा विधी संपन्न झाल्याचा सोहळा 'याचि देही याचि डोळा' आपल्याला पहायला मिळाला. या निमित्ताने शताभिषेक केला जातो. १०० छिद्रे असलेले रौप्य पात्र तयार करवून घेतले होते. त्यात वेदाभिमंत्रित जल घेऊन शतधारांनी महाराजांच्या मस्तकावर जलाभिषेक करण्यात आला आणि ते रौप्य पात्र दान दिले.

पूर्णाहुतीच्या वेळी तर वामन–निवासाच्या वास्तूला प्राचीन काळातील आद्य–तपः संपन्न ऋषीमुनींच्या तपोवनाचे स्वरूप आले होते.

## कुमारिकापूजन –

यानंतर महाराजांनी ५०–६० कुमारिकांचे पूजन केले. शक्तीयुक्त अशा भगवतीची ही बालरुपें. सुरेख वस्त्रे लेऊन हसतमुख चेहऱ्याने बसली होती. महाराजांकडून पूजन करून घेताना त्या निरागस बालिकांना अतिशय आनंद झाला होता. त्यात केवढे परम भाग्य अंतर्भूत आहे. हे त्यांना पुढच्या आयुष्यात कळेल. या सर्व मुलींना हळद–कुंकू, कापड, पेढे, नारळ देऊन त्यांचे पूजन केले. तेव्हा या सर्व मुग्ध कलिकांमध्ये जगन्मातेचे रूप पाहिले जात होते.

आणि यानंतर **रौप्य तुलेचा सोहळा :**

आजि सोनियाचा दिनु । वरुषे अमृताचा घनु ।

असेच या दिवसाचे वर्णन करावे लागेल. श्री. प. पू. श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबे स्वामी महाराज व श्री. प. पू. लोकनाथतीर्थ स्वामी महाराज स्मारक ट्रस्टच्या इतिहासातील हे एक सोनेरी पान आहे. ''स्वर्ग धरेवर अवतरला'' असेच या क्षणाचे वर्णन करावे लागेल. आजपर्यंत ज्यांच्या रौप्य–तुला झाल्या आहेत अशांची संख्या मोजावयाची ठरवली तर ते शक्य होईल. म्हणजेच फार थोड्या भाग्यवान माणसांच्या जीवनात रौप्य–तुलेचे स्वप्न सत्यात उतरते.

प. पू. दत्तमहाराजांची अशी रौप्य तुला व्हावी अशी गौरव–समितीची आणि अनेक भक्तांची प्रथमपासूनच तीव्र, प्रामाणिक इच्छा होती आणि ती ईशकृपेने फलद्रूप होण्याचा क्षण आला होता. कडक ऊन आणि विलक्षण उकाडा आणि तुफान गर्दी असूनही '' आज चांदणे उन्हात हसले, तुझ्यामुळे'' अशीच सर्वांची मनोधारणा होती.

तुला करण्यापूर्वीचा संकल्प, मंत्र–पठण या सर्व गोष्टी अगदी दूरवरून सुध्दा दिसाव्यात म्हणून सर्किट टी. व्ही. ची सोय केली होती आणि त्यानंतर परमगुरु दत्तात्रयांचा फोटो मांडीवर ठेऊन महाराज तुलेमध्ये स्थानापन्न झाले. विविध पुष्पमालांनी, रेशमी वस्त्रांनी तुला सजवलेली होती. तिच्यावर सुवर्ण–प्रतिमा लावली होती. महाराज स्थानापन्न होताच – दुसऱ्या पारड्यात चांदी ठेवण्यास सुरुवात ~~झाली. चांदीचे तांबे~~, भांडी, ताटे, वाट्या आणि अन्य कित्येक चांदीच्या वस्तू जणू हे भाग्य आपल्याला लाभावे म्हणून पारड्यात जाण्यास उत्सुक होत्या व पाहता पाहता तुला संपन्न झाली. शेजारी कृष्ण–पत्नी रुक्मिणीच्याच विमल भक्तीने व निरतिशय प्रीतीने तुलसीपत्र घेऊन सौ. आईसाहेब उभ्या होत्याच. ते तुलसीपत्र पारड्यात ठेवताच तुलेचा विधी खऱ्या अर्थाने पूर्ण झाला. हो सोहळा पाहण्यासाठी देवांनाही पृथ्वीतलावर यावस वाटल असेल. सर्वांच्या मनात आनंद मावत नव्हता. शब्द मूक झाले होते. फक्त डोळे बोलत होते आणि आता तुलेचे जवळून दर्शन घेण्यासाठी लोकांची झुंबड उडाली. त्यांना आवरणे आता अशक्य होते. ज्याप्रमाणे नदीच्या पुराच्या लोंढ्याला वाट करून द्यावीच लागते, तसेच भक्तांच्या भावनेच्या पुराला बांध घालण्याचा प्रयत्न व्यर्थ होता.

शास्त्रानुसार आपल्या वजनाइतकी चांदी जो दान देईल तो सर्व पापांपासून मुक्त होतो व

शिवलोकी चिरकाल वास्तव्य करतो. असे फल सांगितले आहे. त्याहीपेक्षा महत्वाचा भाग म्हणजे जे लोक तुला पुरुषदान देताना पाहतात किंवा असे दान देण्यासाठी अनुमोदन देतात, सहाय्य करतात. त्यांना देखील उपरोक्त फल मिळते असे हेमाद्रित विष्णुधर्मोत्तरवचन आहे. म्हणजे महाराजांनी तुलापुरुषदान केले आणि आपण अनेक भक्तगण त्यांच्या या दानाचे फळभाक् झालो. हे केवढे भाग्य ! म्हणूनच तुला पुरुषदानाच्या वेळी लोकांची इतकी प्रचंड गर्दी लोटली होती की, कित्येकांना आत प्रवेशही मिळणे अवघड झाले होते.

## श्रौतयाग –

याच काळात समारंभाच्या या सर्व सप्ताहात आपले मूळपीठ वासुदेव–निवास येथे "श्रौतयाग" संपन्न होत होता. आहिताग्नी वेदशास्त्रसंपन्न श्री. राजाराम कुलकर्णी यांनी धारवाडचे प्रकांड पंडित श्री. भालचंद्रशास्त्री उप्पिनबेट्टिगिरी व अन्य ऋत्विजांच्या सहाय्याने हा श्रौतयाग केला. यज्ञाचा खरा आनंद या यागात अधिक असतो. अग्निष्टोम, अत्यग्निष्टोम, उक्थ, अतिरात्र इ. सात सोमसंस्था सांगितल्या आहेत. ही यज्ञप्रक्रिया म्हणजे काय हे समजावून घेण्यासाठी अमेरिकन व जपानी लोक भारतात आले आहेत. त्यातील रहस्य समजावून घेण्यासाठी ते अक्षरशः जीव टाकतात. आपणाकडे मात्र या विषयी अनास्था आहे याचा खेद होतो. उलट "यज्ञाच्या निमित्ताने अमूल्य वस्तू का जाळता ?" असा अज्ञानमूलक प्रश्न विचारतात. यज्ञात जेवढी आहुती दिली जाते त्याच्या कितीतरी पट पुनःनिर्मिती होते. अग्नी हा **'प्रजनन'** आहे हेही त्यांना माहीत नसते. यज्ञकुंड हे विश्वोत्पत्तीचे स्थान आहे. यातूनच द्रौपदी, धृष्टद्युम्न या तेजस्वी व्यक्ती निर्माण झाल्या आहेत. एवढे लक्षात घेतले तरी बराच बोध होऊ शकेल.

याखेरीज १० तारखेला साधकांनी प. पू. दत्तमहाराजांच्या मातापित्यांचे केलेले पूजन, त्यांचा घेतलेला आशीर्वाद, महाराजांचे केलेले अभिष्टचिंतन, महाराजांच्या परिवारातील छोट्यांनी त्यांचा केलेला कौतुक सोहळा, त्यावेळचे त्यांचे अस्खलित संस्कृत बोल आणि वाहिलेली शब्दफुलांची ओंजळ असे कितीतरी छोटे मोठे कार्यक्रम झाले. ज्या सर्वांचेच वर्णन देणे अशक्य आहे. तसेच दररोज रात्री आरतीनंतर सर्व साधक दिगंबराची धून धरण्यासाठी उत्सुक असत. तबला, पेटी, झांजा यांच्या जोशपूर्ण साथीवर पायांचा ठेका धरला जाई. हळूहळू धून रंगात येई, लय वाढत असे. त्यावेळी पाहणाऱ्यांच्या काळजाचा ठोका चुकत असे आणि पायाबरोबर मनही दिगंबराच्या नामाभोवती फेर धरू लागे. त्याचबरोबर सर्व वक्त्यांची भाषणे इतकी अभ्यासपूर्ण आणि श्रवणीय होती की, ती या प्रतिवृत्तात जशीच्या तशी देण्याचा मोह अनावर होत होता पण जागेची मर्यादा लक्षात घेऊन तो मोह टाळावा लागला.

१८ मे १९९० ला संध्याकाळी अनौपचारिक असा समारोपाचा कार्यक्रम ठरला. पावसानेही महाराजांच्या या सोहळ्यात मोठ्या दिमाखात हजेरी लावली. त्यामुळे हा कार्यक्रम मंडपात घेता आला नाही. हॉलमध्ये जणू सर्वजण निरोप घेण्यापूर्वी अधिकच जवळ आले. महाराजांचा जाण्यापूर्वी सर्वांनी कृपाशीर्वाद घेतला. सौ. आईसाहेबांना आणि सौ. ताई महाराजांना विनम्र अभिवादन केले. सत्कार समारंभाच्या वेळी ज्यांना मनोगत व्यक्त करता आले नव्हते, त्यांनी आज आपले मन मोकळे केले. महाराजांबद्दल बोलतांना प्रत्येकालाच गहिवरून आले होते. निरोपाचा क्षण जवळ आला होता. पाय निघत नव्हता. पण ठरवलेल्या गाडीची वेळ खुणावत होती. काय बोलावं हे सुचत नव्हतं. सांगावंसं तर खूप काही वाटत होतं.

शेवटी प्रत्येकाच्याच ओठांवर ओळी येत होत्या,

**खूप बोलायचे होते, आता बोलणार नाही ।**
**देवळाच्या दारामध्ये भक्ती तोलणार नाही ।**


भक्ती तोलणार नाही आणि मनाच्या गाभाऱ्यातून

असंख्य प्रतिध्वनी उमटत होते.

**'या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे'**

आणि त्यासाठी आपल्या गुरुदेवांना – प. पू. दत्तमहाराजांना दीर्घायुष्य लाभावे, ते शतायुषी व्हावेत.

जरा अलिप्तपणे या कार्यक्रमाकडे पाहिलं तर असंख्य गोष्टी जाणवतात. गौरव–समिती अध्यक्ष पं. धुंडिराजाशास्त्री दाते, कार्यवाहपदाची अवघड धुरा समर्थपणे सांभाळणारे श्री. कृष्णा आर्वीकर, श्री. नारायणराव दाते, श्री. शरद जोशी, श्री. वसंतराव जोशी, श्री. पारखी शास्त्री यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली, त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून १८/२० तास न कंटाळता, न चिडता, हसतमुखाने सतत सेवा करणारे खरे स्वयंसेवक आणि कार्यकर्ते – लोकांच्या चपला सुध्दा हसतमुखाने उचलणारे, सांभाळणारे आणि तितक्याच तत्परतेने रात्री १० वाजता सुध्दा परत देणारे निःस्वार्थी बाल, तरुण, वृध्द कार्यकर्ते या सर्वांच्या एकवटलेल्या संघ शक्तीतूनच आणि ईश गुरुकृपेने हे भव्य, दिव्य स्वप्न साकार झाले !







१) शक्तिपात संप्रदायातील अधिकारी प. पू. नित्यबोधानंदतीर्थ मार्गदर्शन करतांना. २) मा. छोटा गंधर्व यांची सुरुवातीपासूनच रंगलेली अनोखी मैफिल. ३) पूर्णाहुती स्वीकारतांना प्रसन्न आणि प्रज्वलित झालेली अग्निशिखा.


४) गणेशयाग, देवीयाग, सौरयाग इत्यादी विविधयागात असे हवन झाले. ५) मंत्र जागर करून ब्राह्मण प. पू. महाराजांचे अभिष्टचिंतन करीत आहेत. ६) प. पू. दत्तमहाराज सत्कार सभेसाठी येताना सुवासिनींचे औक्षण स्वीकारून त्यांना प्रसाद-रुप ओवाळणी देत आहेत.











१) प. पू. दत्तमहाराजांची स्नुषा व इतर सुवासिनी भगवती-स्वरुप कुमारिकांचे पूजन करीत आहेत. २) गोप्रदानाचा अपूर्व सोहळा पाहण्यात गुंग झालेल्या प्रेक्षक-भगिनी. ३) सत्कार-समारंभाच्या सोहळ्यात दोन्ही शंकराचार्यांसह व्यासपीठावर प. पू. दत्तमहाराज, सौ. आईसाहेब व सौ. ताई महाराज. ४) गोप्रदानासाठी आणलेले देखणे गाय-वासरु. गाईची पूजा करतांना कृष्णा आर्वीकर, दामोदर आर्वीकर, पाध्ये व इतर. ५) प. पू. दत्तमहाराज सत्कारानंतर सर्वांना मंगल आशीर्वाद देत आहेत.